जानेवारी-फेब्रुवारी, १९९५ रु. ८

# श्री साईलीला

श्री साईबाबा संस्थान, शिरडीचे अधिकृत नियतकालि



# श्री साईबाबा संस्थान, शिरडी

## विश्वस्त मंडळ


श्री. द. म. सुकथनकर

(अध्यक्ष)

श्री. मोहन मो. जयकर

श्री. रमेश दा. सोनी

श्रीमती रेखा ग. दिघे

श्री. प्रकाश व. कारखानीस

श्री. मुकेश र. पटेल

श्री. मधुकर द. जोशी

श्री. प्रकाश पी. वैशंपायन

श्री. मधुकर ज. गर्दे पाटील

श्री. देवकीनंदन सारस्वत

श्री. आप्पासाहेब खं. कोते

श्री. रायभान ग. चिने

श्री. भास्कर शं. बोरावके

श्री. अण्णासाहेब सा. म्हस्के पाटील

श्री. दयालाल हि. पटेल

श्री. राजीव पुं. रोहोम

श्री. संभाजी कि. काळे

श्री. अशोक भि. खांबेकर

सौ. प्रेमाबाई सी. बज

श्री. रामचंद्र नि. गोसावी

श्री. प्रभाकर तु. बोरावके

श्री. सोपान मा. धोर्डे

# श्री साईलीला

श्री साईबाबा संस्थान,
शिरडीचे अधिकृत नियतकालिक

वर्ष ७३ अंक १०-११

जानेवारी-फेब्रुवारी १९९५

संपादक
द. म. सुकथनकर

अक्षर जुळवणी व ऑफसेट छपाई
गीता ऑफसेट, वडाळा, मुंबई.

कार्यालय
'साईनिकेतन', ८०४-बी, डॉ. आंबेडकर मार्ग,
दादर, मुंबई - ४००.०१४.
दूरध्वनी : ४१२२५६१

वार्षिक वर्गणी - रु. ५०/-
आजीव सभासद वर्गणी - रु. १,०००/-
परदेशाकरिता वार्षिक वर्गणी - रु. १,०००/-
(टपाल खर्चासहित)
किरकोळ अंक - रु. ८/-

मुद्रक, प्रकाशक द. म. सुकथनकर, अध्यक्ष, श्री साईबाबा संस्थान, शिरडी यांनी हे नियतकालिक, 'साईनिकेतन', ८०४-बी, डॉ. आंबेडकर मार्ग, दादर, मुंबई - ४०० ०१४ येथे छापून तेथेच प्रसिद्ध केले.


या नियतकालिकातील लेखांत प्रसिद्ध झालेली मते ही त्या लेखातील लेखकांची स्वतंत्र मते असून त्या मतांशी संपादक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही.

# श्री साईबाबांची थोडक्यात शिकवण

– ले. कर्नल मु. ब. निंबाळकर (निवृत्त)
बंड गार्डन रोड, पुणे.

**श्री** साईबाबांची सर्वसाधारण शिकवण थोडक्या शब्दांत त्यांचे थोर भक्त कै. काकासाहेब दीक्षित (बाबांचे लेकरू) यांनी **'रघुनाथ-सावित्री साईनाथ भजनमाला'** या पुस्तिकेच्या प्रस्तावनेत सांगितली आहे; ती अशी :

**''परमेश्वर आहे व त्याच्यापेक्षा कोणी मोठा नाही. तो सर्व चराचरांमध्ये भरून उरला आहे. त्याची लीला अगाध आहे. उत्पन्नही तोच करितो, राखितोही तोच; वाढवितोही तोच आणि मारितोही तोच. तो ठेवील तसे रहावे, त्याच्या मर्जीत आपण राजी रहावे, तळमळ करू नये. त्याच्या इच्छेशिवाय झाडाचे पान हालत नाही. प्रत्येकाने नेकीने (प्रामाणिकपणे, सचोटीने) वागावे. सद्सद्विचारशक्ति जागृत ठेवावी. आपले कर्तव्य आपण करावे, पण कर्तव्याचा अभिमान आपल्याकडे न घेता कर्तृत्व परमेश्वराला द्यावे आणि फलही त्यासच समर्पण करावे, म्हणजे आपण अलिप्त राहून कर्म आपल्याला बाधक होणार नाही.''**

**''सर्व भूतमात्रांशी प्रेमाने वागावे. वादावादी करू नये. कोणी काही बोलले तर ऐकून घ्यावे. कोणाच्या बोलण्याने आपल्या अंगाला भोके पडत नाहीत. कोणाची बरोबरी करू नये. कोणाची निंदा करू नये. कोणी काही केले तरी तिकडे लक्ष देऊ नये. त्याचे त्याच्यासंगे, आपले आपल्यासंगे.''**

**''कष्ट करीत असावे. रिकामे राहू नये. देवाचे नाव घ्यावे. पोथीपुराण वाचावे. आहारविहार त्यागू नयेत, पण नियमित असावे.''**

प्रेमें या अष्टकासी पढुनि
गुरुवरा प्रार्थिती जे प्रभातीं ।
त्यांचे चित्तासि देतों अखिल हरुनियां
भ्रांति मी नित्य शांति ॥
ऐसें हें साइनाथें कथुनि
सुचविलें जेविं या बालकासी ।
तेवीं त्या कृष्णापायीं नमुनि
सविनयें अर्पितों अष्टकासी ॥

# गीत दत्तायन

## (श्री दत्तलीलाचरित्रावर आधारित गीतमाला)

- श्री. गजानन कुलकर्णी
रत्नागिरी.

द्वापाराचा काळ संपला. कलीची सुरुवात करून देवून भगवान श्रीकृष्ण आपले अवतारकार्य संपवून स्वस्थानी वैकुंठी येऊन निवांत विश्रांती घेत बसले. आसुरी आणि अश्लील कलीचा अंमल जारी होताच प्रत्येक मानवी जीवाभोवती षड्रिपूंनी आपले जाळे विणायला सुरुवात केली. काम-क्रोध-मद यांनी सारी वसुधा व्यापून टाकली. अहंकाराची मिरासदारी तर अतोनात वाढली. जो तो स्वत:ला मोठा समजू लागला आणि गर्वाने ताठ झाला. मात्र हे सगळे होत असतानासुद्धा तपस्वी, ऋषी, मुनी यांची साधना सुरूच होती.

नारदांच्या मनाने ही वेळ साधायचं ठरवलं आणि अखिल मानवजातीच्या कल्याणासाठी त्रिमूर्तींना - ब्रह्मा, विष्णू, महेश यांना एकरूपात अवतार धारण करायला लावायची वेळ जवळ आली आहे, हे लक्षात घेऊन अहंकाराची गाठ घेतली. त्याची वारेमाप स्तुती केली आणि ह्या तिन्ही देवांच्या धर्मपत्नी सावित्री, लक्ष्मी आणि पार्वती यांच्या ठायी वास करण्याची आज्ञा केली.

कधी नव्हे ती देवर्षी नारदांनी आपली स्तुती केली, हे पाहून आधीच उन्मत्त झालेल्या अहंकाराला गर्वाने ग्रासलं आणि ह्या तीनही देवींच्या ठायी तो ठरल्याप्रमाणे वस्ती करता झाला.

आपला संकल्प सिद्धीस नेण्याच्या दृष्टिकोनातून नारदांची साधना योग्य दिशेने चालू होती. परंतु भगवंताला, म्हणजे सत्व, रज आणि तम यांचे पूर्णरूप प्रतीक असलेल्या ह्या देवत्रयींना जन्म घेण्यास योग्य असे स्थान शोधणे जरूरीचे होते. नारदांची त्या दिशेने मार्गक्रमणा सुरु होती. प्रत्येक ठिकाणी ते चाचणी घेऊन पाहात होते. असं करता करता योग्य स्थान नारदांना सापडलं.

सह्याद्री पर्वतावर सदाबहार अशा वृक्षवेलींच्या सान्निध्यात वसलेली अत्रिऋषींची कुटी नारदांनी निवडली. योगविद्येत पूर्णत्वाला पोहचलेले, तरीही अत्यंत शांत आणि निगर्वी असे अत्रिऋषी सदासर्वदा इतर ऋषीजनांना, मुनीवर्यांना ज्ञानार्जन करण्यात सदैव मग्न असत. तपस्वी वृत्तीने रहात असले तरी गृहस्थाश्रमाची सर्व कर्मे ते यथोचित पार पाडीत असत. आश्रमात येणाऱ्या प्रत्येक अतिथी अभ्यागताचे यथोचित स्वागत होत असे.

अत्रिऋषी जितके शांत आणि निगर्वी, तितकीच त्यांची धर्मपत्नी महासती अनसूया सुशील, शांत आणि महापतीव्रता होती. तिच्या पातिव्रत्याचा डंका त्रिखंडात निनादत होता. अत्रींच्या आश्रमात येणाऱ्या प्रत्येक अतिथीचा ती यथोचित सन्मान राखीत होती, हसतमुखाने स्वागत करीत होती. आश्रमात आलेला कुणीही अतिथी विन्मुख होऊन परत जाता नये, हा तर अत्रींचा दंडकच होता.

नारदांनी ह्या सर्व बाबींचा सर्वकष विचार केला आणि तंबोऱ्याची तार छेडली. मनात विचार केला, नाहीतरी त्रिखंडात मला कळीचा नारद म्हणूनच ओळखतात ना! मग, अखिल मानवजातीच्या उद्धारासाठी स्वर्गाच्या द्वारात ही पहा दिली कळ लावून!

नारदांनी कळ लावून दिली. अहंकाराने आपले काम केले आणि स्त्रीहट्टापुढे मान तुकविण्याचा बहाणा करीत तीनही देवांनी पृथ्वीवर अवतार धारण केले. दत्तरूप प्रगट झाले.

॥१॥

ऋतू हेमंती झुले पाळणा
अत्रिऋषींच्या घरी
प्रगटले दत्त वसुधेवरी
प्रगटले दत्त वसुधेवरी ॥धृ॥

त्रैलोक्याचा जो अधिनायक
रमारमण जो त्रिभुवन पालक
तोच दयाघन दत्तरूपाने -
आला अत्रिघरी ॥१॥

मार्गशीर्ष तो आला बहरूनी
तिथी पौर्णिमा आली उजळूनी
नक्षत्रांची राणी रोहिणी -
अमृत कलशा धरी ॥२॥

हरीभरी ही अवघी वसुधा
फुलली होती रमणी सुगंधा
इंद्रपुरीची राणी सुमेधा -
दासी अत्रिघरी ॥३॥

नृत्य गायने दंग अप्सरा
गंधर्वाचा कंठ साजिरा
देवलोकीच्या देवमंदिरा -
आणविले भूवरी ॥४॥

तिन्ही महादेवांनी भूतली अवतार धारण केल्यावर मग स्वर्गात राहिलंय काय? कैलास, ब्रह्मलोक आणि वैकुंठ ही तीनही महास्थाने सुनी सुनी वाटू लागली. तशी देवगणांची रांग भूतली अत्रिऋषींच्या कुटीकडे वळली.

यक्ष, किन्नर, गंधर्व, अप्सरा सारे दत्तात्रेयांचे दर्शन घ्यायला दररोज भूतली येऊ लागले. पाताळातून नागलोक धावून आला. यति-मुनींचा तर पूरच लोटला होता. दररोज ऋषी-मुनी पंच पंच उष:काली दत्तात्रेयांना भूपाळी गावून जागे करू लागले.

॥२॥

उठी उठी दत्तात्रेया,
जगताच्या आश्रया,
जगताच्या आश्रया,
यतिवर मुनीजन गात भूपाळी,
तुज जागविती सदया,
तुज जागविती सदया ॥धृ॥

निलाकाश हे उजळून उठले -
तुझ्याच इच्छेने
चराचरावर पहा बरसली,
रविरायाची किरणे
योगसमाधी सोडून आता,
उठी अमृत बरसाया ॥१॥

आळस झाडूनी वृक्षही उठले -
वेली बघ फुलल्या
मोद प्रमोदित धावत धेनू -
अंगणात आल्या
खग गण सावली धरुनी बसले -
आरती तुला गाया ॥२॥

जागविण्यास्तव तुला प्रभुवरा
सूर घुमले वाद्यांचे
खोळंबूनिया तुझ्या दर्शना
देव उभे स्वर्गीचे
गंधर्व, यक्ष अन् नागलोकही,
येती दर्शन तव घ्याया ॥३॥

अशातऱ्हेने अत्रिऋषींच्या कुटीत या विश्वाचा विश्वाधार, जगताचा परमात्मा दिसामासांनी वाढत होता, मोठा होत होता. अत्रींना तीन बाळांच्या रूपाने तीन पुत्रांची प्राप्ती झाली होती. एक म्हणजे शिवावतार दूर्वास, दुसरा महाविष्णूचा अवतार दत्तात्रेय आणि तिसरा ब्रह्मावतार चंद्र. तीनही मुले मोठी झाली. तिघांची मुंज झाली, आणि तिघे तीर्थाटनासाठी बाहेर पडले. अनेक तीर्थक्षेत्री फिरत फिरत दत्तात्रेयांनी अनेक जीवांचा उद्धार केला, त्यांना भवतापांतून सोडवले आणि मुक्तीचा मार्ग दाखविला. सर्वत्र दत्तात्रेयांच्या नावाचा जयजयकार घुमू लागला. ज्याच्या-त्याच्या मुखातून एकच गीत उमटू लागले.

॥३॥

गुरुर्ब्रह्मा गुरुर्विष्णु: ।
गुरुर्देवो महेश्वरा
गुरु: साक्षात् परब्रह्म ।
तस्मै श्री गुरवे नम:
दत्तगुरुंचे नाम स्मरा रे,
दत्तगुरुंचे नाम स्मरा ॥धृ॥

जगदाकारा एक गुरु हा
दत्तनाम करी पार सागरा
भवसागरी किती डुंबसी वेड्या -
मूढमती पामरा ॥१॥

सत्व रजासह तमो गुणांचा
संगम झाला हा त्रिगुणांचा
सत्वभावमय ठेवूनी वाचा -
नित्य स्मरा ईश्वरा ॥२॥

आधी-व्याधी नको उपाधी
पार करा हा सागर आधी
एकच तारू दिसले नयनी -
घ्या त्याचा आसरा ॥३॥

गात गात हे नाम सुखाचे
जीवन फुलवा जणू बगीचे
फुलापरी त्या झेलील दु:खा -
भवसागर हा पार करा ॥४॥

अनाम आलो आम्ही जगती
माया येऊन जडली भवती
त्या मायेच्या विळख्यातूनी तू -
जाई उडूनी पाखरा ॥५॥

किती जन्म हे घ्यावे परतून
किती यातना भोगू अजून
भावबंधने सारी तोडून -
झेप घेई अंबरा ॥६॥

मौजीबंधनानंतर सर्व तीर्थाटने करून परत आल्यावर माता-पित्यासमवेत तिघेहीजण एक दिवस वार्तालाप करीत बसले होते. तिघांकडे पाहून माता अनसूयेच्या मनात आलं, आता ह्या तिघांची लग्नं करून दिली पाहिजेत. या विचाराने मातेने विषय काढला. ती म्हणाली,

बाळांनो, एव्हढं कडक सोवळं आणि ब्रह्मचर्य सांभाळून व्रत-वैकल्ये करीत तुम्ही सारी तिर्थाटने करून आलात. आता तुम्ही मोठे झालात, म्हणून आता हा ब्रह्मचर्याश्रम सोडून तुम्ही गृहस्थाश्रमी व्हावे, अशी आमची इच्छा आहे. तुम्ही लग्नं करावीत आणि आम्हाला सुनमुखं पाहायला मिळावीत, असं आम्हाला मनापासून फार वाटतंय. बाळांनो, साऱ्या आश्रमांचं सार असा हा गृहस्थाश्रम आहे बरं! आईचे हे बोल ऐकून तिघेही स्तब्ध झाले. एकमेकांकडे पाहू लागले. श्री दत्त तर अविनाशी, निर्विकार, दूर्वास तपोधन योगेश्वर आणि चंद्र तेजस्वी, पवित्र वृत्तीचा ब्रह्मावतार.

आईच्या प्रश्नावर कुणीच काही बोलेना, तेव्हा अत्रिऋषी म्हणाले,

अरे, आम्ही अतिशय आनंदाने तुम्हाला गृहस्थाश्रम स्वीकारण्यांबद्दल विचारतोय आणि तुम्ही गप्प का?

तेव्हा दत्तात्रेय म्हणाले, दूर्वास आमचे वडील बंधु, त्यांचा काय तो विचार घ्या!

दूर्वासांनी अतिशय विनम्रपणे मातेला उत्तर दिले,

हे माते, तुझी इच्छा असली तरी मला त्या गोष्टीचा यत्किंचितही मोह नाही. तपाचरण, ध्यान-धारणा आणि तीर्थाटन याचाच आम्हाला हव्यास आहे.

दूर्वासांच्या उत्तराने माता अनसूया अतिशय दु:खी झाली. आपल्या वंशाचं पुढे काय होणार, या दारूण चिंतेने तिचं काळीज होरपळू लागलं. मातेच्या मनाची ही घालमेल दत्तात्रेयांच्या लक्षात आली आणि त्यांनी साक्षात्कार घडवायचं ठरवलं.

एका भल्या पहाटे स्नान-कर्म उरकून दत्तात्रेय ध्यानाला बसले तेव्हा अत्रींच्या लक्षात आले की दत्तमूर्ती अदृष्य होऊन तिथे ब्रह्मा, विष्णू आणि महेश हे तीन देव बसलेले आहेत. हे दृष्य पाहून अत्रिऋषी विस्मयचकित झाले. त्यांनी हा प्रकार आपल्या पत्नीला अनसूयेला दाखविला. क्षणात् दत्तात्रेयांनी किमया केली आणि त्या तीन देवांच्या जागी दूर्वास, दत्त आणि चंद्र दिसू लागले. अत्रिऋषींनी सारंकाही ओळखलं आणि दूर्वास व दत्त यांच्यामागचा गृहस्थाश्रमी बनण्याचा हेका सोडून दिला. चंद्र गृहस्थाश्रमी झाला आणि दत्त व दूर्वास तीर्थाटनाला बाहेर पडले.

फिरत फिरत दत्तात्रेय पीठापूर नावाच्या गावात आले आणि गुप्त झाले. पुढे त्याच गावात आपाळ राजा नावाच्या ब्राह्मणाच्या घरी त्याच्या सुमति नामक साध्वी पत्नीच्या पोटी दत्तात्रेयांनी कलियुगीचा पहिला अवतार श्रीपाद श्रीवल्लभ या नावाने धारण केला.

पीठापूरात काही दिवस राहून आणि जडजीवांचा उद्धार करून गुरु फिरत फिरत कुरवपूरात आले आणि काही दिवस तिथेच राहिले. तिथेही त्यांनी अनेकांचा उद्धार केला आणि नंतर गुरु करंज नामक गावात

आले आणि तिथेच गुप्त झाले. पुढे त्याच ग्रामात एका सुविद्य आणि सुशील ब्राह्मण कुळात गुरुंनी नृसिंह सरस्वती या नावाने आपला दुसरा अवतार धारण केला. यथावकाश अनेक लीला करीत गुरु तिथून निघाले ते गाणगापूरात येऊन राहिले. गुरुंच्या पुनीत सहवासाने गाणगापूर पृथ्वीवरचे नंदनवनच बनून गेले. गुरुंच्या वास्तव्याने गाणगापूर एक महान तीर्थक्षेत्र बनले. अशा या पुनीत भूमीचा महिमा वर्णन करताना ओठावर अगदी सहज शब्द येतात....

॥४॥

**भक्तिगंगा भरून वाहते –**
**येतो नित्यच पूर**
**असे हे दिव्य गाणगापूर –**
**असे हे दिव्य गाणगापूर ॥धृ॥**

**दत्तदिगंबर योगी दयाघन**
**रमले येथे अत्रिनंदन**
**उष:काली त्या नित्यच फुटतो –**
**भक्तिचा अंकूर ॥१॥**

**ॐकाराच्या मंत्रजागरे**
**जागी होती गायी–वासरे**
**दुग्धामधूनी नित्यच पसरे –**
**भक्ति रोज भरपूर ॥२॥**

**स्वर्गामधूनी दाटीवाटीने**
**येती सूरवर एकजुटीने**
**सुहास्य वदने निरखिती चरणे –**
**भरुनी येई उर ॥३॥**

**भाग्यवंत ते इथे जन्मले**
**प्रभुचरणाशी सदैव रमले**
**दत्तदिगंबर ध्वनी गुंजले –**
**रमले येथे मयुर ॥४॥**

**भीमा अमरजा संगम भूवर**
**स्नानासाठी येती सूरवर**
**रम्य अशा या नदीतीरावर –**
**होई दिव्य सुकूर ॥५॥**

श्री गुरुंनी गाणगापूर ही आपली राजधानीच बनवून टाकल्यामुळे गाणगापूरला अनन्यसाधारण महत्त्व प्राप्त झाले. तसेच, गुरुंनी आपले आणखी एक स्थान निवडले, कृष्णामाईच्या तिरी वसलेले भिल्लवडी गाव. गुरु भिल्लवडीत आले, कृष्णातीरावर असलेल्या एका विशाल औदुंबर वृक्षाखाली येऊन बसले आणि तिथेच सर्वकाळ अदृश्य रूपाने वास्तव्य करते झाले. आजचे प्रसिद्ध औदुंबर क्षेत्र ते हेच. औदुंबर क्षेत्र गुरुंच्या वास्तव्याने एक पुनीत पावन महातीर्थ बनले. या नगरीचे वर्णन करताना भावशब्द उगम पावतात.

॥५॥

**या कृष्णेच्या रम्य तटावर –**
**स्वर्गपुरी दुसरी**
**वसली औदुंबर नगरी –**
**वसली औदुंबर नगरी ॥धृ॥**

**आजूबाजूला वृक्ष मनोहर**
**कृष्णामाई वाहे झरझर**
**निर्जन ऐशा स्थळी प्रभुवर –**
**वसले अवतारी ॥१॥**

**दिव्य चरण हे श्री दत्ताचे**
**उगमस्थान जणू या विश्वाचे**
**दोन बाजूला चंद्र सूर्य ते –**
**नित्य धरती चवरी ॥२॥**

**सदा समाधी धरी प्रभुवर**
**सेवा करिती सदा मुनीवर**
**खगगण गाती नित्य भूपाळी –**
**उषा आरती करी ॥३॥**

**स्वर्गपुरीतील सूरगण सारे**
**नित्य पूजना येती बिचारे**
**स्वर्गाहूनही थोर जाहली –**
**औदुंबर नगरी ॥४॥**

औदुंबरक्षेत्री बारा वर्षे राहून नंतर गुरु फिरत फिरत वरुणासंगमी आले. शिवा, भद्रा, भोगावती, कुंभी आणि सरस्वती अशा पाच नद्यांचा हा पवित्र संगम आहे. ह्या पाच नद्यांच्या संगमाचे प्रतीक म्हणजेच पंचगंगा. या पंचगंगेच्या काठी पूर्वी जे कुरवपूर क्षेत्र या नावाने प्रसिद्ध क्षेत्र होते तिथे येऊन गुरुंनी बारा वर्षे वास्तव्य केले. गुरुंच्या पुनीत वास्तव्याने पावन झालेले हे क्षेत्र पुढे गुरुंच्याच नावाने नृसिंहवाडी म्हणून प्रसिद्ध पावले. गाणगापूर, औदुंबर आणि नृसिंहवाडी अशी महाराष्ट्रात तीन थोर गुरुपीठं निर्माण झाली.

पुढे कलियुगाचा अंमल हळूहळू वाढत जाऊ लागला तसा गुरुंनी निराळाच विचार केला. आता एकाचवेळी तीन सगुण साकार अवतार धारण करावयाचे. त्यापैकी ब्रह्मावतार शिरडीक्षेत्री 'श्री साईनाथ' या नावाने प्रसिद्ध झाला. दुसरा विष्णूअवतार अक्कलकोट मुक्कामी 'स्वामी समर्थ' या नावाने प्रसिद्ध झाला. आणि तिसरा शेगावी शिवावतार 'श्री गजानन' म्हणून उदयास आला. यापैकी ब्रह्मावतार श्री साईनाथ माऊलीच्या रूपाचे वर्णन करताना कवी म्हणतो...

॥६॥

**साईनाथ हे नाव गुरुंचे –**
**शिरडीला वरदान**
**शिरडी श्री दत्ताचे स्थान,**
**शिरडी श्री दत्ताचे स्थान ॥धृ॥**

**फकीर वेष हा धरिला गुरुंनी**
**वरातीमधूनी येथे येऊनी**
**केले शिरडी हे संस्थान –**
**केले शिरडी हे संस्थान ॥१॥**

**ब्रह्मरूप गुरु साईनाथ ते**
**अनाथ भक्तां हृदयी धरिते**
**शरणागत ना विन्मुख जाई –**
**गायी नित्य गुणगान ॥२॥**

**रंजले गांजले जे जे आले**
**कृपाप्रसादे पावन झाले**
**श्री दत्ताचे रूप देतसे –**
**भक्तांना वरदान ॥३॥**

फकीर वेष धारण करून शिरडीत आलेला अवलिया भक्तांचा भगवान बनला. जो जो रंजला गांजला तो तो साईचरणी पातला आणि साईनाथे उद्धरिला भक्त आपुला, अशी सारी स्थिती होऊन गेली. साईबाबांची कीर्ति चहुकडे पसरली. दशदिशांतून भक्तांच्या रांगा शिरडीकडे लागल्या; जो तो तन्मयतेने एकच गीत गावू लागला.

॥७॥

**भगवान भगवान साईनाथ भगवान**
**करा या नरजन्माचे कल्याण,**
**भगवान, करा या**
**नरजन्माचे कल्याण ॥धृ॥**

**तुम्हीच भोळे सांब सदाशिव**
**तुम्हीच विष्णू पालक राघव**
**प्रतापती हा देई भक्तीला –**
**कलियुगी जीवदान ॥१॥**

जात-पात ना धर्म तुम्हाला
माय-बाप हो तुम्ही आम्हाला
साई म्हणूनी प्रसिद्ध झाला –
केलीत लीला छान ॥२॥

एक मागणे तुमच्यापाशी
मन राहो तव चरणापाशी
सदासर्वदा जेथे-तेथे –
राहो अनुसंधान ॥३॥

नको नको मज आणि काही
साईनाथ हे माझे आई
तुझ्या कृपेची दिव्य रजाई –
पांघुरली मी छान ॥४॥

तुम्ही लपविले रूप आपुले
कळू न दिधले इतुके इवले
तरीही नाथा मी ओळखिले –
हे श्री दत्ताचे ध्यान ॥५॥

काम क्रोध रिपू मला ग्रासती
माया ममता पाय ओढीती
या संकटातूनी न्या हो पुढती –
गाया दत्तगुरुंचे गान ॥६॥

इकडे शिरडीत साईबाबांची लीला रंगली आणि तिकडे अक्कलकोटात ज्ञानाची पहाट फुटली. एक अजानबाहू सतेज मूर्ती अक्कलकोटात अवतीर्ण झाली. उंचपूरा बांधा, गोरीपान शरीरयष्टी, अत्यंत सतेज असे मुखकमल आणि अजानबाहू अशी ही दत्तमूर्ती अक्कलकोटला येऊन दाखल झाली आणि एका विशाल औदुंबर वृक्षाखाली जाऊन बसली. अहाहा ! काय वर्णन करावं ते तेज.... त्रैलोक्याचं सारं सुख जणू एकाच ठिकाणी सामावलं आहे, असंच ते रूप. कवी म्हणतो....

॥८॥

सौख्यकारी दु:खहारी – देव दत्तात्रेय
गिरीधारी दत्तात्रेय गिरीधारी ॥धृ॥

चराचरातील अणूरेणूवर
सदैव वसले दत्त दिगंबर
रूप मानवी धरती मनोहर –
स्वामी समर्थ कैवारी ॥१॥

अक्कलकोट ती नगरी सुंदर
विशाल छाया धरी औदुंबर
त्या वृक्षाच्या तळी बैसली –
योगमूर्ती गोजिरी ॥२॥

विशाल छाती अजानबाहू
अमृत दृष्टी घाली न्हावू
शरण आला तो पावन झाला –
अवघा संसारी ॥३॥

योगसाधना नको कराया
देव दुसरा नको पुजाया
चरण आम्हाला आज –
गवसले मंगल सुखकारी ॥४॥

ज्याप्रमाणे साईबाबा कुठून आले, ते कोण होते हे कुणाला कधीच कळले नाही, त्याचप्रमाणे स्वामी समर्थांचाही थांगपत्ता कधीच कुणाला लागला नाही. सारेजण त्यांना स्वामी समर्थ म्हणून संबोधित. मात्र स्वामींच्या पुनीत वास्तव्याने अक्कलकोट नगरी एक महान तीर्थक्षेत्रच होऊन गेले होते यात शंकाच नाही.

॥९॥

अक्कलकोट हे द्वार जाहले –
भूवर मोक्षाचे
इथे राहिले समर्थ येऊन –
स्वामी अनाथांचे ॥धृ॥

योगमंदिरी तुझ्या उजळती –
दिक्‌कालाच्या दिशा
रोज उगवते प्रभात हसरी –
मोद प्रमोदित उषा
पदांगुले ती गमती मनुजा –
सागर सौख्याचे ॥१॥

श्रीपाद वल्लभ दत्तदिगंबर –
नृसिंह सरस्वती झाले गुरुवर
समर्थ स्वामी म्हणूनी नंतर –
प्रगट जाहले येथे यतिवर
चैतन्याचे रूप मनोहर –
हे कौतुक आनंदाचे ॥२॥

अजानबाहू मूर्ती दिगंबर –
उष:कालाचे हास्य मुखावर
नित्य वंदिती येऊनी सूरवर –
योगीराज हा दिव्य मनोहर
स्वानंदाचे बिंब धरेवर –
रूप हे दत्तगुरुंचे ॥३॥

शिरडीत ब्रह्मावतार श्री साईनाथमाऊली प्रगट झाली. अक्कलकोट नगरीत विष्णुमूर्ती येऊन दाखल झाली. मग शिवाने गप्प कसे बरे बसावे?

माघ महिन्यातील वद्य सप्तमीचा दिवस होता. आकाशात सूर्याचा लालीलाल गोळा भयंकर तप्त झालेला होता. जमिनीवर जणू निखारेच ओतीत होता. अशा वेळी शेगांव नगरीत पातुरकरांच्या घरासमोरील पिंपळ पारावर एक अजानबाहू सतेज योगमूर्ती बसून उष्ट्या पत्रावळीतील अन्नकण वेचीत होती. योगाचे महातेज चेहऱ्यावर पसरलेले. अजानबाहू आणि भरदार छाती अशी ही अनाम योगेश्वराची मूर्ती उन्हात तिथे बसली होती. आपल्या लाडक्या भक्तांवर मायेची पाखर घालायला कैलासपतींनी शेगांवी धाव घेतली होती. मुखाने ''गणगण गणात बोते'' हे भजन चाललेले, बाकी काहीसुद्धा बोलणे नाही. त्यांच्या या सततच्या भजनामुळेच लोकांनी त्यांना 'गजानन महाराज' हे नाव दिले. शेगांवी गजानन महाराज प्रगट झाले. शेगाव नगरी पावन झाली. या योगमूर्तीपुढे माथा टेकीत कवी दान मागतोय.

॥१०॥

गजानना तव नितस्मरणाने –
हरूनी जाती चिंता
कृपाळा होई वरदाता,
कृपाळा होई वरदाता –
आम्हासी होई वरदाता ॥धृ॥

शेगांवी नित करीसी वस्ती
पावन केली तिथली धरती
त्या धरतीच्या कणाकणावर –
वास तुझा पुरता ॥१॥

अनन्यभावे येता शरण
हृदयी धरसी भक्त रमणा
तुझ्या स्तुतीला शब्द न आता –
अवतारी दत्ता ॥२॥

श्री दत्ताची सगुण मूर्ती
कलियुगी तव अगाध कीर्ति
गगनचुंबी त्या तव कीर्तिचा
ध्वज फडके आता ॥३॥

वरदराज तू स्वामी गजानन
तूच भासरी अत्रिनंदन
तुझ्याविना का असे वेगळा –
दत्त दयाघन नाथा ॥४॥

ही अनाम योगेश्वराची मूर्ती शेगांवी अचानक कशी काय प्रगट झाली? कुठून आले हे? यांचे नाव-गाव काय? जात-पात

तरी कोणती असावी बरं? यांचे गुरु कोण असावेत? हे आणि ह्यासारखे अनेक प्रश्न सामान्य आणि असामान्य अशा सर्वच प्रकारच्या लोकांच्या डोक्यात थैमान घालीत होते. पिंगा घालीत होते. महाराज मात्र गप्प होते. अखेरपर्यंत या अनाम योगेश्वराने कुणाला कसलीच दाद लागू दिली नाही. चैतन्याचे हे आगळे रूप अनाम बनून शेगांवी सतत तळपत राहील. काहीतरी संबोधनात्मक नाव असायलाच हवं म्हणून 'गजानन महाराज' ही शेगांवकरांनी त्यांना बहाल केलेली उपाधी, अन्यथा ते अनामच होते. त्यांचा वेष, त्यांच्या लीला सारंकाही अजब आणि अतर्क्यच होते. त्यांच्याबाबतीत म्हणायचं झालं तर इतकंच म्हणता येईल....

॥११॥

नाव गाव ना जया उपाधी –
चैतन्याचे रूप
शेगांवी त्या असे प्रगटले –
एक नवे कौतुक ॥धृ॥

वेष बावळा किती वेंधळा
ज्ञान हिरा तो आत लपविला
अन्न ब्रह्म हे शिकवूनी गेला –
करूनी कृती आपसुक ॥१॥

कधी वेदांती होऊनी वदती
गण गण गाऊनी भजनी रमती
कधी मौनी वा शयनी दिसती –
कधी भ्रमंती खूप ॥२॥

लीला घडविती जनाकारणे
मोह नसे नव शरीरी वसने
भक्तिस्तव हे घडले येणे –
भक्तिची त्या भूक ॥३॥

चराचरातील कणाकणावर वास्तव्य असलेल्या चैतन्यघन दत्तात्रेयांच्या अवतारकार्याचा आपण इथवर आढावा घेतला. दत्तगुरुंनी यापुढेही अनेक अवतार धारण केले. माणिक प्रभु, हुमणाबाद, पंत बाळेकुंद्री महाराज, बेळगांव, वासुदेवानंद सरस्वती ऊर्फ टेंबेस्वामी, साटम महाराज, दाणोली इत्यादी. त्यापैकी अर्वाचीन काळातले प्रमुख अवतार म्हणता येतील, परंतु ह्या सर्वच अवतारकार्याचा आढावा आपल्याला इथे घेता येणे शक्य नाही. मुख्य तीन अवतारांची माहिती आपण इथे करुन घेतली. आता त्या दत्तगुरुंना आपण प्रेमभराने एक आरती गाऊ या.

॥१२॥

चिदानंद तू हे ॐकारा –
ब्रह्मस्वरूपा जीवनाधारा
चरणी आलो तुझ्या प्रभुवरा –
घेऊन पंचारती
गावू या दत्ताला आरती –
गावू या दत्ताला आरती ॥धृ॥

मुलाधार जे कमल विकसले
प्रभु येऊनी तिथे बैसले
घेऊन चक्र सुदर्शन हाती –
घेऊन चक्र सुदर्शन हाती ॥१॥

ब्रह्मा, विष्णु आणि महेश्वर
तिन्ही देवांचा संगम सुंदर
दत्तगुरुंच्या सदैव पूजनी –
तिघेही संतोषती ॥२॥

कलियुगी हा एकच ईश्वर
दाही दिशांना दत्तदिगंबर
दत्तपूजनी जीव साधतो –
सुखदुःखातून मुक्ति ॥३॥

भावभक्तिने आळवी खरोखर
दर्शन देती त्याला प्रभुवर
आनंदूनी या प्रेमभराने –
आशीर्वचन देती ॥४॥

सर्व चराचरावर मायेची पाखरण घालणारी दत्तमूर्ती सदा भ्रमंती करीत असते. सकाळची स्नान-संध्या गाणगापूरला अमरजा संगमात, तर दुपारची भिक्षा कोल्हापूरात आणि विश्रांती माहूरगडावर असा रोजचा त्रिस्थळी कार्यक्रम ठरलेला. अशा या दत्तराजाला आपलासा करावयाचा असेल तर ध्यानी-मनी सदैव त्याला आठवला पाहिजे. स्वहृदय हेच दत्ताला विश्रांतीस्थान म्हणून बहाल केले पाहिजे. मग पंढरीला जायला नको की आळंदी, गाणगापूर अशी तीर्थक्षेत्रे फिरत बसायला नको. दत्तनामाने आपली कुडीच जर तीर्थक्षेत्र बनवून टाकली तर तो भक्तवत्सल कुठे जाणार आहे! म्हणून म्हणतो....

॥१३॥

नको पंढरी, नको आळंदी,
नको गाणगापूर
गृह नव्हे हे, माझे हे तर
दत्ताचे माहूर ॥धृ॥

निजनयनी या दत्तदयाघन
भक्तिसरिता त्यातच स्नान
विश्रांतीस्तव हृदयाविण या –
नाही जायचे दूर ॥१॥

श्वास हे वदले अत्रिनंदन
निःश्वासाचा सूर दयाघन
हृदयस्पंदनी नित्यच येतो –
भक्तिरसाचा पूर ॥२॥

सदासर्वदा घुमे पायरव
जगणे त्याच्याविना असंभव
तन-मन माझे गेले होऊन –
दत्तपदी नुपूर ॥३॥

मानवी देह हा तर प्रपंचाचा दास. त्या बिचाऱ्याला करु द्या ना सुखाने काम. त्यात आडकाठी कशाला! भक्तीला या कशाची जरुरी नाही. हाताने काम आणि मुखाने नांम घेत रहावे, म्हणजे मग तो घनःश्याम आपोआपच आपला होतो. वासनांचा काळा पत्थर नामाचा सुरुंग लावून फोडून टाकला की मग हृदयातील सुंदर स्वर ओठावर उमटतात.

॥१४॥

हृदयाच्या कोंदणात स्वर
धुंद उमटले पर-ब्रह्म रूप
मनी दत्तध्यान आठवले ॥धृ॥

अत्रितनय सुकुमार –
योगीराज योगेश्वर
व्यापूनिया हा उरे –
अणूरेणू चराचर
योगीराज दत्तात्रेय –
दत्तराज दिगंबर
ध्यानी-मनी तेच रूप –
मी मनात साठविले ॥१॥

सत्व, रज आणि तम –
हो एकरूप संगम
राग, लोभ, मद, मोह –
मत्सर आणि दंभ
ह्या सर्वांहूनी हा –
योगीराज निःसंग
तो योगीराज दत्तात्रेय –
ध्यानी-मनी त्या धरिले ॥२॥

युग कली अविचारी –
तिकल बुद्धी हो भारी
सर्वांतूनी तारक हा –
दत्तात्रेय याच घरी
चिरंजीव दिव्य ध्यान –
धरूनी सदा अंतरी
शब्द शब्द एकवटूनी –
गीत त्यास गायिले ॥३॥

मानवी मनाची पहिली खरी ओळख झाली तेव्हापासून माझ्या मनात ठसली ती एकच दत्तमूर्ती. तेव्हापासून आजपर्यंत ते प्रेम वाढतच गेले. मी अधिकाधिक दत्तचरणांकडे ओढला गेलो आणि माऊलीनेही माझी सतत पाठराखण केली. ज्ञानाची ओळख झाली आणि दत्ताचे प्रतीकात्मक रूप दिसले. मन आनंदाने अधिकच सुखावले. भक्तीत अधिकच रंगून गेले. शतजन्मीची भक्ति पुन्हा अंकुरली.

॥१५॥

शतजन्मीचे दैवत माझे –
अत्रिपुत्र सुकुमार
दत्त हा माझा जीवनाधार,
दत्त हा माझा जीवनाधार ॥धृ॥

दत्त, गजानन, स्वामी, जगती
पदांगुले ती एकच दिसती
साईनामे पुन्हा भरविती –
शिरडीचा दरबार ॥१॥

कलियुगीच्या विषवाजारी
मूर्त होऊनी अमृत पसरी
शेगांवी त्या गजाननाचा
चाले जयजयकार ॥२॥

कोठून आला, कुणा न ठावूक
कर्दल बनीचे स्वामी कौतुक
अक्कलकोट हे करूनी स्थानक –
घडवी साक्षात्कार ॥३॥

तीन रूपे ही श्री दत्ताची
साई स्वामी शेगांवाची
मूर्त दैवते कलियुगीची –
पतितांना आधार ॥४॥

अमृताहूनही अवीट गोडी असले माझ्या दत्तगुरुंचे नाव सदैव मुखी असावे. क्षणभरही मला त्या चरणांचा विसर पडू नये आणि अवघे जीवनच दत्तमयी होऊन जावे. दत्तगुरुंचे नाम गात गात मी त्या नामातच एकरूप होऊन जावे. अवघे जीवनच दत्तमयी व्हावे, हीच अंतिम इच्छा आहे.

॥१६॥

श्री दत्ताचे नाम गात हे
जीवन संपून जावे
मी दत्तमयी व्हावे,
मी दत्तमयी व्हावे ॥धृ॥

अत्रितनय हा तीन गुणांचा
मालक शोभे त्रैलोक्याचा
चरणी त्याच्या सदा सदोदित –
तल्लीन मी व्हावे ॥१॥

गात गात हे नाम सुखाचे
आयु सरावे उरले माझे
अमृतमय त्या कृपादृष्टीचे –
दर्शन मज व्हावे ॥२॥

सत्व रजासह तमोगुणांचा
संगम शोभे त्रैलोक्याचा
झरा वाहतो सदा सुखाचा –
त्यातच मी न्हावे ॥३॥

मी तर पामर मूढ अज्ञानी
लीन जाहलो सदैव चरणी
त्या चरणांची प्रीत धरूनी –
गाणे मी गावे ॥४॥

दत्तरूपाचा असा ध्यास लागल्यावर मग माऊली दूर कुठे जाणार बरं? ध्यानी-मनी-स्वप्नी सदैव दत्तमूर्ती दिसू लागते. भक्त मनोमनी सुखावतो व त्याला आपले जीवन सुफलीत झाल्यासारखे वाटू लागते, आणि मग आपोआपच त्याच्या ओठांवर कळत-नकळत भावभरले शब्द उमटतात....

॥१७॥

त्रैलोक्याचे ध्यान मनोहर –
स्वप्नी मी पाहिले
माझे जीवन सुफलीत झाले,
माझे जीवन सुफलीत झाले ॥धृ॥

कटी मेखला आणि पितांबर
चंदन चर्चित कांती सुंदर
जटा बांधल्या तीन शिरावर –
पाहूनी मन भुलले ॥१॥

श्वान जाहले वेद चार ते
धर्मचिन्ह जणू गाय शोभते
त्रैलोक्याचे ध्यान धरेवर –
दर्शन देण्या आले ॥२॥

रुद्राक्षांच्या गळ्यात माळा
त्रिशूल चक्र तो हाती धरिला
वरदहस्त तो धरीत शिरावर
पावन मज केले ॥३॥

अत्रितनय ते दत्त दयाघन
चरणी त्याच्या अर्पिन तन-मन
श्वासोश्वासे दत्त दयाघन –
मन दत्तमयी झाले ॥४॥

क्षणकाल भक्तिसागरात बुडून गेलेल्या माझ्या ज्ञानवंतांनो, रसिक भक्तिसाधकांनो, दत्तजन्मगीताने सुरू केलेला आजचा हा गुरुभक्ती यज्ञ एक एक भावफुलाची आहुती देत देत आपण केव्हा पूर्णाहूतीपर्यंत घेऊन आलो ते आपल्याला कळलेच नाही. खरोखरच, जे खऱ्या अर्थाने अशा या भक्तिगंगेत न्हावून निघाले असतील ते रसिकराज खरोखरीच धन्य. आता आपण या भक्तियज्ञात अखेरचे काव्यपुष्प समर्पित करून आजच्या या भक्तियज्ञाची सांगता करणार आहोत. या भावपुष्पाचे बोल आहेत....

॥१८॥

श्री दत्ताचे चरण उमटले –
आज अभाग्याघरी
धन्य मी झालो संसारी –
धन्य मी झालो संसारी ॥धृ॥

दत्त दत्त या एकचिंतनी
दत्तमयी मी गेलो होऊनी
दत्त दयाघन राही येऊनी –
हृदयाच्या मंदिरी ॥१॥

श्वास हे वदले दत्त दयाघन
नि:श्वासातही सदैव गूंजन
भावभक्तिने मूर्ती जन्मून –
रमली या अंतरी
चरण प्रभुंचे सदैव नयनी
दत्ताविण ना दैवत जीवनी
चराचराचा उगम जेथूनी –
रूप सदा ते उरी

– तत् सत् –

# विसरू कसा मी गुरुपादुकांना !

- श्री. गजानन कुलकर्णी

ऐहिक जीवनातील सर्वप्रकारची सुखे प्राप्त झाली तरी मानवी मनास एकप्रकारची हुरहूर नेहमीच लागून राहिलेली असते. त्याच्या मनाची ही हुरहूर, ही अस्वस्थता म्हणजेच त्याच्या मानवजन्माची सार्थकता मानण्यात आलेली आहे. माणूस म्हणजे केवळ लोह, चुनखडी, अभ्रक, गंधक, चरबी, रक्त यांचा गोळा नव्हे किंवा पृथ्वी, आप, तेज, वायु व आकाश यांचा संघात म्हणजे मनुष्य नव्हे. हा मानवी देह म्हणजे परमात्म्यास मिळण्याचे एक साधन आहे. हा मानवी देह आहे म्हणून आत्म्यास स्थिरावण्यास तरी जागा आहे. नाहीतर समर्थांनी म्हटल्याप्रमाणे हा देह नसता तर आत्मा ठायी ठायी विरुन गेला असता. म्हणूनच या मानवी देहाचा गौरव वेदांतून आणि उपनिषदांतून अनेकदा केलेला दिसतो.

आपल्याला प्राप्त झालेला हा पवित्र देह म्हणजे परमेश्वराचे निवासस्थान आहे. सर्व प्रमुख देवता ह्या मानवी देहात वावरत असतात. म्हणून तर प्रत्येक साधक उपासनेस प्रारंभ करण्याआधी न्यास-मुद्रा यांच्या सहाय्याने त्यांना जागृत करीत असतो. उपासना हा शब्द उप+आस् = बसणे, जवळ जाणे, प्रवेश करणे या अर्थाने रूढ आहे. इष्ट-देवतेच्या जवळ जाणे, तिच्याशी एकरूपता साधणे, या ऐक्यातला आनंद भोगणे, हे उपासकाचे ध्येय असते. जीवाने अनन्य होऊन, लीन होऊन, सर्वसत्तात्मक प्रभुशी अनन्य असणे हे उपासनेचे महत्त्वाचे अंग आहे. आपल्या आराध्य दैवताशी शास्त्रशुद्ध पद्धतीने ऐक्यभावाच्या अनुभवासाठी केलेली भक्ती म्हणजे उपासना, असे थोडक्यात म्हणता येईल.

यजुर्वेदात मानवी देहास ऋषिभूमी, तर अथर्ववेदात देवपुरी असे म्हटले आहे. वेद आणि उपनिषदे यामधून तर देहास ब्रह्मपुरी म्हणूनच गौरविले आहे. याच दैवी नौकेवर आरुढ होऊन आपल्याला मुक्काम गाठायचा आहे. या देहाचे फाजिल लाड न करता, त्याच्या आधीन न होता, त्याच्या साह्याने भजन, पूजन, नामस्मरण, ध्यानधारणा इत्यादींच्या साह्याने परतत्वाशी जवळीक साधणे, त्याच्यात एकरूप होणे, त्याच्याशी सुसंवादित्व राखणे हाच मानवी मनाचा उद्देश असून तेच तर उपासनेचे मुख्य उद्दिष्ट आहे.

या उद्देशाला अनुसरूनच उपासनेचे रूप निश्चित होत असते. जीवाने शिवाशी एकरूप होणे, आत्म्याने परमात्म्याशी मिळून जाणे यासाठी विविध प्रकारची साधना करणे, प्रसंगी सर्वस्व अर्पण करण्याची तयारी असणे, केवळ ईश्वराच्या अनुभूतीसाठी, साक्षात्कारासाठी सर्वस्वाचा त्याग करून अखंड एकाग्र होणे हे उपासनेचे एक प्रधान रूप आहे. केवळ मुक्तीच्या हेतूने केलेली ही उपासना निष्काम उपासना म्हणून प्रसिद्ध आहे.

श्रेष्ठ साधक वा मुमुक्षू यांना अनेकदा असा निष्काम उपासनेचा ध्यास लागलेला दिसतो. रानावनात जाऊन, गिरिकंदरात राहून, ध्यानधारणा करून, अव्यक्त तत्वाचे चिंतन करणारे मुमुक्षू साधक निर्गुण-निराकाराच्या उपासनेत दंग झालेले असतात. दत्तसंप्रदायात असे अनेक योगी आजवर निर्माण झाले आणि आजही होत आहेत. यांचा सर्व भर योगधारणेवरच असतो. वेद, उपनिषदे यांतून याच निर्गुण तत्वाची उपासना सांगितलेली दिसते. हठयोग, तारकयोग, लययोग, राजयोग इत्यादी योगांची साधना त्यासाठी केली जाते.

स्वत: दत्तात्रेयांनीच ही योगविद्या निर्गुण निराकाराच्या उपासनेसाठी सांगितली आहे. नाथपंथियांची उपासना याच निर्गुण तत्वावर आधारलेली आहे. स्वत: दत्तात्रेय हे अवधूत, दिगंबर, गगनमठीचे योगी असल्याची वर्णने सर्वत्र पहायला मिळतात.

दत्तगुरुंचे रुप **'नित्यं शुद्धं निराभासं, निराकारं, निरंजनम्'** असल्याचे गुरुगीता सांगते. हा श्री गुरु **'चैतन्यं, शाश्वतं, शान्तं व्योमातीतं, निरंजनं, नादविंदुकलातीतम्'** असल्याची साक्ष श्री गुरुगीतेत आहे. हा श्री दत्तगुरु कसा आहे? तर, **'अखण्ड मण्डलाकारं, व्याप्तं येन चराचरम्'** असा आहे. त्याने चराचर व्यापिले आहे, खंडित न होणाऱ्या वलयाकार मंडलात तो भरून राहिला आहे. तो गुणातीत आहे, रुपवर्जित आहे, अशीच श्रद्धा या निर्गुण-निराकाराचे ध्यान करणारांची असते.

परमात्म्याचे वा परब्रह्माचे हे अव्यक्त रुप फार तर प्रणवाच्या वा ॐकाराच्या दर्शनाने कल्पूनही निराकाराची, अव्यक्ताची, गुणातीताची उपासना चालते. प्राचीन यज्ञयागांत आणि मंत्रतंत्रांत या ॐकारास फार प्राधान्य देण्यात येत असे. अ, ऊ, म ह्या तीन अक्षरांत दत्तात्रेयांच्या तीन मुखांचे रुप साधकांना जाणवते. ॐ हे ब्रह्मस्वरुपाचे चिन्ह असल्यामुळे केवळ याचाच जप निश्चिंत चित्ताने एकांतात राहून करणारे अनेक साधक आहेत. कठोपनिषदात म्हटले आहे :

**'सर्वे वेदा यत्पदमामनन्ति। तपांसि सर्वाणि च यद्वदन्ति। यदिच्छन्तो ब्रह्मचर्यं चरन्ति। तत्त पदं संग्रहेण ब्रवीम्योमित्येतत्'** म्हणजे, सर्व वेद ज्या पदाची घोषणा करतात, सर्व तपे ज्याबद्दल बोलतात, ब्रह्मचारी ज्याची इच्छा करतात, ते पद संक्षेपाने ॐ हेच आहे. म्हणूनच पातंजल योगात **'तस्य वाचक: प्रणव:'** म्हणून ॐकारास ब्रह्मप्राप्तीचे साधन मानले आहे. वेदांचा आरंभ आणि वेदांचे पर्यवसान ॐकारातच असल्याने त्यास अव्यक्त उपासनेत महत्त्वाचे स्थान मिळाले आहे.

अव्यक्ताची, निर्गुणाची, निराकाराची ही उपासना कितीही श्रेष्ठ गणली गेली असली तरी ती फार थोड्यांनाच साधते. संसारी माणसाला त्यात अजिबात रस नसतो. गृहस्थाश्रमी साधकाची उपासना प्रामुख्याने ऐहिक सुखासाठीच चाललेली दिसते; कुणाला संतती, कुणाला आरोग्य, कुणाला धनदौलत, सत्ता, वैभव, कन्या-पुत्र यांचा

मोह असतो आणि त्या त्या लौकिक लाभासाठी ते ते संकल्प नित्याच्या पूजेत वा व्रताचरणात करणारे साधक आपल्याला नेहमीच दिसतात. श्री दत्तात्रेयांच्या उपासनेत निष्काम व सकाम उपासना करणारे असे दोन्ही प्रकारचे साधक आढळून येतात. यात बहुतेक प्रापंचिकांचा कल सकाम उपासनेकडेच असतो. दत्तदैवत हे त्वरित पावणारे, स्मरण करताच कृपावंत होणारे, इच्छिलेली वस्तू देणारे असल्यामुळे त्याच्याभोवती सकाम भक्तांचाच भरणा जास्त दिसतो; आणि म्हणूनच दत्तसंप्रदायाच्या श्री गुरुचरित्रादी साधनग्रंथात गायत्रीच्या उपासनेस नित्याच्या कर्मकांडातही फार महत्त्व दिलेले दिसते.

सविता म्हणजे सूर्य ही मुख्य देवता असलेल्या या मंत्राचे अनुष्ठान या उपासनाप्रकारात येते. संध्योपासनेत या मंत्राचा जप करावयाचा असतो. ॥ ॐ **तत्सवितुर्वरेण्यं भर्गोदेवस्य धीमहि । धियो यो नः प्रचोदयात् ॥** (ऋग्वेद, ३.६२-१०) सर्व चराचराला प्रेरणा देणारा जो सूर्यदेव त्याचे सर्वांना प्रिय व अवर्णनीय असे श्रेष्ठ तेज आहे. त्याचे ध्यान कर्तव्यबुद्धीने आम्ही करतो. तो सवितादेव भगवान सूर्य आमच्या बुद्धीला आणि ध्यानभक्तीला उत्तम प्रेरणा देवो ! असा या मंत्राचा अर्थ आहे. पापांचा परिहार, देह-मनाची शुद्धी व तेजाची प्राप्ती यासाठी हा जप करावयाचा असतो. जपापूर्वी **'आपो ज्योतीरसोऽमृतम् ब्रह्म भुर्भुवः स्वरोम्'** या मंत्राचे पठन आणि **'ॐकार'** व **'भूर्भुवस्वः'** ह्या व्याहृती यांचा उच्चार करावयाचा असतो.

ही गायत्री वर देणारी व ब्रह्मस्वरुपिणी आहे. गय-प्राण, त्रै-वाचविणे यावरून प्राण वाचविणारी, रक्षण करणारी ती गायत्री असे मानले जाते. त्रिपदा, म्हणजे तीन चरणांची गायत्री ही वेदांचे मुख असून हिच्याच साह्याने ब्रह्मत्वाची प्राप्ती होते. या अमृत मंत्राने तेजोभास्कराची आराधना केली जाते. सर्व चराचर विश्वाचा आधार सूर्य आहे. मानवाच्या मानसिक क्रियांची प्रेरणाही सूर्य आहे. योगदर्शनात तर सूर्य हे आत्म्याचे प्रतीक मानले आहे. म्हणून गायत्रीच्या साधनेने प्राण, मन, बुद्धी व आत्मा यांची जोपासना होते. गायत्री व प्राण यांचे तादात्म्य वैदिक वाङ्मयात अनेक ठिकाणी दिसते. कित्येकदा गायत्रीला सावित्री असेही म्हटलेले आढळते.

या गायत्री मंत्राची अक्षरे चोवीस असल्याने चोवीस लक्षांचे गायत्री पुरश्चरण अनेक साधक करतात. जप, होम, तर्पण, मार्जन व ब्राह्मण-भोजन अशा पांच अंगांच्या विधीला पुरश्चरण म्हणतात. या विधीस जागा कोणती असावी, संकल्प कसा असावा, आसन कसे असावे, जपमाळेचे मणी किती असावेत, कामनेप्रमाणे हवन द्रव्ये कोणती असावीत इत्यादी गोष्टींचे मार्गदर्शन धर्मशास्त्राने उत्तमप्रकारे केले आहे. या गायत्रीच्या जपामुळे परब्रह्माची प्राप्ती होते. म्हणूनच भीष्म पितामहापासून अर्वाचीन काळातील रविन्द्रनाथ ठाकूरांपर्यंतच्या महान पुरुषांना गायत्री मंत्राने प्रभावित केलेले आपणास दिसते. देवी-भागवतापासून श्री गुरुचरित्रापर्यंतच्या सर्व प्रमुख ग्रंथांनी गायत्रीच्या उपासनेचा महिमा वर्णन केला आहे. ऋषी विश्वामित्रांनी प्रभु रामचंद्रालाही या गायत्रीचा उपदेश दिला होता आणि स्वतः भगवान श्रीकृष्णाही गायत्रीचा जप करीत असत. ह्या उदाहरणांवरून या मंत्राचा महिमा लक्षात यावा.

गायत्री मंत्रातील प्रत्येक अक्षरामध्ये जबरदस्त ताकद आहे. या ताकदीचे रहस्य अनेकांनी उलगडून सांगण्याचा प्रयत्न केलेला आहे. **'ओमित्याक्षरं ब्रह्म'** हे तर आपण जाणून घेतलेच आहे. **'ओमित्येवं ध्यायथ आत्मानम्'** ॐच्या द्वारा परमात्म्याचे ध्यान करा, असे मण्डुकोपनिषदात म्हटले आहे. 'अ' म्हणजे विराट अग्नि, विश्व; 'उ' म्हणजे हिरण्यगर्भ, वायु, तेज, चित्; 'म' म्हणजे ईश, प्राज्ञ, आदित्य, आनन्द असे ॐचे अर्थ सांगण्यात येतात.

या गायत्री मंत्रापूर्वी भूः, भुवः व स्वः ह्या तीन व्याहृती असून प्रत्येकाचा अर्थही येथे स्पष्ट केला जातो तो असा, भूः म्हणजे प्राणाधार; स्वयंभू, सत्; भुवः म्हणजे दुःखमुक्त करणारा, चित्त, अपान; आणि स्वः म्हणजे सुखदाता, कल्याणकर्ता, व्यान, ब्रह्म. ह्या तीन व्याहृतींचा एकत्र अर्थ असा की, हे रक्षक, प्राणाधार, दुःखनाशक, सुखदाता, सत्-चित्-आनंद भगवान् !

गायत्री मंत्राच्या पहिल्या पदात, म्हणजे चरणात सवितुः, वरेण्यम्, भर्ग व देवस्य असे चार शब्द असून प्रत्येकाचा अर्थ सांगण्यासारखा आहे. सविता म्हणजे अग्नि, तेज, प्राण, विद्युत्, सूर्य असा आहे. जन्म देणारा, प्राण राखणारा, सर्वांचे रक्षण करणारा, म्हणजे सविता. सर्वांचा स्वामी म्हणजे सविता. वरेण्यम् म्हणजे सेवा करण्यास, वर्णन करण्यास योग्य. भर्ग म्हणजे शुद्ध, अनेकविध ऐश्वर्य, पाप नष्ट करून आनंद देणारा असा अर्थ सापडतो. भर्ग प्रकाशवाचक व ज्ञानरुप आहे. देवस्यमधील देव म्हणजे प्रकाशदायी, आनंददायी, आल्हादकारक असा घ्यावा. तर 'धीमहि' म्हणजे ध्यान करणे, चिंतन करणे. अशाप्रकारे आपल्याला सर्व शब्दांचा वा अक्षरांचा अर्थ लावता येतो.

**'धियो यो नः प्रचोदयात्'** म्हणजे आमची बुद्धी, आमची कृती, तुझ्याकडून प्रेरित होवो, अशी सर्वश्रेष्ठ प्रार्थना आहे. असा हा अत्यंत पवित्र आणि सर्वश्रेष्ठ असा गायत्री मंत्र आहे. या प्रख्यात गायत्री मंत्राने अनेक दत्तभक्तांनी निर्गुण-निराकाराची उपासना केली असून सर्वश्रेष्ठ अशा परमपदाची प्राप्ती करून घेतलेली आहे. सर्व संसारी गृहस्थाश्रमी साधकांच्या ध्यानी या गायत्री मंत्राचे सामर्थ्य यावे यासाठीच हा सारा उहापोह येथे केला आहे. माझ्या दत्तसंप्रदायी साधकांनी याचा जरुर खोलवर विचार करून या मंत्राची साधना करावी. त्यांना निश्चितच याचा उपयोग होईल.

दत्तसंप्रदायाच्या भक्तिसाधनेबाबत टप्प्याटप्प्याने एकेक मुद्यांवर विचार करीत आपण येथवर आलो. आता या उपासनेतील गुरुचरणसेवा किंवा पादुकामाहात्म्य जाणून घेऊन आपण विराम घेऊ या ! श्री दत्तगुरुंच्या उपासनेत पादुकापूजनास फार महत्त्व आहे. श्री दत्तात्रेय हे गुरुस्वरुपातच प्रथमपासून सर्वत्र संचार करीत असल्यामुळे त्यांच्या चरणपूजेचा महिमा वाढलेला आढळून येतो. श्री दत्तात्रेयांनी आपण चोवीस गुरु करून प्रत्येकापासून एकेक गुण घेतला असे सांगितले असले तरी स्वतः दत्तात्रेय हे चराचराला बोध देणारे सर्वश्रेष्ठ, महान असे जगद्गुरु आहेत, सर्व यच्चयावत् गुणांचा समुच्चय त्यांच्याठायी एकवटलेला आहे.

म्हणून दत्तात्रेयांचे हे गुरुरुप वा गुरुतत्व जाणून घेतल्याखेरीज सर्व जपतपादी साधने, तीर्थयात्रा व्यर्थ आहेत.

'सर्वपापविशुद्धात्मा, श्रीगुरो: पाद्सेवनात् ।' श्री गुरुचरणांच्या सेवेतून सर्व पापांपासून अंत:करण शुद्ध होऊन जाते. गुरुचरणांवरील पाणी मस्तकावर घेतले तर सर्व तीर्थांत स्नान केल्याचे फळ मिळते. गुरुचरणतीर्थ पापरुपी चिखलाला सुकविणारे पापहारक असून ज्ञानरुपी तेजाला उज्ज्वल करणारे आहे. गुरुपादोदकाने ज्ञान आणि वैराग्य यांची प्राप्ती होते. म्हणून तर श्री गुरुंच्या चरणांचे तीर्थ नित्य घ्यावे असा श्री गुरुगीतेतला भावार्थ आहे.

**'जान्हवी चरणोदकम्'** असे गुरुगीताच म्हणते. **'गुरो: पादोदकं यत्तु, गयाऽसौ सोऽक्षयो वट:'** हे श्री गुरुगीतेचे वचन आहे. श्री गुरुंचे चरणतीर्थ म्हणजे प्रत्यक्ष प्रयाग तीर्थच होय ! गयेचा चिरंतन वटवृक्ष म्हणजे श्री गुरुच. देवांना दुर्लभ अशा ह्या गुरुचरणांचा सहवास किंवा दुर्लभ लाभ भक्तांना सहजासहजी होतो. **'गुरु र्ब्रह्मा गुरु र्विष्णु गुरुर्देवो महेश्वर: । गुरुरेव परब्रह्म तस्मै श्रीगुरवे नम:'** हा श्री गुरुगीतेतील श्लोक श्री गुरुंचा थोर महिमा सांगून जातो. **'त्वं पिता त्वं च मे माता, त्वं बंधुस्त्वं च देवता'** अशी भावना श्री गुरुसंबंधी असते. श्री गुरुंचे चरणकमल सुख-दु:ख, शीतोष्ण, मानापमान इत्यादी द्वंद्वांपासून होणारा त्रास दूर करणारे आहेत. म्हणून दत्तपंथियांत श्री गुरु आणि त्यांच्या चरणपादुका यांना फार महत्त्व आहे. **'पूजामूलं गुरो: पदम्'** पूजेचे मूलस्थान गुरुचरण हेच आहे.

श्री गुरुंच्या अतिशय मनोहर आणि अल्हादक ध्यानाचे वर्णन गुरुगीतेने ९१ ते ९३ श्लोकांतून सुंदर रीतीने केले आहे. **'हृदंबुजे कर्णिकमध्य संस्थे । सिंहासनेसंस्थितदिव्यमूर्तिम् ॥ ध्यायेद् गुरुं चंद्रकलाप्रकाशं । चित्पुस्तकाभीष्टवरं दधानम् ॥'** हृदयरुपी कमळाच्या देठाच्या मध्यभागी, हृदयसिंहासनावर विराजमान झालेली दिव्य मूर्ती, चांदण्याप्रमाणे आल्हादकारक असलेली, ज्ञानग्रंथ हाती धरलेली व अभीष्ट वर देणारी, अशी श्री गुरुमूर्ती ध्यानात आणावी.

पांढरे वस्त्र नेसलेली, श्वेत चंदनाची उटी लावलेली, पांढरी पुष्पे धारण केलेली, पांढऱ्या मोत्यांच्या अलंकारांनी नटलेली, आनंदाने परिपूर्ण, दोन डोळे असलेली, जिच्या मांडीवर दिव्य आदिशक्ती विराजमान झाली आहे, मंद स्मित असलेली, कृपेचा साठा असलेली ही गुरुमूर्तीच साधकाने ध्यानात स्थिर करावी, ही गुरुगीतेची शिकवण आहे.

तरीसुद्धा दत्तसांप्रदायिकांत गुरुपेक्षा गुरुचरणांनाच महत्त्वाचे स्थान आहे. इस्लामी सत्तेत प्रतिकूल परिस्थिती निर्माण झाल्यावर मूर्तीऐवजी पादुकापूजनाचा विधी सुरु झाला, असे सांगितले जाते, परंतु ते खरे नव्हे. श्री गुरुंच्या अथवा इष्टदेवतेच्या पादुका पूजण्याचा प्रघात फार पूर्वीपासूनचा आहे. श्री राम वनवासात असताना भरताने त्यांच्या पादुकाच सिंहासनावर ठेवून आपला रामाविषयीचा आदरभाव व्यक्त केला होता. दत्तावतारी सत्पुरुषांचे वर्णन 'पूज्यपादा:' या शब्दानेच केले जाते. अतिशय प्रिय व्यक्तीविषयी आदर दाखविताना आजही आपण त्यांच्या पायावर डोके ठेवतो, ते कशासाठी ? यातले आणखी एक रहस्य असे आहे की, श्रेष्ठ सत्पुरुषांची सारी दैवीशक्ती त्यांच्या चरणांत एकवटलेली असते. त्यांच्या चरणस्पर्शाने कंपनद्वारा ती शक्ती भक्तांत संचारत असते. याचा अनुभव आजवर अनेकांना आलेला आहे; आणि म्हणूनच अनेक दत्तस्थानांत दत्तमूर्तीपेक्षा दत्तपादुकांना स्थान मिळालेले दिसते. गिरनारच्या शिखरावर श्री दत्तात्रेयांच्या पादुकाच आहेत. गाणगापूर येथे श्री नृसिंह सरस्वतींनी आपल्या निर्गुण पादुकाच मागे ठेवल्या आहेत. नृसिंहवाडी आणि औदुंबरक्षेत्री दत्तपादुकांचीच उपासना रुढ आहे. देवगिरीवर जनार्दन स्वामींच्या समाधिस्थानी पादुकाच आहेत. नर्मदेच्या तीरावर श्रीरंगावधूताच्या नारेश्वरला पादुका-माहात्म्यच आहे. यावरून दत्तउपासनेतील दत्तपादुकांचे स्थान लक्षात यावे. दत्तभक्ताच्या हृदयात तर ते चिरंतन आहे. म्हणूनच प्रत्येक दत्तभक्त सदैव म्हणत असतो **''मी ठेवितो मस्तक ज्या ठिकाणीं । तेथे तुझे सद्गुरु पाय दोन्ही.''**

आपण आत्तापर्यंत श्री दत्तात्रेयांच्या सगुण आणि निर्गुण अशा दोन्ही प्रकारच्या उपासनापद्धतींचा सविस्तर विचार केला. या उपासनापद्धतीमध्ये सगुणोपासना तशी सोपी वाटत असली तरी तिच्यामधील उपचार आणि कर्मकांड मात्र आटोपशीर नाही. आज मानवी जीवनात सतत धावपळ आहे. जीवनात कलह वाढत आहे; सत्ता, संपत्ती, अधिकार, दर्जा यासाठी संघर्ष चालू आहे. मानसिक तणाव सतत वाढत आहे. जीवन अतिशय संमिश्र आणि गुंतागुंतीचे बनत आहे. परमार्थ, अध्यात्म, आत्मज्ञान, धार्मिक उपचार इत्यादींची नवी नवी रुपे आजही उदयास येत आहेत. अशा पार्श्वभूमीवर दत्तात्रेयांची उपासना अधिक शुद्ध, अधिक फलदायी, अधिक व्यापक कशी होईल याचा विचार करण्याची वेळ आली आहे.

वरील प्रश्नाचे उत्तर शोधायचे झाल्यास दत्तसाक्षात्कारी संतपुरुष जे होऊन गेले त्यांच्या स्फुट रचना, त्यांचे वाङ्मय अभ्यासणे अगत्याचे आहे. मनाला हवी असलेली शाश्वताची शांती, चित्ताची उदात्तता, भक्तीचे प्रेमसुख याची जीवाला ओढ असेल तर एकनाथ, निरंजन रघुनाथ, नारायण महाराज जाळवणकर, पंतमहाराज बाळेकुंद्रीकर यांनी निर्माण केलेल्या वाङ्मयाच्या चिंतनाकडे वळायला हवे, कारण एकतर हे चिंतन वा ही मानसपूजा कोणासही केव्हाही करता येण्यासारखी आहे. सोवळ्या-ओवळ्याचे बंधन या मानसपूजेस नाही. मंत्र, तंत्र यांचा पसारा नाही. शरीरकष्ट नाहीत. चालू धावपळीच्या युगात नसत्या फंदात वा तंत्रात सापडण्यापेक्षा शुद्ध प्रेमाने दत्तात्रेयांना मनापासून फक्त हाका मारा, नित्य व्यवसाय चालू असतानाही दत्तध्यान अखंड हृदयात जपून ठेवा, माझा दत्तच सर्वकाही घडवून आणतोय अशी अटळ श्रद्धा ठेवा, मग पहा, नित्य नामस्मरण आणि दत्तचिंतन यांनीच चित्त शुद्ध, उदात्त आणि प्रीतिरसाने भरून येईल आणि मग तुम्हालाच वाटेल की चिरंतन शांतीचा लाभ करून देणारी ही गुरुमूर्ती, ह्या गुरुपादुका यांचा विसर पडू देता कामा नये आणि मग स्वर उमटतील....

**विसरु कसा**
**मी गुरुपादुकांना....**

---

# – दत्तसंप्रदायाचा महान ग्रंथ –
# त्रिपुरा-रहस्य

– श्री. गजानन कुलकर्णी

दत्तसंप्रदायाच्या उपलब्ध ग्रंथांमध्ये श्रीगुरुचरित्र, श्रीदत्तप्रबोध, श्री गुरुलीलामृत, श्रीदत्तमाहात्म्य इत्यादी ग्रंथांना जितके महत्त्वाचे स्थान आहे तितकेच महत्त्वाचे स्थान 'त्रिपुरारहस्य' या ग्रंथाला देण्यात आलेले आहे. या पंथाचे खरे रहस्यात्मक तत्वज्ञान या ग्रंथात ग्रथित केले गेले असल्यामुळे या ग्रंथाला या पंथात अनन्यसाधारण महत्त्व प्राप्त झाले आहे. या ग्रंथातला ज्ञानखंड हा भाग त्यातल्यात्यात जास्त महत्त्वाचा मानला जातो. म्हणून त्या ज्ञानखंडातील प्रमुख अंगाची ओळख आज आपण या लेखात करून घेण्याचा प्रयत्न करणार आहोत.

त्रिपुरा हे एका देवीचे महत्त्वाचे रुप होय !! **''त्रीन् धर्मार्थ कामान् पुरति पुरतो ददातीति''** धर्म, अर्थ व काम ह्या तीन पुरुषांना मिळवून देते ती त्रिपुरा देवी. तंत्रशास्त्रातही या त्रिपुरा देवीची उपासना केली जाते. रौद्री, ब्राह्मी आणि वैष्णवी ह्या तीन शक्तींनी युक्त अशी पुरे, म्हणजे शरीरे जिला आहेत ती त्रिपुरा असेही हिचे वर्णन केले जाते. या देवीची विविध रुपे, उपासना प्रकार, आणि स्वरुपज्ञान यांचे वर्णन त्रिपुरारहस्य या ग्रंथात आले आहे. या ग्रंथाच्या ज्ञानखंडात तत्वज्ञान वा आत्मज्ञान, आत्मविचार समजावून दिलेले असल्यामुळे हा भाग अत्यंत महत्त्वाचा मानला जातो. श्री सद्‌गुरु दत्तात्रेयांनी आत्मबोधाचा हा भाग परशुरामाला सांगितलेला आहे. परशुराम हा श्री दत्तात्रेयांच्या प्रमुख शिष्यांमधील एक आहे. म्हणून हा कथाभाग दत्तपंथियांना अत्यंत महत्त्वाचा वाटत आलेला आहे.

एकदा ब्रह्मदेवाच्या एका ज्ञानसत्रामध्ये अनेक ब्रह्मर्षी; राजर्षी जमले होते. त्यावेळी ब्रह्मा, विष्णू, महेश हे तीन महादेव आणि ऋषी-मुनी माहेश्वरी विद्यादेवीला शरण गेले. ह्या सर्वांची ज्ञानलालसा पाहून श्री त्रिपुरा देवी तिथे प्रगट झाली. सर्वांनी तिला नमस्कार केला आणि खरे आत्मज्ञान जाणून घेण्यासाठी देवीला एकूण ९ प्रश्न विचारले. त्या सर्वांची समर्पक उत्तरे देऊन देवीने सर्वांचे समाधान केले आणि ती अदृश्य झाली.

प्रश्न १ ला : देवी, तुझे पररुप कोणते ?

उत्तर : ज्याच्याठिकाणी हे सर्व जगत् दर्पणातील प्रतिबिंबाप्रमाणे उत्पन्न होते, राहते, लीन होते, व सर्वांना नेहमी भासते, आत्मज्ञान नसणाऱ्यांना जे जगाच्या आकाराने भासमान होते, योग्यांना जे केवळ निर्विकल्प म्हणून अनुभवास येते; शांत, गंभीर सागराप्रमाणे जे अगदी निच्छल भासते; एकनिष्ठ भक्तप्रेमाने व कोणतीच कामना न ठेवता ज्याचे नित्य सेवन करतात; अद्वैतपदाचे ज्ञान झाले असताही मनाला स्वाभाविक ओढ लागून अत्यंत तत्परतेने, देव आणि भक्त असा भेदभाव ते ज्यासाठी उत्पन्न करतात; इंद्रिये, मन, बुद्धी यांचे अंत:सूत्र; ज्याचे अभान झाल्यास काहीच नाही; आणि शास्त्रावरून जे सामान्यत: जाणता येते; ते माझे परमश्रेष्ठ रुप आहे.

प्रश्न २ रा : देवी, तुझे अपर रुप कोणते ?

उत्तर : ऋषींनी विचारलेला दुसरा प्रश्न ऐकून देवी म्हणाली, सर्व ब्रह्मांडाच्या पलीकडे असलेल्या अमृत समुद्रात जे रत्नांचे दीप आहे; त्यातील एका कदंबाच्या उपवनामध्ये चिंतामणींनी बनविलेले एक सुमनोहर मंदिर आहे. त्यात ब्रह्मदेव, विष्णू, रुद्र व ईश्वर ह्या चार पादांचा व सदाशिवात्मक पृष्ठभाग असलेला जो मंचक आहे, त्यावर विराजमान झालेली अनादि – मिथुनात्मक जी त्रिपुरसुंदर मूर्ती ते माझे अपर रुप होय ! तसेच, ऋषींहो, सदाशिव, ईशान, ब्रह्मदेव, विष्णू, शंकर, गणपती, षडानन, इंद्रादी दिक्पाल, लक्ष्मी इत्यादी शक्ती, वसुरुद्रादी गण, राक्षस, देव, नाग, यक्ष, किंपुरुष इत्यादी जे जे म्हणून पूजनीय आहेत, ते ते सर्व माझी अपर रुपे आहेत. अशी मी सर्वत्र असूनही माझ्या मायेने मोहित झालेले पुरुष मला ओळखीत नाहीत, पण ते माझीच सेवा करतात व मीच त्यांना त्यांचे अभिष्ट देते. मजवेगळे कोणीच पूजनीय नाही आणि फलदायीही नाही. जो जसे माझे सेवन करतो त्याला तसे मजपासून फळ मिळते.

देवीच्या तोंडून दुसऱ्या प्रश्नाचे असे समर्पक उत्तर ऐकल्यानंतर ऋषींनी तिला पुढचा प्रश्न विचारला.

प्रश्न ३ रा : देवी, तुझे ऐश्वर्य कोणत्या प्रकारचे आहे ?

उत्तर : माझे ऐश्वर्य अमर्याद आहे. कशाचेही साह्य न घेता एकाकी व चित्स्वरुप असता मी अनंत जगताच्या आकाराने भासमान होते आणि अशी भासमान होतानाही आपल्या स्वरुपापासून मुळीच ढळत नाही ! अशी दुर्घट गोष्ट घडवून आणणारे हेच माझे ऐश्वर्य तुम्हाला सांगते. सूक्ष्म दृष्टीने तुम्ही पहा ! मी सर्वांना आश्रय असून व अंतर्यामी असूनही पुन: केवळ संगरहित आहे. मी नित्य मुक्त असूनही पुन: पुन: मुक्त होते. सद्‌गुरुकडे जाऊन, त्यांचे शिष्यत्व पत्करुन पुन: आत्मस्वरुपाला जाणते, पुन: आत्मस्वरुपाला विसरुन पुष्कळ काळ संसारात गुंतून राहते ! आणि ऐवढे हे जग कोणत्याही साधन-सामग्रीवाचून निर्माण करते ! असे माझे नानातऱ्हेचे ऐश्वर्य आहे. सहस्त्र मुखालाही गणना होणे शक्य नाही. म्हणून शेवटी सांगते, थोडक्यात म्हणजे, माझ्या ऐश्वर्याच्या एका लेशानेच ही अद्‌भूत जगद्यात्रा चोहोंकडे पसरली गेली आहे.

देवीच्या या अमर्याद ऐश्वर्याचे वर्णन तिच्याच तोंडून ऐकून चकित झालेल्या ऋषी-मुनींनी देवीला पुढचा प्रश्न केला.

प्रश्न ४ था : माते, तुझे ज्ञान तरी कोणत्या प्रकारचे आहे ?

उत्तर : माझे ज्ञान द्वैत, अद्वैत इत्यादी अनेक प्रकारचे आहे. तसेच त्याचे फळही श्रेष्ठ-कनिष्ठ भेदाने निरनिराळे झाले आहे. द्वैतज्ञान हेही अनेक प्रकारचे आहे. कारण ते निरनिराळ्या उपास्य मूर्तीवर अवलंबून असते. त्याला ध्यान किंवा उपासना

म्हणतात. परंतु ते स्वप्नाप्रमाणे किंवा मनोराज्याप्रमाणे क्षणिक अनुभवास येणारे असते.

तेही त्याच्या मानाने सफल होतेच. तशीच नियतीची योजना आहे. कारण ते क्रमाक्रमाने मुख्य फल, म्हणजे मोक्ष देण्यास कारण होते. अद्वैत ज्ञानालाच मुख्यत: ज्ञान हे नाव आहे. मज परम श्री विद्यादेवीची आराधना केल्यावाचून ही अद्वैत संज्ञक महाविद्या कशी प्राप्त होईल ? जे केवळ परम चैतन्य तेच परम असे अद्वैत विज्ञान; त्याच्याच शुद्ध अवस्थेचे ज्ञान झाले असता द्वैत भावनेची निवृत्ती होते. जेव्हा चित्त केवळ आत्माभिमुख होते, तेव्हाच हे विज्ञान अनुभवास येते. ऋषीहो ! वेदव्यासांच्या योगाने केवळ आत्मा प्रतीत होऊन 'देहच मी' इत्यादी भावनांचा नाश होणे, यालाच ज्ञान म्हणतात. ज्या ज्ञानाने हे भासणारे दृश्य कोठेही किंचित्‌ही स्फुरत नाहीसे होते, ज्या ज्ञानाच्या योगाने कोठे काहीएक लेशसुद्धा जाणावयाचे रहात नाही; सर्वतऱ्हेचे विषयादिकांचे अनुभव जेथे आत्मरुप होतात, तेच खरे अद्वैत ज्ञान होय ! जे ज्ञान प्राप्त झाले असता चिरकाल पुष्ट झालेले संशय वायुने लय पावणाऱ्या अभ्राप्रमाणे पळ काढतात, आणि जेथे कामादी क्षुद्र वासना पुढे येऊ शकत नाहीत, दात पाडलेल्या सर्पांप्रमाणे व्यर्थ होतात तेच ऋषीहो, माझे परमविज्ञान होय !

विद्यादेवीकडून तिच्या ज्ञानाविषयी माहिती ऐकून घेतल्यानंतर ऋषींनी लगेच देवीला आणखी एक प्रश्न केला.

प्रश्न ५ वा : देवी, या ज्ञानाचे फल काय आहे ?

उत्तर : ऋषींचा प्रश्न ऐकताच देवी लगेच म्हणाली, ऋषीहो, सर्व दु:खाचा नाश होणे, हे विज्ञानाचे फल आहे. अत्यंत निर्भय अवस्था प्राप्त होणे हेच खरे फल आहे. 'हा दुसरा कोणी आहे' या भावनेने भय उद्‌भव होते. पण अद्वैत तत्व पूर्णपणे ज्ञात झाल्यावर, सूर्योदयानंतर जसा अंध:कार पळून जातो, तशी ही द्वैतभावना कोठल्या कोठे नष्ट होते ते कळतही नाही ! म्हणून ऋषीहो, द्वैत-संकल्प नष्ट झाल्यावर कोठेच भय नाही. स्वस्वरुपाहून निराळे फळ ज्यापासून मिळते ते सर्वदा भयदायी असणार ! कारण की, स्वात्मरुपाशिवाय अन्य ते सर्वदा नाशवंत असते, असे प्रत्यक्षच आढळून येते. नाशवंत वस्तूला भय असल्यामुळे तेथे निर्भयता कोठून प्राप्त होणार ? सर्व संयोगाच्या शेवटी वियोग असतो, असा सर्वत्र अनुभव आहे. तेव्हा फलाचा योगही नष्ट होणार, हे निश्चित आहे. त्याअर्थी जोवर फल आत्मरुप नसून अन्य रुपाचे आहे, तोवर भय असते. म्हणून जे आपल्या स्वरुपाहून वेगळे नव्हे; तेच निर्भय फल होय ! त्यालाच मोक्ष म्हणतात. जेव्हा ज्ञाता, ज्ञेय व ज्ञान ही सर्व एकरुप होतील, तेव्हा सर्व भयरहित असे मोक्ष नामक सर्वोत्तम फल मिळते. संकल्प-विकल्पशून्य आणि तमोगुणाने रहित जे ज्ञात्याचे शुद्ध आत्मस्वरुप तेच ज्ञान. ते स्वरुप प्रथमत: ओळखता येत नाही, गुरु व शास्त्र ही त्याची ओळख करुन देतात. जे विज्ञेयतत्व म्हणून म्हणतात ते हेच. ज्ञाता, ज्ञेय व ज्ञान ही जोवर निरनिराळी अनुभवास येतात, तोवर ती व्यर्थ होत. पण त्या त्रिपुटीतील परस्परभेद जेव्हा नष्ट होईल, तेव्हाच तो ज्ञाता, तेव्हाच ते ज्ञेय आणि तेव्हाच ते ज्ञान होय ! हेच ज्ञानाचे फळ आहे. वस्तुत: ज्ञाता, ज्ञान, ज्ञेय आणि फल यामध्ये भेदच नाही. व्यवहाराची सिद्धी होण्यासाठी त्यात हा भेद कल्पिलेला आहे. म्हणून येथे नवीन असे काही फल मिळवावयाचे नाही.

हा आत्माच मायेच्या योगाने ज्ञाता, ज्ञेय, ज्ञान व त्याचे फल इत्यादी रुपांनी जोवर भासतो, तोवर हा संसार पर्वतासारखा कठीण होतो. परंतु जेव्हा कोणत्याही कारणाने प्रसंगवशात्‌ भेदशून्य स्वरुप भासमान होते, तेव्हा वाऱ्याने ढग नष्ट व्हावेत त्याप्रमाणे ह्या सर्व संसाराचा विलय होतो.

त्रिपुरा देवीच्या तोंडून प्रगट होत असलेले हे गूढ ज्ञान ऐकून ऋषींची ज्ञानलालसा अधिकच वाढत गेली आणि त्यातल्या एका ऋषीने देवीला प्रश्न केला.

प्रश्न ६ वा : माते, खरा मोक्ष मिळण्याचे साधन कोणते, हे कृपया आम्हाला अधिक विस्ताराने सांगण्याची कृपा करावी.

देवीने उत्तर देण्यासाठी प्रारंभ करण्यापूर्वीच सभेतील आणखी एक ऋषी उठले आणि म्हणाले,

प्रश्न ७ वा : माते, मोक्षाचे खरे साधन विशद करताना, खरा साधक कुणाला म्हणावे, हेही विशद करण्याची कृपा करावी.

ऋषींची ही ज्ञानलालसा पाहून देवीने मंद स्मितहास्य केले आणि देवी बोलू लागली. ऋषींच्या ह्या दोन प्रश्नांचे उत्तर देवीने एकाच वेळी दिले.

उत्तर ६ व ७ : देवी म्हणाली, ऐका, अशाप्रकारचा खरा मोक्ष प्राप्त होण्याला त्या संबंधात तत्परता हे मुख्य साधन आहे. तीव्र तत्परता असल्यावर अन्य साधनांची काही जरुरी नाही; आणि ती तत्परताच जर विशेष नसेल तर दुसऱ्या चांगल्या हजारों साधनांनी तरी काय होणार आहे ! तेव्हा, तत्पर होणे, हे मोक्षाचे खरे साधन आहे. सर्वकाही करीन, पण हे कार्य साधीन, असे निरंतर वाटणे हीच तत्परता. ज्याला अशी अवस्था प्राप्त झाली आहे तो सर्वथा मुक्तच आहे. कारण तो काही दिवसांनी किंवा महिन्यांनी किंवा वर्षांनी किंबहुना दुसऱ्या जन्मात म्हटले तरी चालेल, पण मुक्तच व्हावयाचा ! कारण तो मार्गालाच लागलेला असतो. बुद्धीच्या निर्मलपणात जसा फरक असेल तसे दिवस थोडे किंवा फार लागतील इतकेच. सर्वपुरुषार्थाच्या आड येणारे हे बुद्धीचे दोष पुष्कळ प्रकारचे आहेत. त्यांनीच हे लोक घोर संसाराग्नीत जळत घातले आहेत. त्यात पहिला अनाश्वास, दुसरी कामवासना आणि तिसरी जाड्यता, असे तीन मुख्य प्रकार आहेत. त्यात अनाश्वासाचे प्रकार दोन आहेत : एक संशय आणि विपर्यय. वरील तत्परतेलाही दोन मुख्य विघ्ने आहेत. उलट निश्चय करीत गेल्याने हे द्वय क्रमाने नाश पावते. याकामी मुख्य उपाय म्हणजे मूळच छेदून टाकले पाहिजे. हे अनाश्वासाचे मूळ शास्त्राविरुद्ध असलेल्या तर्काचे चिंतन करणे हे आहे. त्याचा त्याग करावा व सत्कार्याचा विचार चालण्यासाठी त्याविरोधी तर्काविरुद्ध विचार करु लागावे. असे केल्याने श्रद्धेचा जन्म होऊन अनाश्वास नष्ट होतो. बुद्धीवर कामादी वासनांचे पुट असले तर ते श्रवणाच्या आड येते. कामादिकांनी व्यापिलेली बुद्धी ज्ञान विषयाकडे प्राय: प्रवृत्त होत नाही. व्यवहारातही कामी पुरुष आपल्या प्रिय विषयाच्या चिंतनात अगदी गढून गेला असता त्याला पुढील काही दिसत नाही की ऐकू येत नाही ! तसेच यानेही श्रवण केले तरी ते न केल्यासारखेच होते. म्हणून या कामवासना वैराग्य बळाने स्वाधीन करून घ्याव्या. ह्या काम, क्रोध, लोभ, दंभ इत्यादी हजारो आहेत. त्या सर्वांत काम हा मूळ आहे. तो नष्ट झाल्यावर मग दुसरे कोणी उरत नाही. तो काम वैराग्याने नाश पावतो. 'असे मला असावे' अशातऱ्हेची जी

आशा तोच काम. ती प्राप्त पदार्थाच्या संबंधात स्थूल झालेली असते व अप्राप्य गोष्टीत सूक्ष्म असते. दृढ वैराग्याने ती सर्व घालवावी. त्या वैराग्याचे मूळ म्हटले तर प्रतिक्षणी काम्य विषयांच्या दोषाचा विचार करणे व त्या विषयाचा संबंध वर्ज्य करणे हे आहे. या योगाने ती वासना नष्ट होते. बुद्धीचा तिसरा दोष जे जाड्य, तो तर अभ्यास करुनही जिंकावयास कठीण आहे. हा दोष असला तर पुरुषाने मोठ्या तत्परतेने श्रवण चालू ठेवले तरी ते बुद्धीत प्रविष्ट होत नाही. हा पुरुषार्थाचा नाश करणारा मोठा दोष आहे. त्याला परमेश्वराची सेवा केल्यावाचून दुसरा उपाय नाही. त्या सेवेप्रमाणे मी त्याच्या बुद्धीचे जाड्य हरण करते. या जाड्याच्या अधिक उणेपणाला अनुसरुन त्याच किंवा दुसऱ्या जन्मी त्यालाही फलप्राप्ती होते. ऋषीहो, सर्व साधन-सामग्री कोणालाही माझ्या कृपेनेच प्राप्त होते. जो पुरुष निष्काम बुद्धीने व भक्तिपूर्वक माझी उपासना करतो, तो साधनांच्या अडचणींचे निवारण करुन लौकरच कृतार्थ होतो. उलट जो सारखा अनेक साधनांचे पाठ घेतो, पण सर्वांच्या बुद्धीला विकसित करणाऱ्या मज परमेश्वरीकडे मात्र दुर्लक्ष करतो त्याचे बुद्धिमांद्य दूर न होता त्यास त्यामुळेच पदोपदी ठेचा खाव्या लागतात आणि फळ मिळण्याची वानवाच असते. सारांश, ऋषीहो, तत्परता हे ज्ञानाचे मुख्य साधन आहे.

खरा साधक कोण ? आणि खरा मोक्ष मिळण्याचे साधन कोणते ? ह्या दोन प्रश्नांची उत्तरे देवीकडून ऐकल्यावर ऋषींनी देवीला पुढचा प्रश्न केला, (प्रश्न ८ वा) देवी, सिद्धीची पूर्णावस्था कोणती ?

उत्तर ८ वे : ऋषींचा हा आठवा प्रश्न ऐकून देवी म्हणाली, ऋषीहो, ज्याला अशी तत्परता आहे, असा निश्चय होणे याचे नाव सिद्धी. देहादिकांच्या ठिकाणी भासणारे आत्मत्व नाहीसे होऊन बुद्धी निर्मल झाली म्हणजे सिद्धी झालीच. आत्म्यासंबंधी निश्चय सर्वांचाच आहे, पण तो निश्चय केवलरुपाने नसून देहादींच्या रुपाने आहे. म्हणूनच ही महान अनर्थ परंपरा ओढवली आहे. म्हणून 'देहादिकांना भासित करणारे जे केवल चैतन्य, तोच आत्मा', असा निश्चय होऊन सर्व संशय लयास जाणे यालाच ज्ञानसिद्धी असे म्हणतात. खेचरत्वादी आणि अ[illegible]न्दी सिद्धी ह्या या ज्ञानसिद्धीच्या सोळाव्या हिश्श्याच्याही बरोबर येत नाहीत. ह्या सर्व सिद्धी विशिष्ट काळाने आणि देशाने मर्यादित असतात. अर्थात, त्यांचे सामर्थ्य अमुक वेळी आणि अमुक ठिकाणी मात्र अनुभवास यावयाचे, असे असते. पण ही शिवस्वरुप स्वात्मसिद्धी अमर्याद आहे. आत्मज्ञानाच्या साधनेमध्येच त्या त्या अणिमादी क्षुद्र सिद्धी प्राप्त होतात; पण त्या आत्मज्ञानाच्या प्राप्तीला विघ्न करणाऱ्या आहेत. गारुड्याच्या खेळाप्रमाणे असणाऱ्या ह्या सिद्धींनी स्वहित काय होणार आहे ! ज्याला आत्मज्ञान झाल्यामुळे ब्रह्मदेवाचे अधिकारस्थानही तृणतुल्य होते त्याला ह्या सिद्धी म्हणजे काय, एक पोरखेळ आहे. म्हणून एका आत्मज्ञानाशिवाय दुसरी सिद्धीच म्हणता येत नाही. जिने दुःखाचा कायम नाश होतो, आनंद दाट भरुन जातो व मृत्यूच्या तोंडातूनही सुटका करुन घेता येते तीच खरी सिद्धी, हे काय सांगावे !

ही ज्ञानसिद्धी विविध अभ्यासभेदाने, बुद्धीच्या कमीजास्त निर्मलपणामुळे व ज्ञानाच्या परिपक्वतेतील तारतम्यामुळे तीन प्रकारची आहे; उत्तम, मध्यम व कनिष्ठ ब्राह्मणांचा वेदाचा पाठही असाच असतो. तीव्र बुद्धिमत्तेमुळे व फार अभ्यास झाल्यामुळे दुसरे कित्येक उद्योग करीत असतानाही ज्यातील अक्षरे अस्खलित म्हटली जातात तो पाठ उत्तम; ज्यामध्ये दुसऱ्या कार्याकडे आणि पाठाकडे चित्त ठेवावे लागते तो पाठ मध्यम; आणि ज्यामध्ये केवळ पाठाकडेच मन लावावे लागते, अर्थात, उद्योगाकडे दुर्लक्ष केले तर मात्र जो बिनचूक म्हणता येतो तो कनिष्ठ. अशीच ज्ञानसिद्धीही त्रिविध आहे. जिच्यात व्यवहार करताना तत्वानुसंधान ठेवावे लागत नाही, स्वभावतःच ते राहाते ती उत्तम; तसे ते ठेवावे लागते ते मध्यम; आणि जिच्यात व्यवहार मुळीच होत नसून सारखे स्वरुपानुसंधानच करावे लागते ती ज्ञानसिद्धी कनिष्ठ होय ! वस्तुतः यांच्यात स्वरुपतः काही भेद नाही, तरी त्यात उत्तम सिद्धी आहे, तिला सिद्धीची पराकाष्ठा म्हटले आहे. स्वप्नादी अवस्थांतही जिचे वास्तव्य असते आणि विचार उदित होताच जी अनुभवास येते, तीच स्वरुपसिद्धी सर्वात श्रेष्ठ आहे. सर्व संस्कारांमध्ये जेव्हा पूर्वसंस्कारवशात् आपोआप हेतूवाचून प्रवृत्ती होऊ लागते, तेव्हा ती सिद्धीची पराकाष्ठा समजावी. प्रयत्न न करता, संविद्रूप आत्म्याच्या ठिकाणी जेव्हा अखंड स्थिती होऊ लागते, तेव्हा ती सिद्धी मर्यादेवर पोचली म्हणायची. व्यवहारात वागत असता पदार्थमात्राचा अनुभव घेत असूनही ज्याला द्वैत भासत नाही, त्याची सिद्धी पूर्णावस्थेस गेली असे समजावे. जागृतीत व्यवहार करताना जेव्हा झोपी गेल्यासारखी अंतःकरणात स्वस्थता असते तेव्हा ती ज्ञानसिद्धीची परिपूर्णता होते.

देवीच्या तोंडून झरणाऱ्या या ज्ञानामृतात न्हाऊन निघणारे ऋषी म्हणाले, देवी, आत्तापर्यंत तू केलेले हे तत्वनिरुपण ऐकून आम्ही धन्य झालो. आता फक्त शेवटच्या एकाच प्रश्नाचे उत्तर सांगण्याची कृपा कर !

ऋषीमुखातून निघालेले उद्गार ऐकून विद्यादेवी संतुष्ट झाली आणि आपला वरदहस्त उंचावत म्हणाली, ऋषीजनहो, विचारा, मनात असणारा कोणताही प्रश्न निर्धास्त होऊन विचारा ! मी तुमचे जरुर शंकासमाधान करीन.

देवीची प्रसन्न वाणी ऐकून सभेतील एक ऋषी उभे राहिले आणि म्हणाले,

प्रश्न ९ वा : माते, सिद्धपुरुषात श्रेष्ठ कोण ?


उत्तर ९ वे : ऋषीहो, मी आत्ताच वर्णन केल्याप्रमाणे अशी स्थिती ज्याला प्राप्त झाली असेल तो उत्तम सिद्ध. व्यवहारात असताही ज्या बुद्धिमानाची समाधी केव्हाच भंग पावत नाही, तो उत्तम सिद्ध होय ! निरनिराळ्या ज्ञान्यांची निरनिराळी स्थिती स्वानुभवावरुन ज्याला अंतरात ओळखता येते तो उत्तम सिद्ध होय ! ज्याला तिळमात्र संशय नाही व तिळमात्र इच्छा नाही तो सर्वोत्तम सिद्ध म्हणतात. जो व्यवहारात अगदी निर्धास्त असतो आणि सर्व सुख, दुःखे आणि जगाचे नाना व्यवहार हे सर्व मजवरच भासत आहेत, असे समजतो, त्याला पूर्ण सिद्ध म्हणावे. अत्यंत बद्ध व पूर्णमुक्त हे ज्याला आपलेच स्वरुप आहे, असे वाटते, तो उत्कृष्ट सिद्ध समजावा. जो आपणावर बंधाचे जाळे पसरलेले इतरांप्रमाणे स्पष्टपणे पहात असताही त्यातून सुटण्याची इच्छा मुळीच करीत नाही, कारण त्याला त्यापासून पीडाच होऊ शकत नाही, तो सर्वात श्रेष्ठसिद्ध समजतात.

ऋषींनो, फार काय सांगावे ? तो उत्तम सिद्ध म्हणजे मीच म्हणून समजा ! आम्हा

(पृष्ठ क्र. १८ वर)

# रणछोडरायाचे प्रिय
# डाकोर....

– श्री. अशोक मोहिते
बडोदे, गुजरात.




गुजरातमधील नडियाद शहरापासून अंदाजे ४० किलोमीटर अंतरावर असलेले 'डाकोर'चे मूळ नाव 'डंकपूर'. या गावाकडे जाताना दुरून दिसणारे उत्तुंग असे विशिष्ट प्रकारचे शिखर व त्यावरील ध्वज यात्रेकरूंना आकर्षित केल्याशिवाय रहात नाही.

हे धार्मिक स्थळ जुने-पुराणकालीन असल्याकारणाने त्याविषयीच्या अनेक दंतकथा प्रसिद्ध आहेत. खूप पूर्वीचे 'खाखरीयुं' नाव असलेले हे गाव. या गावात झाडे मुबलक. गावात 'गोमती' तलाव होता, आजही आहे. तलावाकाठी 'डंकनाथ' महादेवाचे मंदिर आहे. असे सांगण्यात येते की, 'डंकऋषी'चा आश्रम इथे होता म्हणून हे स्थान डंकपूर-डाकोर म्हणून ओळखले जाऊ लागले.

येथील मुख्य दंतकथा भक्त 'बोडाणा' या भक्ताची आहे. तो द्वारकाधिशाचा परमभक्त होता. द्वारकाधिशाचीदेखील त्याच्यावर असीम कृपा होती. याची भक्ती करण्याची पद्धती न्यारी होती. तो हातावर तुळस उगवीत असे. ती तुळस दर सहा महिन्यांनी देवाला अर्पण करण्यासाठी तो इथून पायी प्रवास करून द्वारकेला जात असे. त्याचे संपूर्ण नाव वजेसंग बोडाणा राजपूत असे होते. भगवान द्वारकाधिश त्याच्या भक्तीवर खूष होते. वृद्धावस्थेमुळे जेव्हा त्याचे शरीर थकले तेव्हा द्वारकाधिशाने त्याला स्वप्नात येऊन सांगितले की तू शरीर थकल्यामुळे द्वारकेला येऊ शकत नाहीस तेव्हा मी स्वत: तुझ्याजवळ येऊन राहतो. परमेश्वराच्या सूचनेप्रमाणे 'बोडाणा' याने रात्रीच्यावेळी द्वारकाधिशाची मूर्ती मंदिरातून पळविली आणि ती मूर्ती बैलगाडीत टाकून तो डाकोरच्या मार्गाने निघाला...

इकडे द्वारकेला सकाळी जेव्हा मंदिरात देवाची मूर्ती दिसली नाही तेव्हा सर्वत्र हाहाकार माजला. शोधा-शोध सुरू झाली. मूर्तीचा कुठेच थांगपत्ता लागेना तेव्हा सर्वांची खात्री पटली की 'बोडाणा' यानेच ती पळविली. सर्वांनी त्याचा पाठलाग केला.

उमरेठ व डाकोर ह्या गावांमध्ये विश्रांतीसाठी 'बोडाणा' याने गाडी थांबविली होती. त्यावेळी परमकृपाळू परमेश्वराने एक निंबवृक्षाची फांदी सहजपणे हाती धरली त्यामुळे ती फांदी व तिची सर्व पाने स्वत:चा कडवटपणा सोडून गोड-मधुर झाली. म्हणूनच भाविक श्रद्धेने आजही गाताना दिसतात....

**''आखां लिमड्यामां डाळ एक मीठी हो रणछोड रंगीला....''**

श्रीकृष्णाचे चरणकमल या भूमीला लागल्याची स्मृती म्हणून त्याच्या पादुकांचे दर्शन घडते ते याच स्थळी. आजसुद्धा भाविक त्या वृक्षाची मधुर फांदी शोधताना आढळून येतात.

सकाळ होताच मूर्ती 'डाकोर'ला येऊन ठेपते. परंतु द्वारकेचे भाविक लोग तिथे येऊन पोहचताच ती मूर्ती लपविली जाते. त्यानंतर खूप वाद-विवाद वगैरे होतो. शेवटी समाधान होते. यानंतर मूर्ती बाहेर काढण्यात येते. द्वारकेच्या भक्तांना मूर्तीच्या वजनाएवढे सोने देण्याचे ठरते. 'बोडाणा'

(पृष्ठ क्र. १८ वर)

# प्रसिद्ध गायक पै. अब्दुल करीम खान

– ले. कर्नल मु. ब. निंबाळकर (निवृत्त)

श्री. जयंतीलाल जरीवाला यांनी इंग्रजी भाषेत लिहिलेल्या **'Abdul Karim Khan - The Man of the Times- Life and Art of a great Musician'** या पुस्तकातील शिरडीचे श्री साईबाबा आणि नागपूरचे श्री ताजुद्दीनबाबा यांच्याशी झालेल्या खानसाहेबांच्या भेटीचे वर्णन वाचकांना मनोरंजक वाटेल म्हणून त्याचा मराठी अनुवाद खाली देत आहे :

## प्रकरण १३ वे

## शिरडीच्या श्री साईबाबांसमोर !

खानदेशातील अमळनेर येथील खानसाहेबांच्या जाहीर कार्यक्रमाला श्री साईबाबांचे बरेच भक्त हजर होते. त्यांनी खानसाहेबांना शिरडीला जाण्याची आणि श्री साईबाबांपुढे गाण्याची विनंती केली. खानसाहेबांनाही साधुसंतांबद्दल फार प्रेम आणि आदर होता. त्यांनी ही सूचना लगेच मान्य केली आणि आपला मालेगावचा कार्यक्रम रद्द करून ते शिरडीला जाण्यास निघाले.

त्या काळी शिरडी म्हणजे सापासारख्या विषारी प्राण्यांनी भरलेले जंगल होते आणि अशा ठिकाणी साईबाबा राहत असत. तेथे पोहोचल्यावर खानसाहेबांनी कोते पाटलांच्या घरी मुक्काम केला, परंतु बाबांचे दर्शन घ्यावयाला त्यांना संध्याकाळपर्यंत थांबावे लागले. सूर्य मावळल्यावर बाबा आपल्या वास्तूच्या बाहेर आले. खानसाहेबांनी त्यांना पाहिले आणि आपण एका महान संताच्या पुढेच उभे असल्याचे त्यांना वाटले. सुरुवातीची विचारपूस झाल्यावर बाबांनी त्यांना भजन म्हणण्यास सांगितले.

खानसाहेबांनी तंबोरे मागविले, पण बाबा म्हणाले, ''साथीच्या वाद्यांची जरूरी नाही. गाण्याची सुरुवात करा !'' मग खानसाहेबांनी साथीच्या वाद्यांशिवाय हळूच **''हेचि दान देगा देवा, तुझा विसर न व्हावा''** म्हटले. साईबाबा फार खूष झाले आणि खानसाहेबांकडे बोट दाखवून तेथे जमलेल्या भक्तांना म्हणाले, ''हा मुसलमान तुमचे भजन किती छान म्हणतो बघा ! 'दान' मागताना तो किती सौम्यपणाने आळवण करतो ! नाहीतर तुमच्यातील काहीजण ! ईश्वराची प्रार्थना करताना जणूकाय देवाला धमकी दाखवितात किंवा आपली मागणी मान्य करण्यास दरडावून सांगतात. देणारा कोणी धमकीमुळे देण्यास तयार होईल का ?'' नंतर खानसाहेबांकडे वळून ते म्हणाले, ''आता सर्व काळजी सोडून द्या ! परत जाण्याची घाई करू नका. तुमच्या घरच्या मंडळींना येथे बोलावून घ्या आणि काही दिवस येथे मुक्काम करा !''

मग खानसाहेबांनी आपल्या कुटुंबियांना शिरडीला बोलावून घेतले. साईबाबांनी त्यांना कसली काळजी न करण्यास सांगितले होते, पण अखेर ते मानवच होते ना ! त्यांना पुण्यातील आपल्या विद्यालयाची चिंता वाटत होती. बाबांनी त्यांच्या मनातील चुळबुळ ओळखली. दहा दिवस झाल्यावर ते म्हणाले, ''बरे, आता तू जाऊ शकतोस, पण पुण्याला जाऊ नकोस, वऱ्हाडात जा ! तुला फार फायदा होईल.''

त्यानुसार खानसाहेबांनी आवराआवर सुरू केली, पण साईबाबांनी त्या रात्री त्यांचा गाण्याचा कार्यक्रम ठेवला होता. खानसाहेबांनीदेखील गाण्याची कमाल केली. त्यांनी दरबारी रागात ''**और नहीं कुछ काम की, भरोसे अपने राम की**'' गाण्याला सुरुवात केली. नंतर ''**जे का रंजले गांजले त्यांसी जो म्हणे आपले। तोचि साधु ओळखावा, देव तेथेचि जाणावा ॥**'' शेवटले गाणे होते ''**काया कैसी रोयी, तजो दियो प्राण**'', ज्यात आत्मा निघून गेल्यावर शरीराच्या दयनीय स्थितीचे वर्णन केलेले आहे.

बाबा अत्यंत खूष झाले आणि खानसाहेबांना आशीर्वादासह एक रुपया देऊन म्हणाले, ''हा सदा तुझ्याजवळ असू दे, खर्च करू नकोस.'' अशाप्रकारे शिरडीच्या आणि तेथील संताच्या गोड आठवणींसह खानसाहेब नागपूरला रवाना झाले. त्यांना कल्पना नव्हती की तिकडे निघाल्याने ते आणखी एका मोठ्या संताकडे निघाले होते.

## खानसाहेब ताजुद्दिनबाबांना भेटतात !

नागपूरला खानसाहेब राजे लक्ष्मणराव भोसल्यांकडे राहिले. ताजुद्दिनबाबांचा मुक्काम भोसल्यांच्या आवारातच असल्याचे कळल्याने खानसाहेब त्यांना भेटण्याला उत्सुक झाले, परंतु त्यांची त्यांना तीन दिवस भेट होऊ शकली नाही. खानसाहेब भारी अस्वस्थ झाले म्हणून लक्ष्मणरावांनी सुचविले, ''अगदी सकाळच्या प्रहरी बाबा फिरावयाला जातात - ईश्वराला ठाऊक कोठे जातात ते ? शक्य असल्यास तेव्हा त्यांच्यामागे जा !''

त्याप्रमाणे दुसऱ्या दिवशी खानसाहेब ताजुद्दिनबाबांच्या मागेमागे गेले. ते एखादा मैलही गेले नसतील, तोच बाबा एकदम मागे वळले आणि ओरडून म्हणाले, ''परत जा ! माझ्यामागे कशाला येतोस ? जगाला वेड लावणाऱ्या माणसा ! मलाही आता वेड लावायला बघतोस ? चल, नीघ येथून !'' परंतु खानसाहेब सहजपणे परतणे शक्य नव्हते. त्यांनी बाबांच्यामागे चालणे चालू ठेवले. ३-४ मैल गेल्यावर ताजुद्दिनबाबा एका अति घाणेरड्या दिसणाऱ्या जागी थांबले आणि म्हणाले,

''माझ्यापाठोपाठ कशाला येतोस ? माझ्याकरिता तुला गाणे म्हणावयाचे आहे का ? बरं, खाली बैस आणि अल्लाचे गाणे म्हण !''

खानसाहेबांनी ही संधी लगेच पकडली आणि संत कबीरांचा पुढील प्रसिद्ध दोहा जोगिया रागात म्हणण्यास सुरुवात केली.

''**इस तन धन कि कौन बड़ाइ । देखत नयन मिट्टि मिलाइ ॥**'' आणि जेव्हा त्यांनी शेवटली "**अपने खातर महल बनाया, आपहि जंगल जा कर सोया**" ओळ म्हटली तेव्हा गाण्याचा कळस झाला आणि ताजुद्दिनबाबांनी डोळे उघडले. ते म्हणाले, ''तुझे म्हणणे अगदी शंभर टक्के बरोबर ! हे सर्व दिसणारे जगत एके दिवशी शून्यात विलीन होणार आहे. आपण सर्व मातीच आहोत आणि मातीतच मिसळून जाणार आहोत. अहो, केवढे हे आश्चर्य ! तू आता परत जा !''

त्यावर खानसाहेब म्हणाले, "बाबा, मी आपला आशीर्वाद मागायला आलो आहे. मला आशीर्वाद द्या !"

''अरे गायका ! तुला आधीच आशीर्वाद मिळालेला आहे. इतके गोड तू कसे रे गातोस ? आता तू येथून जा ! तुझे गाणे आम्ही पुन्हा केव्हातरी आणखी ऐकू !'' असे म्हणून ताजुद्दिनबाबा शून्यात अदृश्य झाले आणि खानसाहेब ते कोठे गेले याचे आश्चर्य करीत राहिले. आणखी आश्चर्य म्हणजे खानसाहेब ताजुद्दिनबाबांबरोबर अत्यंत घाणेरड्या जागी बसले होते, तरी त्यांच्या कपड्यांना मुळीच घाण न लागता ते अगदी स्वच्छ राहिले होते.

त्यानंतर खानसाहेबांच्या एक महिन्याच्या वास्तव्यात ताजुद्दिनबाबा मधूनमधून त्यांचे गाणे ऐकत असत. त्यांचे आवडते गाणे जे पुन्हा पुन्हा ऐकायला ते कंटाळत नसत ते म्हणजे "**हरि का भेद ना पायो राम, कुदरत तोरि रंगीबेरंगी, तूं कुदरत का वाली**" होते. त्यातील "**कुदरत तोरी रंगीबेरंगी**" ह्या शब्दांच्यावेळी ते टाळ्या वाजवून नाचत असत आणि तोंडाने म्हणत, "अहो ! कुदरत (निसर्ग) ही अल्लाची करामत (चमत्कार) आहे. तुझ्या आवाजातदेखील केवढी करामत (जादू) आहे !'' खानसाहेबांच्या गाण्याच्या कलेने अत्यंत खूष होऊन ताजुद्दिनबाबांनी त्यांना 'गवैयों का सरदार' म्हणून घोषित केले. याचा अर्थ कोणी दुसरा गवई करीमखानांच्या बरोबरीने किंवा त्यांच्यापेक्षा उत्तम तऱ्हेने गाऊ शकत नव्हता असा नव्हता, तर हे उद्गार म्हणजे खानसाहेबांचे गाणे ऐकून ताजुद्दिनबाबांना झालेल्या आनंदाच्या मापाचे दर्शक होते. परंतु काही गायकांनी त्याचा शब्दश: अर्थ घेतला आणि जेव्हा पंजाबमधील शेंडेखान या पदवीला आव्हान देऊन म्हणाला, ''काय ? अब्दुल करीम गायकों का सरदार !'' तेव्हा बाबा ओरडले, ''त्याबद्दल वाद घालू नकोस, नाहीतर आयुष्यभर पश्चात्ताप पावशील.''

---

(पृष्ठ क्र. १६ वरून)

हा मूळातच गरीब ! त्याच्याजवळ एवढे सोने कुठले ! परंतु रणछोडरायाच्या प्रेरणेने 'सुवर्ण'तुला होते. एका पारड्यात रणछोडरायाची मूर्ती, दुसऱ्या पारड्यात टाकण्यासाठी सोने कुठून आणायचे हा बिकट प्रश्न ! 'बोडाणा'ने ईश्वराचा धावा केला, असाही तो त्याच्यासोबत द्वारकेहून डाकोरपर्यंत धावत आलाच होता, तसा तो त्याच्याजवळच होता, पण आता वेळ कसोटीची होती. तेवढ्यात काय झाले, बोडाणा याची पत्नी गंगाबाई हिच्या नाकातली बाळी त्या रिकाम्या पारड्यात टाकण्यात आली. तेवढेच नावापुरते सोने त्याच्याजवळ होते. अन् काय आश्चर्य ! मूर्तीच्या वजनाएवढे त्या बाळीचे वजन भरले.

हे स्थळ आजसुद्धा तिथे बघायला मिळते. त्या तुलेमध्ये भाविक 'दान' टाकत असतात. या स्थळी श्रद्धाळू 'तुलादान' करतात. जिथे मूर्ती लपविण्यात आली होती त्या स्थळी भाविकांना दर्शनासाठी देवाच्या पादुका ठेवण्यात आल्या आहेत. तिथे तलावामध्ये जाण्यासाठी घाटावरून एक लहान पूल आहे.

डाकोरमध्ये मुख्यत्वे 'रणछोडराय'चे मंदिर मोठे भव्य आहे. असा हा द्वारकाधिश श्रीकृष्ण डाकोरमध्ये येऊन रणछोडराय झाला व प्रजेमध्ये 'डाकोरनाथ' म्हणून विशेष लोकप्रिय ठरला. डाकोरनाथाच्या मंदिराची बांधणी खूप विलक्षण आहे. यात हिन्दु-मुस्लिम स्थापत्याचा अविस्मरणीय सहयोग बघायला मिळतो. हे मंदिर तयार करणारे डाकोरचे इनामदार 'तांबेकर' यांच्या कुळातील वंशज श्री. भालचंद्रराव आजही स्वत: सेवेसाठी तत्पर असतात. त्यातल्यात्यात श्रीमती चंपाबेन तांबेकर यांचे श्रद्धामय भक्तिसंगीत ऐकणे एक वेगळाच आनंद आहे.

डाकोरच्या जुन्या स्थळांमधील सुंदर आणि विशाल असे 'लक्ष्मी'चे मंदिर, विशिष्ट शिखर असलेले सत्यनारायणाचे मंदिर व तलावाच्याकाठी दूरवर समाधीस्थान वगैरे ध्यानात घेतले तर हे एक अर्वाचीन काळातील प्रसिद्ध यात्राकेन्द्र म्हटले जाईल. भाविकांची अशी श्रद्धा आहे की, देशातली कुठलीही यात्रा करून या, पण त्या यात्रेची पूर्तता डाकोरला जाऊन डाकोरनाथाचे दर्शन घेतल्यावरच होत असते. तसे केले नाही तर यात्रा केल्याचे पुण्य पदरी पडत नाही. त्यामुळे येथील श्रद्धाळू भाविक यात्रेला जाऊन आल्यावर 'डाकोर'ला न विसरता हजेरी लावताना दिसतात.

इतिहासाच्या प्रवाहाबरोबर 'डाकोर' या धार्मिक स्थळाचे व्यक्तिमत्व व वातावरण बदलत गेले आहे. पण रणछोडजी केन्द्रस्थानी असल्यावर याचा कितीसा परिणाम होणार ! आजसुद्धा दर पौर्णिमेच्या दिवशी इथे जत्रा भरते. श्रद्धाळू भाविकांची एकच झुंबड उडते. यासाठी बडोद्याहून डाकोरपर्यंत एक खास ट्रेन सोडण्यात येते. विशेषत: कोजागिरी पौर्णिमा, कार्तिकी पौर्णिमा, चैत्री पौर्णिमा, जन्माष्टमी, दसरा, तुलसी विवाह व रथयात्रा वगैरे उत्सवांचे स्वरूप भव्य असते. भाविक मोठ्या संख्येने याप्रसंगी इथे येत असतात. हाच प्रजेच्या चैतन्याचा, चिरंतन श्रद्धेचा, भक्तीचा महिमा आहे आणि तेच आजचे सत्य आहे. ते कुणीही नाकारू शकणार नाही.

---

(पृष्ठ क्र. १५ वरून)

दोघांत मुळीच भेद नाही. हे तुमच्या प्रश्नाचे उत्तर मी तुम्हाला अगदी स्पष्ट सांगितले आहे. हे रहस्य चांगले समजल्यावर पुन: कोणाला मोह होणार नाही, हे खास. इतके सारे तत्वनिरुपण करुन देवी अदृश्य झाली.

श्री विद्यादेवी अथवा भगवती त्रिपुरासुंदरीचे हे तत्वनिरुपण सर्वांनाच मान्य होण्यासारखे आहे. दत्तपंथियांत या विद्यागीतेचे माहात्म्य मोठे असून ती स्वानंद साम्राज्याची प्राप्ती करुन देणारी आहे अशी सर्व दत्तसांप्रदायिकांची श्रद्धा आहे. आणि म्हणून लेखरुपाने हे तत्वनिरुपण आपल्यासमोर मांडण्याचा प्रयास केला आहे.

---

# संत सूरदासांची प्रेमदृष्टी

- चकोर आजगांवकर

संतकवी सूरदासांनी भारतीय साहित्यसृष्टीला जो मधुरा, वात्सल्य, मीलन-विरहात्मक भक्तीचा दिव्यस्पर्श दिला, त्याला खरोखरच जोड नाही. १६ व्या शतकानंतरच्या वैष्णव साहित्यावर, तसेच भक्तिवाङ्मयावर सूरदासांच्या रागात्मक भाव-प्रतिभेचा जो उत्कट ठसा उमटला आहे, त्याचा प्रभाव कुणालाही नाकारता यावयाचा नाही. सूरदासांच्या अद्भुत आणि भावमधुर प्रेमलहरींच्या जादूने सारा उत्तर भारत जणू मंत्रमुग्ध झाला होता. त्यांच्या राधाभावाने भक्तीचा महावृक्ष जणू नव्या पालवीने मोहरून आला होता! या अंध भगवद्भक्ताच्या भावहृदयाने जगाला नवे नेत्र दिले. कृष्णाच्या रूपमाधुर्याचे, बाललीलांचे, गोपींच्या भावावस्थांचे, राधेच्या माधुर्य भूमिकांचे डोळसपणाने सूक्ष्मातिसूक्ष्म रंगछटांनी भावरम्य वर्णन करणाऱ्या सूरदासांच्या दृष्टीला अंध कोण म्हणेल! राधेचे आसवांनी पाणावलेले डोळे, तिच्या हृदयाची उत्कट, गाढ व्याकुळता ही अंध सूरदासांनी कोणत्या दिव्यचक्षूंनी पाहिली? त्यांच्या वैष्णवगुरु श्रीवल्लभाचार्यांच्या कृपेमुळेच ही दिव्यदृष्टी सूरदासांना मिळाली असेल. त्या कृपानेत्रांनी सूरदासांच्या संगीतमय स्वरप्रतिभेपुढे राधाभावाचे मृदुल, मधुर, व्याकुळ, विरहोत्कंठी, मीलनोत्सुक विश्व सहजपणे साकार झाले असेल. सूरदासांच्या या दिव्यस्पर्शाचे मर्म आकळल्यावाचून आपण त्यांचे अंतरंगदर्शन घेऊ शकणार नाही.

कर्मठ आणि बुद्धिवादी वेदांत्यांनी आणि दार्शनिकांनी निर्माण केलेला अध्यात्म-मार्गावरील शुष्क बुद्धिनिष्ठतेचा प्रभाव दूर करून सामान्यजनांना रुचेल, पचेल व आचरणात आणता येईल अशी हृदयाची भाषा वैष्णव आचार्यांनी प्रसारित केली आणि धर्मसुधारणेचा क्रांतिकारक झेंडा उभारला. वेदांचा कर्मठपणा आणि कठोर आचारधर्माच्या शृंखला यातून बहुजन समाजाला मुक्त करून त्याला प्रेमभक्तीच्या, जिव्हाळ्याच्या आणि उदारतेच्या प्रवाहात बुडवून काढण्याचे कार्य भागवतधर्माच्या आचार्यांनी दक्षिणेत घडविले. आळवाट संतकवी व अकराव्या शतकातील रामानुजाचार्य यांनी प्रेमप्रधान भक्तीचा पक्ष प्रभावीपणे मांडला व प्रचारिला. हेच कार्य उत्तरेत रामानंदांनी साधले. समाजातील दलितदीन थरांना जवळ घेण्याचे व भक्तीच्या महापुरात सामावून घेण्याचे भक्तिपंथाचे उद्धारक व सामावक कार्य उत्तर भारतात रामानंदांच्या प्रेरणेने गतिमान झाले. भागवतधर्मीय भक्तीची ही लाट उत्तर दक्षिणेतील धर्मनिष्ठजनांना आकृष्ट करू लागली. समाजसुधारणेचे आणि धार्मिक परिवर्तनाचे बीज या वैष्णव भक्तिप्रवाहाच्या प्रचंड लाटेत निश्चितपणे होते. पंधराव्या शतकात रामानंदांनी सगुण रामभक्ती व निर्गुणोपासना यांचा मेळ घालून या भक्तिप्रवाहात उत्तर भारताला बुडवून टाकले. महाराष्ट्रात नाथ आणि वारकरी पंथांचा वारसा सांगणाऱ्या ज्ञानदेवादी संतांनी प्रसारलेली ज्ञानात्मक सगुण भक्ती, सगुण-निर्गुणाचा मेळ, भगवद्गीता व भागवतावर आधारलेला ज्ञानभक्तीचा प्रवाह हा या उत्तर-दक्षिणेतील भक्तिप्रवाहाशी सर्वांशाने एकरूप नसला तरी उत्तर भारतातील भक्तिपंथावर रामानुजांचा जो अकराव्या शतकानंतर प्रभाव पडला त्याच्याशी बराचसा समांतर आहे. परंतु महाराष्ट्रातील संतांची तेराव्या शतकापासून सतराव्या शतकापर्यंतची भक्तिधारा ही ज्ञानोत्तर भक्तीने सगुण-निर्गुण उपासनांच्या समन्वयाने, अद्वैताच्या परिमळाने, निष्काम, निर्हेतुक प्रेमभावाच्या सूत्राने गुंफलेली, घडविलेली आणि किनारलेली आहे. उत्तर भारतीय भक्तिप्रवाहाने मोक्षाला महत्त्व दिले नाही. भक्ती हीच साधनेद्वारे मिळवायचे अंतिम साध्य मानिले आहे. सूरदास व उत्तर भारतीय संतकवींनी काव्य व सूर ही साधना मानून त्याद्वारे भक्तीची अत्युच्च भावावस्था हे परम ध्येय मानले. आत्मार्पण, आत्मनिवेदन, प्रेम, परमतन्मयता, रसमयता अशा पायऱ्यांनी ते आपल्या परमप्रिय दैवताच्या भक्तीत भिजले आहेत. महाराष्ट्रीय संतकवींची भक्ती ही ज्ञान, विवेक आणि अद्वैताचा पदर न सोडता उपास्य दैवताभोवती गुंजारव करते. त्यामुळे मीरेच्या, सूरदासांच्या भक्तीची उत्कटता, तद्रूपता, तन्मयता आणि सखोलता तिला लाभत नाही. ती सजाण, सावध व आत्मसंयमी भक्ती आहे. ती स्वतःला संपूर्णपणे झोकून द्यावयास, संपूर्ण आत्मसमर्पणास भावविभोरतेत बुडून जावयास समुत्सुक नाही. सूरदास हे मर्यादा-पुरुषोत्तम, सौंदर्यस्वरूपाचा महासागर जो श्रीकृष्ण त्याच्या स्वरूपात, बाललीलात, वात्सल्यप्रेमात देहभाव विसरून गेलेले आहेत. श्रीकृष्णाची मुरली, त्याची रासक्रीडा, गोपगोपींच्या प्रेमलीला, राधेचे भावविलास यात ते संपूर्ण समर्पित झालेले दिसतात. कृष्णाचे ते अंगठा चोखणे, त्याचे माखनप्रेम, कृष्णाच्या प्रेमातील राधेचा विलय यांचे जिवंत चित्रण त्यांनी समरसतेने केले आहे. महाराष्ट्रीय संतकवी **''सगुण-निर्गुण एकु गोविंदु रे!''** अशी ज्ञानात्मक भाषा बोलतात, तर सूरदासांना वाटते की, निर्गुण परब्रह्म तुम्हा-आम्हाला समजणार नाही. त्या रूपहीन निर्गुणाच्या उपासनेबद्दल गीतेतही, **''क्लेशोऽधिकतरस्तेषां अव्यक्तासक्त चेतसां''** अशा शब्दांत निर्गुणाची कठीणता विशद केली आहे. संतकवी सूरदास त्या सगुण श्रीकृष्णाच्या सौंदर्याने मोहित होतात. राधेच्या हृदयाने आणि लोचनांनी कृष्णाची, त्या नंदराणीच्या पुत्राची, त्या नंदनंदनाची मूर्ती न्याहाळतात. आपल्या

(पृष्ठ क्र. २४ वर)

# श्री रामेश्वर ज्योतिर्लिंग माहात्म्य

– श्री. मधुसूदन विठ्ठल सामंत तेरावळेकर
डोंबिवली (पूर्व), ठाणे.

रामप्रियाय रघुनाथ वरप्रदाय ।
नागप्रियाय नरकार्णव तारणाय
पुण्येषु पुण्य भरिताय
सुरचिंतनाय ।

मर्यादापुरुषोत्तम श्री रामप्रभु शिवभक्त होते आणि कैलासपती शिवशंकराच्या तोंडी अविरत रामनाम होते. अर्थात ही परस्परांची भक्ती अवर्णनीय होती. जगन्माता पार्वतीला रामनाममाहात्म्य सांगताना श्री महादेव सांगतात :

"राम राम रामेति
रमे रामे मनोरमे ।
सहस्त्र नाम
तुल्यं राम नाम वरानने ॥"

हे सुमुखी, पार्वती, श्री विष्णूच्या हजार नावांची बरोबरी एका रामनामात आहे.

दशाननाने सीतेचे हरण केले. श्री रामांना सीतेची विरहावस्था खूप जाणवली. प्रभु रामाच्या आज्ञेने सीताशोध करण्यासाठी मारुती निघाला. लंकेत अशोकवनात सीता सापडली. मारुतीने सीतेला आपली ओळख सांगून खुणेसाठी रामप्रभूंची मुद्रिका देऊन रामलक्ष्मणाचे कुशल सांगितले, आणि लवकरच प्रभु ससैन्य लंकेवर स्वारी करतील आणि तुझी सुटका करून तुला येथून घेऊन जातील असा दिलासा दिला.

मारुतीने अशोकवनात आपण येऊन गेल्याचे सर्व राक्षस वर्गाला समजावे या उद्देशाने सीता बसली होती तो वृक्ष सोडून रावणाच्या सगळ्या अशोक वाटिकेची नासधूस केली. रावण-सैनिकांकडून मुद्दाम बंधन करून घेतले, आणि रावणाचा दरबार, त्याचे सैन्यबळ यांचा पुरेपूर अंदाज घेतला. रावणाने चिडून मारुतीच्या शेपटीला अग्नि लावला, अर्थात मारुतीला जे हवे तेच मिळाले. शेपटीला अग्नि लागल्यावर मारुतीने उंच उड्डाण केले, रावणाचा सहस्त्र स्तंभांचा राजवाडा जाळून टाकला. त्यात रावणाचे असंख्य सैनिक व मुलगा अरवया मृत्युमुखी पडले.

येवढे झाल्यानंतर मारुती आनंदाची बातमी घेऊन आपल्या सहकाऱ्यांकडे आला. यावेळी प्रभु रामचंद्र गंधमादन पर्वतावर होते. त्या ठिकाणी मानसिक शांती लाभावी, सीतामाईचा लवकर शोध लागावा, आणि आपल्या वानर-सैन्याला यश आणि बल प्राप्त व्हावे यासाठी त्यांनी वाळूचे लिंग तयार करून त्याची मनोभावे पूजा करून शंकराची आराधना चालू ठेवली होती. त्यायोगे भोलानाथ महादेव प्रसन्न होऊन त्यांच्या कृपेने सीतामाईचा लवकर शोध लागला.

सीतादेवीचा शोध लागल्यामुळे श्री रामप्रभूंना खूप मनस्वी आनंद झाला. त्यांनी लंकेवर स्वारी करून सीतेला मुक्त करण्याचा विचार केला, आणि सर्व वानरसैन्याच्या बळावर लंकेत जाण्यासाठी अथांग सागरावर पूल तयार केला आणि रावणावर स्वारी केली.

"दुर्जन: करोति दुर्वृत्तं
न्युनं हरति साधव: ।
दशाननो हरत सीतां
बधनंच महोदधे ॥"

राम-रावणाचे तुंबळ युद्ध झाले. दोन्ही पक्षांचे अगणित लोक ठार झाले. अठरा पद्मे वानरसेना कामास आली. रावणाच्या संपूर्ण कुळाचा नाश झाला. रावणाची पत्नी सती मंदोदरी हिने रावणाला उद्देशून

"परस्त्री हरणं पापम् सर्वनाश करं खलू ।" असे सांगितल्याचा वाल्मिकी रामायणात उल्लेख आहे. ते अगदी खरे ठरले.

अयोध्यापती श्री रामप्रभूंनी रावणाचा पराभव करून सीता मुक्त केली. तेव्हा त्यांच्याकडून झालेल्या प्राणहानीमुळे त्यांचे मन विषण्ण झाले. दिवसेंदिवस त्यांची उद्विग्नता वाढत होती. त्यांचे मन कशातच रमेना. रामप्रभूंच्या अन्तर्मनाला एकसारखी टोचणी लागून राहिली होती.

रामांचे औदासिन्य महामुनी अगस्तीच्या लक्षात आले. त्यांनी रामप्रभूंना त्या ठिकाणी भगवान शंकराच्या ज्योतिर्लिंगाची स्थापना केल्यास मानसिक अस्थैर्य दूर होऊन मन:शांती लाभेल, असे सांगितले.

महामुनीच्या आदेशाप्रमाणे श्री रामप्रभूंनी भगवान श्री शंकराच्या दिव्य ज्योतिर्लिंगाची प्रतिष्ठापना करावी, असा मनोमन निर्धार केला. आपला एकनिष्ठ भक्त आणि सेवक मारुती याला कैलासाहून दिव्य ज्योतिर्लिंग आणण्यास पाठविले.

मारुतीला सांगितलेले कोणतेही काम बिनचूक आणि वेळीच पार पडते अशी सर्वांची, विशेषत: प्रभु रामरायांची खात्री आणि दृढ श्रद्धा होती. ज्येष्ठ शुद्ध दशमीच्या शुभमुहूर्तावर, पुष्य नक्षत्रावर ज्योतिर्लिंगाची स्थापना करण्याचा श्री रामाचा मनोदय होता, आणि तोच तर शुभमुहूर्त होता.

मारुतीकडून लिंग यायला वेळ लागल्यामुळे लिंगस्थापनेचा मुहूर्त टळून इप्सित कार्यात अडथळा निर्माण होऊ नये म्हणून सीतामाईने आपल्या हाताने एक वाळूचे लिंग तयार करून त्याची विधीविधानपूर्वक पूजा करून त्याची सर्व भक्तगणांसमवेत प्रतिष्ठापना केली.

स्थापना केलेल्या देवतेची आरती चालू असताना मारुती कैलासाहून भगवान शंकराचे दिव्य लिंग घेऊन हजर झाला, पण आपणास लिंग आणायला उशीर झाल्यामुळे लिंग-स्थापनेचा मुहूर्त टळू नये यासाठी पर्यायी उपाय म्हणून दुसरे एक लिंगाचे प्रतीक करून त्याची पूजा केली गेली, हे मारुतीच्या लागलीच लक्षात आले. आपल्याकडून आपणावर सोपविलेल्या

कार्यात कसूर झाल्यामुळे मारूतीला खूप वाईट वाटले आणि मनापासून तो खिन्न झाला.

श्री रामप्रभूंनाही या गोष्टीचे वैषम्य वाटले. ते मारूतीला अगदी प्रेमाने आणि मनापासून म्हणाले, ''हनुमंता, या जागी मी स्थापन केलेले लिंग तू तुझ्या हाताने काढ, आणि त्या जागी तू आणलेल्या दिव्य ज्योतिर्लिंगाची स्थापना कर! म्हणजे तुझ्या श्रमाचे चीज होईल, आणि तुला मानसिक समाधान मिळेल.''

श्री रामाच्या आज्ञेने आपण कैलासाहून आणलेले शिवलिंग पूजेच्या जागी ठेवावे व पूर्वी पूजन केलेले लिंग बाजूला ठेवावे म्हणून मारूती लिंग उचलू लागला, पण पुष्कळ प्रयत्न करूनही रामप्रभूंनी स्थापन केलेले लिंग काहीकेल्या जागचे हालेना.

त्यानंतर काहीसा विचार करून मारुतीने आणलेले लिंग तेथून जवळच काही अंतरावर विधिपूर्वक पूजा-अर्चा करून स्थापन केले आणि ते लिंग हनुमंताने स्थापन केले म्हणून त्याला 'हनुमदीश्वर' असे नाव देण्यात आले व श्री सीतारामांनी स्थापन केलेल्या पहिल्या लिंगाला 'रामेश्वर' असे नाव पडले.

अर्थातच मारूतीरायांनी स्थापन केलेल्या हनुमदीश्वर लिंगाचे प्रथम दर्शन घेऊन, मग रामेश्वराचे दर्शन घ्यावे, असा त्याचवेळी दंडक घातला गेला, आणि तो प्रघात आजही चालू आहे.

श्री सीतारामचंद्रप्रभूंनी स्थापन केलेल्या रामेश्वरलिंगाला अनन्यसाधारण महत्त्व आहे. श्री भगवान शंकराच्या सर्व ज्योतिर्लिंगात हे अत्यंत तेजस्वी लिंग आहे. दर्शनेच्छु भाविकांना हे लिंग दिव्य असल्याचे पडताळे आजही येत असतात.

या दिव्य साक्षात्कारी ज्योतिर्लिंगाचे, अर्थात रामेश्वराचे फार मोठे भव्य आणि सुंदर मंदिर बांधण्यात आले. या मंदिराचे बांधकाम म्हणजे वास्तुशिल्पाचा एक अप्रतिम नमुना आहे. श्री रामप्रभूंनी स्थापन केलेल्या या ज्योतिर्लिंगाची यात्रा जुन्या अखंड भारताच्या कानाकोपऱ्यातील सारे लोक भाविकतेने आणि दृढश्रद्धेने पूर्ण करतात. परदेशी लोक येथील निसर्गसौंदर्य व वास्तुशिल्पाचा नमुना पहाण्यासाठी या क्षेत्राला मुद्दाम भेटी देतात.

पवित्र पावन रामेश्वराच्या भव्य आणि दिव्य मंदिराच्या प्रवेशद्वारावर दहा मजली उंच प्रचंड गोपूर आहे. त्याच्या बांधकामाची कल्पना सामान्य लोकांच्या कल्पनेबाहेरची आहे. गोपुराचे बांधकाम, त्यावरील कोरीव मूर्ति, तसेच नक्षीकाम आणि उत्तुंग शिखरे पाहून मन प्रसन्न होतेच, व त्याचबरोबर त्यावेळचे प्रगत कलावंत कारागीर आणि आत्मियतेने काम करणारे मजूर यांच्याबद्दल नितांत आदर आणि अभिमान निर्माण होतो, मन भारावून जाते व सहजरीत्या परमेश्वराच्या विराट स्वरुपाचे दर्शन होते. मनुष्य देहभान आणि सर्वप्रकारच्या सांसारिक कटकटी येथे संपूर्णपणे विसरून जातो.

मंदिरात उंच उंच स्तंभांवर देवी-देवतांच्या सुंदर मूर्ति आणि चित्रे कोरलेली आहेत. बऱ्याच जागी सोंड उंच केलेले दगडी हत्ती उभे आहेत. यावरून रामेश्वर मंदिर हे गजान्त लक्ष्मी असणारे वैभवशाली मंदिर आहे, असेच हे दृश्य आहे. वालुकामय प्रदेशात केलेले एवढे असे भव्य बांधकाम पाहून आपल्या पूर्वीच्या प्रगत भारतीय संस्कृतीची पुरेपूर कल्पना येते. मंदिराच्या दर्शनी भागात सुमारे दीड पुरुष उंचीचा विशालकाय कोरीव दगडी नंदी आहे.

रामेश्वर मंदिरापासून दीड मैल अंतरावर पुराण-प्रसिद्ध गंधमादन पर्वत आहे. त्या ठिकाणी बिभीषण मंदिर, रामझरोका, रामघळी इत्यादी पहाण्यासारखी स्थळे असून ठिकठिकाणी सुंदर बगीचे निर्माण केलेले आहेत.

रामतीर्थ, लक्ष्मणतीर्थ, सीतातीर्थ, पांडवतीर्थ अशी अनेक तीर्थे या ठिकाणी असून प्रत्येक तीर्थाचे उष्णतामान व चव भिन्न आहे. या प्रत्येक तीर्थात भाविक यात्रेकरू श्रद्धेने स्नान करतात, आणि त्यांना आगळा-वेगळा असा उत्साह प्राप्त होतो.

आपल्या हिंदू धर्मशास्त्राप्रमाणे यात्रा करणाऱ्या यात्रेकरूंना चारीधामयात्रेचे फारमोठे महत्त्व सांगितलेले आहे. काशीची गंगा रामेश्वरला नेणे हे पुण्यप्रद होय! आजही अनेक भक्त पुण्यसंचयाच्या उद्देशाने चारीधाम यात्रा पार पाडून काशीहून रामेश्वरला गंगोदक नेतात.

कोणताही धार्मिक विधी करताना रामेश्वर संस्थानकडून अगोदर पावती घ्यावी लागते. ती पावती तेथील ब्राह्मणाकडे दिली की सर्व पूजा-साहित्य घेऊन ब्राह्मण पूजा करतात. पूजा झाल्यावर आपणाला प्रसाद आणि देवदर्शन यांचा लाभ होतो. तेथे प्रत्येक धार्मिक विधीचे दर ठरलेले आहेत.

शनिप्रदोष, भौमप्रदोष, महाशिवरात्र, आषाढी यात्रा इत्यादी सर्व उत्सव येथे उत्साहाने आणि मोठ्या थाटाने साजरे केले जातात. उत्सवप्रसंगी रामेश्वराची पालखी हत्तीवरून मिरविण्यात येते. देवी पार्वतीच्या सुवर्णमूर्तीची मंगळवार, शुक्रवार आणि उत्सवाच्या दिवशी पालखीमधून शोभायात्रा काढली जाते. या सर्व मिरवणुकीच्या वेळी दीपांचा आरास केला जातो. ही रोषणाई पाहाण्यासारखी असते.

नेहमी पहाटे चार वाजल्यापासून रात्री झोपेपर्यंत, म्हणजे सुमारे दहा-साडेदहा वाजेपर्यंत मंदिरात पूजा-अर्चा, दर्शने, आरती इत्यादी कार्यक्रम अविरत आणि अव्याहत चालू असतात. महाशिवरात्र आणि आषाढ शुक्लपक्ष असे पंधरा दिवसांचे भरगच्च कार्यक्रम असतात. त्यावेळी भारतातील कानाकोपऱ्यातील काश्मिर-नेपाळपासूनची सर्व भाविक माणसे यात्रेसाठी श्रद्धेने या ठिकाणी एकत्र येतात. या सर्व मंडळींचे नाना वेष, नाना भाषा, भिन्न भिन्न आचार-विचार-संस्कार असूनही त्यांच्या एकतेचे विराट दर्शन, रामेश्वराचा जयघोष सारे भक्त मोठ्या आदराने करीत असल्याचे येथे दिसून येते. त्यामुळे येथील सारा आसमंत पवित्र वातावरणाने भारावलेला असतो.

**ॐ रामेश्वराय तुभ्यं नमामि।**
**ॐ काशी विश्वेश्वराय तुभ्यं नमामि।**
**ॐ विष्णु वल्लभाय तुभ्यं नमामि।**

---

# उज्जयिनीनिवासी श्री महाकालेश्वर

**– श्री. मधुसूदन विठ्ठल सामंत तेरावळेकर**

आपला भारतदेश अनेक सनातनी परंपरा, भव्य आणि विस्तीर्ण अशी देवळे यामुळे अतिशय प्रसिद्धीस आला आहे. यात नाविन्य असे काहीच नाही. फार पूर्वी - अनादि काळापासून ऋषि-मुनींच्या परंपरेमधून चालत आलेला हा वारसा आहे.

मनोमन भक्ताची कसोटी घेऊन भक्त कसोटीला उतरल्यावर तात्काळ त्याला मनोवांच्छित सर्व गोष्टी देऊन त्याचे मनोरथ आणि सर्व इप्सित पूर्ण करणारा देव - भगवान शंकरच ! यांना कोणी कैलासनाथ, कोणी पशुपती, कोणी महादेव, कोणी भोलानाथ अशा अनेक नावांनी संबोधतात.

पुराणकाळी दुष्टवृत्तीच्या दानवांना भोलानाथांनी त्यांनी केलेल्या अघोर भक्तीमुळे प्रसन्न होऊन अमोघ वर दिले. आणि त्या वरांच्या योगाने स्वत: भोलानाथ अनेक वेळा अडचणीत आले हे सर्वांना माहीतच आहे.

पुराणकाळी शंकराच्या वरदानाने उन्मत्त बनलेले दैत्य शंकराचे भक्त होते. अही-मही, रावण-कुंभकर्ण, हिरण्यकश्यपू यांची उदाहरणे पाहाता सहज लक्षात येते. भगवान शंकराच्या वरामुळे भस्मासूर दैत्य खूप चढेल बनून साऱ्या त्रिभुवनाला त्याने त्राहि माम् केले आणि अखेर वरदात्या देवावर, म्हणजे प्रत्यक्ष महादेवावर तो फिरला. ही गोष्ट पुराणप्रसिद्ध आहे.

असे जरी असले तरी निरिच्छ, निराकारी, वैराग्य योगी अशा भगवान शंकराचा साऱ्या त्रिभुवनाला धाक आहे. त्यांच्याच इच्छेने साऱ्या जगताचे रहाट-गाडगे सुरळीत व नियमित चालते. राजा श्रीयाळ, सती महानंदा यांच्या खऱ्या मनापासूनच्या भक्तीने श्री भगवान शंकर प्रसन्न झाले आणि त्या दोघांच्या अनिवार इच्छेमुळे श्रीयाळ आणि महानंदा यांच्या नगरातील साऱ्या लोकांना सायुज्यपद प्रदान केले. परमेश्वराच्या ठिकाणी असणारी दृढ श्रद्धा व अलौकिक, आत्यंतिक असणारी भक्ती हेच कारण. उलट महादेवांचा द्वेष करणारा प्रत्यक्ष त्यांचा सासरा राजा दक्ष भोलानाथांच्या क्रोधामुळे नाश पावला.

आपल्या भारतीय संस्कृतीमध्ये सप्तपुऱ्यांचे माहात्म्य वर्णन करताना उज्जयनी क्षेत्राचे महत्त्व विशेष मानले जाते.

**''अयोध्या मथुरा गया**  
**काशी कांची अवंतिका ।**  
**पुरी द्वारावति चैव**  
**सप्तैते मोक्षदाइका ॥**

अवंतिका, अर्थात उज्जयिनी हे भारतात गुप्त वंशाचे राज्य असल्यापासून फार पुढे आलेले, विशेष स्थानमाहात्म्य असलेले असे पावन तीर्थक्षेत्र आहे, शिवाय संवत ही कालगणना सुरू करणाऱ्या विक्रमादित्य राजाची ही राजधानी होती.

गुप्त वंशाच्या राज्यकर्त्यांनी सदर उज्जयिनी शहराच्या भरभराटीला पोषक पार्श्वभूमी तयार केली. विद्या, कला, वाङ्मय यांची वाढ होणे, गणित, ज्योतिष, खगोलशास्त्र याबद्दलचे शोध अगर सिद्धांत तयार करणे, यासारख्या गोष्टींना योग्य प्रोत्साहन देऊन शोधकांना अगर कलावंतांना गुप्तकाळाच्या राजवटीत राजाश्रय दिला गेला.

यामुळे विद्या आणि कला यांची अभिरूची वाढून पंडितांनी गणित, ज्योतिष यांत शोध लावून प्राविण्य मिळविले. याच काळात वराहमिहीर या खगोल शास्त्रज्ञाने पहिली वेधशाळा याच ठिकाणी सुरू केली.

अवंतिका, अर्थात उज्जयिनी या ठिकाणी परब्रह्म परमात्मा पूर्णावतारी श्रीकृष्णाचे गुरुजी सांदिपनी आश्रम करून राहत होते. या ठिकाणी श्रीकृष्ण, बलराम आणि सुदामा यांनी गुरुगृही राहून, सर्व विद्या आत्मसात करून विद्यापारंगत झाल्याच्या कथा हरिवंश व हरिविजय यांत समाविष्ट आहेत.

क्षिप्रा नदीच्या काठी वसलेल्या या क्षेत्रात श्री महाकालेश्वर स्थित कसे झाले याबद्दल अशी गोष्ट सांगतात की पुरातन काळी चंद्रसेन नावाच्या राजाने आपल्या राज्याचा परचक्रापासून बचाव व्हावा, प्रजेला सुख लाभावे, उत्तरोत्तर राज्याची भरभराट व्हावी, या हेतूने भगवान शंकराची मनोमन पूजा केली. ही पूजा एका गवळ्याच्या मुलाने पाहिली त्याला कुतूहल वाटले. त्या गवळ्याच्या मुलाने राजाने घेतला तसलाच एक लिंगाकार दगड घेऊन राजाने केली तशीच मनोभावे व यथासांग भगवान शंकराची पूजा केली. त्या आपण केलेल्या पूजेत तो इतका तल्लीन आणि दंग झाला की त्या एकाग्रतेत त्याला कसलेही भान राहिले नाही.

आईने मुलाला घरात जेवण्यासाठी खूप हाका मारल्या, पण मुलगा बिलकुल भानावर नसल्याने त्याने मातेला काहीच उत्तर दिले नाही. त्यामुळे आई मुलाजवळ गेली. त्याचे उद्योग पाहून तिला काहीसा सात्त्विक राग आला. त्या रागाच्या भरात तिने मुलाने केलेली पूजा संपूर्ण उधळून टाकली व शिवलिंग म्हणून पूजलेला दगड उचलून दूर फेकून दिला. यावेळी तो मुलगा भानावर आला होता. त्याला मातेने पूजा विस्कटवलेली पाहून अतीव असे दु:ख झाले. त्याने त्या ठिकाणी शंकराऽऽशंकरा महादेवाऽऽ पशुपतेऽऽ अशी नांवे घेत परमेश्वराचा धावा केला आणि त्यातच त्याला ग्लानी येऊन तो निचेष्ट पडला.

त्यामुळे मुलाचा भाव, श्रद्धा आणि परमेश्वरावरील नितांत निष्ठा यांच्या समन्वयामुळे तो व्याकूळ झालेला पाहून त्या ठिकाणी ईश्वराला धाव घ्यावीच लागली. तो

बालभक्त पडलेल्या जागी प्रत्यक्ष भगवान शंकर-देवांचे देव साक्षात् प्रगट झाले.

त्या गोपपुत्राला दर्शन देऊन स्नेहार्द्र दृष्टीने पाहिले. पूजा उधळल्याबद्दल आपल्या मातेला क्षमा करण्याविषयी त्याने देवाकडे विनंती केली. महादेवाने त्याची विनंती मान्य करून त्या गोपपुत्राला आणि त्याच्या आईला आशीर्वचनयुक्त दर्शन देऊन भोलानाथ महाराज अंतर्धान पावले.

भगवान शंकरांचे गोपपुत्राला प्रत्यक्ष दर्शन झाले हे राजा चंद्रसेनाला समजताच तो लगबगीने त्या ठिकाणी आला. जिज्ञासापूर्वक सारी गोष्ट जाणून घेऊन त्याने मनोमन त्या गोपपुत्राला आणि त्याच्या आईला वंदन केले. ज्या ठिकाणी भगवान शंकर प्रगट होऊन गोपबाळाला त्यांनी दर्शन दिले व अंतर्धान पावले. ती जागा खोदून पाहिली तेव्हा त्या जागी सूर्यासारखे प्रकाशमान, तेजःपुंज, ज्वालायुक्त असे शिवलिंग राजाला मिळाले. या एकूण प्रकाराबद्दल त्याला अत्यंत गूढ वाटून काहीसे आश्चर्यही वाटले आणि अत्यंत परमानंद झाला.

स्वयंभू महाकालेश्वराच्या मूर्तीची चंद्रसेन राजाने प्राणप्रतिष्ठा चांगले अधिकारसंपन्न ब्राह्मण आणवून करून घेतली आणि त्या ठिकाणी भव्य अप्रतिम मंदिर बांधले. सांप्रत आहे ते मंदिर त्या काळचे पुरातन मंदिर आहे, असे मानले जाते.

**"अवन्तिकायां विहिता वतारम् ।**
**मुक्तिप्रदानाय च सज्जनानाम् ॥**
**अकाल मृत्यो: परि-रक्षणार्थम् ।**
**वन्दे महाकाल महा सुरेशम् ॥"**

श्रीमत् आद्य शंकराचार्यांनी महाकालेश्वर ज्योतिर्लिंगाचे यथार्थ वर्णन करून त्याचे माहात्म्य वरील श्लोकांत ग्रथित केले आहे. मंदिरातील महाकालेश्वराची पिंडी शाळिग्राम शीळेची असून ती चांदीच्या पत्र्याने मढविलेली आहे. नागविभूषित व भस्मचर्चित अशी महाकालेश्वराची पिंडी मोहक आणि आल्हादकारक वाटते.

मंदिरातील कोनाड्यात कार्तिकस्वामी व गणपती यांच्या नयनरम्य मूर्ति बसविलेल्या आहेत. मंदिरात अखंड तूपाचे नंदादीप तेवत असतात.

देवपूजेची सोन्या-चांदीची उपकरणे, मंदिराचे सुवर्णकळस, इतकेच नाही, तर मंदिराच्या सर्व दरवाजांना चांदीचा पत्रा मढविलेला असे वैभवशाली श्रीमंत देवस्थान पाहून कुणाही भाविक भक्ताच्या मनात सहजरीत्या ज्याचा भांडारी धनपती कुबेर त्याला काय उणे ! असे विचार मनात येणे अगदी साहजिक ! श्रद्धाळू आणि भाविक भक्तांच्या उदार देणग्यांनी या श्री महाकालेश्वर देवस्थानाचे वैभव दिवसेंदिवस शुक्लेंदुवत वृद्धिंगत होत आहे.

महाकालेश्वर ज्योतिर्लिंगाची उत्पत्ती आणि वास्तव्य याबद्दल आणखीही एक गोष्ट अशी प्रचलित आहे की दूषण नावाचा एक महाबलाढ्य असूर देवांच्या वरदानामुळे खूप माजला आणि उन्मत्तपणाने त्याने सज्जनांना आणि ईश्वरभक्त लोकांना अतोनात त्रास द्यायला सुरुवात केली. याच्या त्रासामुळे सारी नगरी उद्ध्वस्त झाली. सामान्य लोकांच्या आटोक्याबाहेर असणारा उन्मत्त आणि क्रूर दैत्य, अलौकिक अगर अवलिया असा अवतार निर्माण झाल्याशिवाय केव्हाही आटोपणार नाही या गोष्टीची सर्व नागरिकांना पुरेपूर कल्पना आली. त्यांनी भगवन्ताची मनोमन एकाग्रतेने आराधना करून करुणा भाकली; आणि करुणाघन परमेश्वराला प्रसन्न करून घेतले.

आर्त भक्तांच्या भक्तीला भगवान शंकर तात्काळ प्रगट झाले आणि धावा करणाऱ्या साऱ्या मंडळींना त्यांनी अभय दिले.

अखेर भक्तांच्या रक्षणासाठी-हितासाठी, तसेच कल्याणासाठी महाकालेश्वराच्या रुपाने ईश्वराने अवतार घेतला. त्या दुष्ट व उन्मत्त दूषण दैत्याचा नाश करून सर्व नगरीला भयमुक्त केले. सारे लोक आनंदीत झाले.

भक्तीला तात्काळ प्रसन्न होऊन भक्तमनोरथ पूर्ण करणाऱ्या महाकालेश्वराची सर्वांनी प्रार्थना करून त्यांना आपल्या हितासाठी, कल्याणासाठी आणि संरक्षणासाठी याच नगरीत कायम वास्तव्य करावे अशी विनन्ती केली व सर्व आर्तांच्या विनंतीवरून दिव्य ज्योतिर्लिंगाच्या रूपाने महाकाल शंकर या नगरीत कायम वास्तव्य करून स्थित झाले....

....आणि साऱ्या भक्तगणांनी महाकालेश्वराचे ध्यान करून करुणायुक्त स्तवन केले.

**शिवकान्त शंभो शशांकार्ध मौले ।**
**महेशान शूलिन जटाजूट धारीन् ॥**
**त्वमेको जगद्व्यापको विश्वरूपम् ।**
**प्रसीद् प्रसीद् प्रभो पूर्ण रूपम् ॥**
**प्रभो शूल पाणे विभो विश्वनाथ् ।**
**महादेव शंभो महेश त्रिनेत्र ॥**
**शिवाकान्त शांत स्मरारे मुरारे ।**
**त्वदन्यो वरेण्या नमान्यो नगण्या ॥**
**नमस्ते नमस्ते विभो विश्वमूर्ते ।**
**नमस्ते नमस्ते चिदानंद मूर्ते ॥**
**नमस्ते नमस्ते तमो योग गम्य ।**
**नमस्ते नमस्ते श्रुति ज्ञान गम्य ॥**

इतिहासप्रसिद्ध उज्जयनी शहर पुराणकाळामध्ये महाकालेश्वराच्या वास्तव्याने महत्त्व पावले, तर मौर्य आणि गुप्त राजांची राजधानी असल्यामुळे त्या काळात समृद्धीचा ओघ या शहराकडे आपणहून वळला. कारण "राजा जाय ज्या स्थला तीच होय राजधानी", असे म्हटले जाते. राजा गुणग्राहक असून विद्वानांचा चाहता असला तर भरभराटीला वेळ लागत नाही.

गुप्तराजे वरील कोणत्याहीबाबतीत कमी नव्हते. राजांनी विद्वानांचा योग्य मान ठेवून जरूर त्यावेळी राजाश्रय दिल्याने धर्म, ज्ञान, कला, शास्त्र यांचे माहेरघर अवन्तिकापुरी बनली.

महाकवी कालिदास यांनी याच नगरीत अनेक ग्रंथ लिहिले. वराहमिहीर याने या ठिकाणी पहिली वेधशाळा सुरू केली. राजा भर्तृहरीचे त्रिशतक (नीतिशतक, शृंगारशतक, वैराग्यशतक) येथेच निर्माण झाले. क्षिप्रा नदीचे सान्निध्य लाभलेल्या या

अवन्तिका क्षेत्राला महाकालेश्वराच्या वास्तव्याने अतिशय महत्त्व आले. या क्षेत्राला इंद्रपुरी असेही नाव आहे.

महाकालेश्वराच्या देवळाव्यतिरिक्त उज्जैयिनी क्षेत्रात आणखीही अनेक मंदिरे आणि तीर्थक्षेत्रे आहेत. त्या ठिकाणी होणाऱ्या उत्सव, समारंभाची यात्रेकरूंना पर्वणी लाभते.

आपल्याकडे नाशिक, पंचवटी, नृसिंहवाडी या ठिकाणी सिंहस्थाचे महत्त्व मानून स्नानार्थ भाविकांची गर्दी जमते त्याप्रमाणे याही ठिकाणी गुरु सिंह राशीत गेल्यावर प्रचंड कुंभमेळा भरतो. या कुंभमेळ्याला भारताच्या सर्व भागातून लक्षावधी माणसे तीर्थस्नानासाठी येतात.

या ठिकाणी दौलतराव शिंदे यांची पत्नी बायजाबाई हिने श्री गोपाळकृष्णाचे भव्य आणि अप्रतिम मंदिर बांधले आहे. या मंदिराच्या बांधकामाच्या वेळी शिल्पकारांनी आपले कलाकौशल्य संपूर्णतया खर्च केले, असे पाहाणाऱ्याला वाटते.

या मंदिरात गोपाळकृष्ण-राधा, गरूड आणि शंकर यांच्या मूर्ती अतिशय रेखीव असून वैकुंठ चतुर्दशी, गोवर्धनोत्सव, गोकुळाष्टमी, हे उत्सव फार मोठ्या उत्साहाने व थाटामाटाने साजरे होतात. हे उत्सव श्री बायजाबाई शिंदे (महाराणी) यांनी सुरू केले. या उत्सवप्रसंगी भगवान् महाकालेश्वराची पालखी फार मोठ्या मिरवणुकीने येते व यावेळी गोपाळकृष्णाची तुळशीपत्रे वाहून महापूजा होते.

नंतर महाकालेश्वराच्या मंदिरात गोपाळकृष्णाची पालखी जाते. त्या ठिकाणी गोपाळकृष्णाची यथासांग शोडषोपचारे पूजा केली जाते. या पूजाविधीला हरि-हर-भेट म्हटले जाते. ही हरि-हर-भेटीची प्रथा महाराणी बायजाबाई शिंदे यांनी सुरू केली.

त्यावेळच्या लोकांच्या मनात ईश्वराविषयी असणारा आस्तिक्य भाव, परमेश्वराविषयी असणारी प्रेमभावना, भक्तमंडळींना आणि प्रेक्षक वर्गाला आपले देहभान विसरायला लावते.

अशा वैभवशाली दिगंत कीर्तिच्या देवस्थानावर यवनी सत्तेमध्ये मुसलमान लोकांचे आक्रमण अगर देवस्थानची लूट झाली नसती तरच आश्चर्य !

सतराव्या शतकाच्या प्रारंभी दिल्लीचा सत्तांध यवन बादशहा शमसुद्दीन याने फार मोठ्या सैन्यानिशी या देवस्थानावर हल्ला करून देवळातील अगणित संपत्ती लुटली आणि देवळातील महाकालेश्वराची लिंगमूर्ति उखडून काढली व कोटीतीर्थांत लोटून दिली व त्या जागी मशिद उभी केली.

**''घटं भिद्यात् पटम् छिद्यात्**
**कुर्यात रासभ रोहणम् ।**
**येन केन प्रकारेण**
**प्रसिद्धः पुरुषो भवेत् ।।''**

ईश्वरी कृपेने या धर्मवेड्या शहाची सत्ता लौकरच संपुष्टात आली आणि रामचंद्रबाबा शेणवी नावाच्या ख्यातनाम पुरुषाच्या सल्ल्याने आणि मदतीने राणोजी शिंदे यांच्याकरवी या धर्मस्थळाला पूर्वरूप देण्याचा विचार झाला.

सरदार राणोजी शिंद्यांनी निवडक कसलेल्या सेनेची कुमक घेऊन मशिद पाडली, पूर्ववत् भव्य मंदिर बांधले आणि अनेक वर्षे कोटीतीर्थात असणारे महाकालेश्वराचे ज्योतिर्लिंग वर काढले. मंदिरात जागच्या जागी ठेवून, चांगले आचारसंपन्न व विद्वान ब्राह्मण आणून विधिवत शास्त्रोक्त प्राणप्रतिष्ठा व पूजन केले.

याव्यतिरिक्त उज्जयनी क्षेत्रात आणखी अनेक देवळे आहेत. महाकाली मंदिर हे महाकवी कालिदासाचे आराध्य दैवत आहे, जिच्या प्रसादाने कवी कालिदास वाचस्पती बनले, त्यांच्याकडून अनेक ग्रंथसंपदा निर्माण झाली.

महाकाली देवीचे ध्यान अतिशय उग्र असून ती खूप उंचावर आहे, म्हणून तिला गडावरची कालिका असेही म्हणतात. या ठिकाणी सूर्यमंदिर, मंगळ मंदिर, तसेच भर्तृहरीनाथाची गुंफा पहाण्यासारखी आहे.

**ॐ महाकालेश्वराय तुभ्यं नमामि ।**
**ॐ नरकार्णव तारणाय तुभ्यं नमामि ।**

---

(पृष्ठ क्र. १९ वरून)

चंचल प्रमाथी इंद्रियरूपी गायीलाही आपल्या गोधनाबरोबर सांभाळण्याचे काम सूरदास त्या गोपाळाच्या हाती सोपवितात. सूरदास कृष्णामध्ये एवढे बुडाले आहेत की, तानसेनाच्या कंठातून त्यांची प्रेमरागिणी ऐकून मंत्रमुग्ध झालेल्या व स्वत:चे गुणगान करावयास सांगणाऱ्या सम्राट अकबरासही **''माहिन रह्यौ मन ये ठौर''** या शब्दांनी आपली कृष्णमयता पटवून परत पाठवितात. हीच त्यांच्या अनन्यतेची विजयपताका आहे.

हा आत्मसाक्षात्कारी भक्तीचा प्रेमपंथ कधीही मरणारा नाही. देहदंड, कर्मकांड आणि बुद्धिप्रवण आचारधर्माहून अगदी निराळी, पण रसमय अशी ही प्रेमाची मीलनोत्सुक व विरहाची उत्कट अनुरक्त भक्ती आहे. सुमारे इ.स. १४८० ते १५६० पर्यंतच्या कालखंडात या दिव्यदृष्टीच्या अंध भावकवीने आपल्या 'सूरसागरात', 'सूरसारावली'त आणि 'साहित्यलक्ष्मी'त साऱ्या भागवतभक्तीच्या आंतरविश्वाला अवगाहन करावयास लावले आणि शतकानुशतके ही प्रेमाची ज्योत प्रज्वलित करून ठेवली. त्यांचे शुद्धाद्वैती वैष्णवपंथी गुरू श्रीवल्लभाचार्य यांनी आपल्या समर्पणात्मक, प्रेमरागात्मक विचारधारेने दक्षिणेत संचार करून दिग्विजय प्राप्त केल्यानंतर इ.स. १५१४ च्या सुमारास सूरदासांची व त्यांची गाठ पडली. त्यांना कृपामय आणि कृष्णप्रेमपर पुष्टी मार्गाचा दिव्य उपदेश घडल्यानंतर सूरदासांची कविप्रतिभा नवनवी स्वरालंकारांची लेणी लेवून कृष्णप्रेमात रंगली, नाचली, प्रेमोन्मत्त झाली. अशी ही कोणती जादू श्रीवल्लभाचार्यांनी सूरदासांवर केली की, ज्यामुळे तो सगुणसुंदर श्यामल कृष्ण परमात्मा त्यांच्या मांडीवर खेळू लागला, त्यांच्या हृदयात वात्सल्याचे, प्रेमाचे, राधाभावाचे तरंग उठवू लागला ? सूरदासांनी प्रेमभक्तीच्या विश्वात भावव्याकुळतेचा आणि तन्मयप्रेमाचा जो इतिहास घडविला, त्याचा काळावर उमटलेला आलेख कधीही पुसून जाणार नाही.

# तुमच्या-आमच्यातीलच 'अशीही माणसं' असू शकतात !

- श्री. ह. ल. रानडे
शनिवार पेठ, सातारा.

**त्या** दिवशी गणपतराव एस्.टी.मधून प्रवास करीत होते तेव्हा त्यांना त्या गाडीचा कंडक्टर प्रत्येक प्रवाशाला तिकिट घेतल्यावर त्याचे उरलेले पैसे लगेच परत करताना दिसला. सुटे पैसे नाहीत, एवढी घाई कशाला ? तुमचं उतरायचं ठिकाण अजून खूप लांब आहे वगैरे सबबी सांगून इतर कंडक्टरांप्रमाणे सुटे पैसे देण्याचे टाळत नव्हता. सुटे पैसे नसतील तर तो रुपयाची नोट काढून त्यांच्यापैकी एका प्रवाशाजवळ देई व त्याला सांगे की तुम्ही या नोटेचे सुटे पैसे करून राहिले असतील त्यांचे पैसे परत करा, म्हणजे मग मजजवळ कोणाचे देणे रहाणार नाही.

सुटे पैसे नाहीत म्हणून पैसे परत करण्याचे टाळणारे किंवा ते मागितल्यावर रागावणारे कंडक्टर गणपतरावांनी प्रवास करताना पाहिले होते. म्हणून या अगदी वेगळ्या पद्धतीने वागणाऱ्या कंडक्टरचे गणपतरावांना आश्चर्य वाटले व कौतुकपण वाटले व हा कंडक्टर एवढा प्रामाणिक कसा काय बनला, हे जाणून घेण्याचे त्यांचे कुतूहलपण जागृत झाले. सुदैवाने त्या दिवशी गणपतरावांना कंडक्टरजवळचीच जागा बसावयास मिळाल्यामुळे त्यांना त्यांची जिज्ञासा पूर्णपण करून घेता आली.

सर्वांना तिकिटे देऊन झाल्यावर कंडक्टर आपल्या जागेवर बसण्यासाठी आला तेव्हा गणपतराव त्याला म्हणाले, "तुमची व माझी पूर्वीची ओळख मुळीच नाही. तरीपण मी तुम्हाला एक गोष्ट विचारू का ?" कंडक्टरने चट्‌कन उत्तर दिले, "अहो, त्याला परवानगी कशाला हवी ? तुम्हाला जे काय विचारायचे ते अगदी मोकळेपणी विचारा ना !" गणपतराव म्हणाले, "अहो, मी तुम्हाला गाडीत बसल्यापासून बघतोय ! तुम्ही बिलकुल त्रासलेले दिसले नाहीत. प्रवाशांवर रागावताना, खेकसताना दिसले नाहीत. शिवाय तुम्ही अगदी प्रामाणिकपणे प्रत्येक प्रवाशाचे उरलेले पैसे सबबी न सांगता परत करता. तर, हा चांगुलपणा, मनाचा मोठेपणा, प्रामाणिकपणा, निर्लोभीपणा, आनंदी वृत्ती हे गुण तुम्ही कसे काय आत्मसात केले, ते मला तुम्ही सांगाल का ? आजकाल तर हे सद्गुण लोपत चालले आहेत आणि त्यामुळे सामान्य माणसांना खूप हाल-अपेष्टा, मानसिक त्रास व आर्थिक नुकसानपण सोसावे लागत आहे. आपल्या या चांगल्या वागण्याची एखादा माणूस का होईना दखल घेत आहे, हे पाहून कंडक्टरचा चेहरा आनंदाने चांगलाच खुलला व त्याने आपल्या सदाचाराचे मर्म अगदी खुल्या दिलाने गणपतरावांना सांगितले.

कंडक्टर म्हणाला, "आजकाल सत्प्रवृत्त माणसे लोपत चालली आहेत, हे अगदी कटु सत्य आहे. पण त्याला आपणच जबाबदार आहोत. अहो ! प्रत्येकाने सत्याने वागण्याचे ठरविले तर तसे वागता येणार नाही का ? पण प्रत्येकजण म्हणतो, मी एकट्याने वागून काय फरक पडणार ? सर्वजण जेव्हा सत्याने वागतील तेव्हा मीपण तसे वागण्याचा प्रयत्न करीन. आता मला सांगा, सर्वजण केव्हा सत्याचे व्रत घेणार व ते त्यांनी घेतले नाही तर जगात सत्य कधी व कसे काय नांदणार ! म्हणून माझ्या मते आपणच आपल्यापासून सत्याने वागण्यास सुरुवात करावयास हवी. बाकीचे कसे का वागेनात, आपण काय म्हणून नीतिनियम पायदळी तुडवायचे ? सोन्याने सोन्यासारखे वागावयास नको का ? आता माझ्याबाबत जर तुम्ही विचाराल तर माझ्या चांगल्या वागण्याचे बरेचसे श्रेय माझ्या माता-पितरांकडे जाते. माझे आई-वडील धार्मिक प्रवृत्तीचे असल्यामुळे त्यांची वागणूक अगदी सात्त्विक व आदर्शच होती. त्यांनी नीतिनियम अगदी प्राणापलीकडे जपले व अशा वातावरणात मी वाढल्यामुळे स्वाभाविकच सत्य, प्रामाणिकपणा, कर्तव्यनिष्ठा, बंधुभाव, त्याग, सेवा वगैरे सद्गुण माझ्या अंगात उतरले. पण त्यांनी जरी या सद्गुणांची पेरणी केली तरी शाळेतील एका गुरुजींनी त्यांची चांगलीच जोपासना केली. ते गुरुजी आम्हाला माणसाने कशासाठी जगावयाचे व ते कसे हे वेळोवेळी निरनिराळ्या संदर्भातून, गोष्टींमधून स्पष्ट करून सांगत. एवढेच नव्हे, तर आम्ही पुढील आयुष्यात त्याप्रमाणे वागू म्हणून आमच्याकडून शपथापण घेत. सदर गुरुजी आम्हाला इंग्रजी शिकवत. त्यांनी आम्हाला जीवनाचे तत्त्वज्ञान सांगणारी "MILLER OF THE DEE" ही कविता इतक्या तळमळीने व तन्मयतेने शिकवली की ती माझ्या अंत:करणात इतकी खोलवर जाऊन घर करून बसली आहे की मी त्यातील तत्त्वज्ञान जन्मात कधीच विसरणार नाही.

तुम्हीसुद्धा ही कविता शाळेत शिकला असाल." पण त्या कवितेचा कंडक्टरच्या जीवनावर एवढा काय प्रकाश पडला, हे जाणून घेण्यासाठी म्हणून गणपतराव म्हणाले, "मला तितकेसे स्मरत नाही."

"अहो ! ती कविता गुरुजींनी ज्या दिवशी शिकवली त्या दिवशी त्यांनी गात गातच वर्गात प्रवेश केला. आम्ही सर्व विद्यार्थी ते पाहून अगदी आश्चर्यचकित झालो. तेव्हा ते म्हणाले.... तुम्हाला माझ्या गाण्यामुळे आश्चर्य वाटणे अगदी स्वाभाविक आहे. पण मित्रांनो, आज आपल्याला जी कविता शिकायची ती 'जीवनाचे गाणे' कसे गावे हे सांगणाऱ्या खेड्यातील एका साध्या गिरणबाबूची. ती कविता शिकविण्यापूर्वी त्याचा अर्थच मी तुम्हाला प्रथम सांगतो. एका नदीकाठी एक गिरणबाबू आपल्या झोपडीत रहात होता. तो सकाळपासून सायंकाळपर्यंत सतत काम करीत रहायचा व ते करीत असताना गात रहायचा. त्यामुळे त्याला कामाचा शीण होत नव्हता. तो गिरणबाबू नेहमीच हसतमुख असे. तो कधीही कोणाचा मत्सर करीत नसे. ह्यामुळे तो म्हणे की माझापण कोणी द्वेष करीत नाही. त्याची अशातऱ्हेची आनंदी वृत्ती

पाहून त्या ठिकाणच्या राजाला त्याचा हेवा वाटायचा. तेव्हा तो एकदा त्या गिरणबाबूकडे आला व म्हणाला, "अरे ! मी राजा असूनही तुझ्यासारखा आनंदी नाही. अन् तू एक साधासुधा गिरणीवाला असूनसुद्धा नेहमी अगदी खुशीत असतोस. हे कसे काय ? मला सांग ना त्याचे इंगित."

गिरणबाबू प्रथम गोंधळला व त्याने मान खाली घातली. तो काहीच बोलेना. तेव्हा राजा त्याला म्हणाला, "भिऊ नकोस ! अरे, मी जरी राजा असलो तरी नेहमीच आनंदात राहू शकत नसल्यामुळे तुझ्या समाधानाचे मर्म समजून घेण्याची मला तीव्र इच्छा आहे." तेव्हा गिरणबाबू उत्तरला, "महाराज, मी उजाडल्यापासून मावळेपर्यंत स्वत:ला सतत कामात गुंतवून ठेवतो. माझे काम संपल्यावरच मी दमतो व मगच विश्रांती घेतो. मी काम करीत असल्यामुळेच मी माझ्या कुटुंबाचे पालनपोषण करू शकतो. माझी बायकोमुले व मित्र यांच्यावर मी खरेखुरे प्रेम करतो. मला कोणीच शत्रू नाही. मी कधी कर्ज काढत नाही, कारण मला ते फेडणे शक्य नाही. कर्ज डोक्यावर नसल्यामुळे मला शांत झोप लागते. जी नदी माझी गिरणी चालविते व ज्यामुळे माझ्या बायकोमुलांना भाकरी मिळते त्या नदीचे उपकार मी कधीच विसरत नाही. मी तिचे ऋण मानून तिला नमस्कार करून तिच्याबद्दलची माझी कृतज्ञता व्यक्त करतो."

गिरणबाबूच्या सुखी जीवनाचे रहस्य ऐकून राजा स्तिमित झाला व त्याला म्हणाला, "शाब्बास ! अरे, केवढे हे तुझे जीवनाबद्दलचे साधे व सोपे तत्त्वज्ञान ! दोस्ता ! तुझी टोपी जरी पीठाने माखलेली असली तरी माझ्या मुकुटापेक्षा मौल्यवान् आहे. तुझी गिरणी तर माझ्या साम्राज्याच्या तोडीची आहे. अरे ! तुझ्यासारखी साधी निरागस माणसेच माझ्या राज्याचे फार मोठे वैभव आहे. भगवान् तुझे भले करो !"

कवितेचा अर्थ सांगितल्यावर गुरुजींनी त्यातील तत्त्वज्ञानावर चांगला प्रकाश टाकून त्याचा मतितार्थ चांगलाच स्पष्ट केला. ते विद्यार्थ्यांना पुढे म्हणाले, "मुलांनो ! तुम्हीपण त्या गिरणबाबूप्रमाणे कोणाचाही द्वेष न करता सतत काम करीत राहिलात, सर्वांवर निरतिशय प्रेम केलेत, कर्ज काढले नाही, अन्नदात्याबद्दल कृतज्ञ राहिलात तर तुम्हीसुद्धा त्या गिरणबाबूप्रमाणे अगदी उत्कृष्ट असे जीवन जगू शकाल. मग पुढील आयुष्यात त्या गिरणबाबूप्रमाणे जीवन जगून तुम्ही जनतेपुढे आदर्शच ठेवणार ना !" सर्वच विद्यार्थी "हो, हो" म्हटल्यावर गुरुजींना खूप आनंद झाला.

तेव्हा, गणपतराव, तुम्हीच मला सांगा की माझ्या आई-वडिलांनी, गुरुजनांनी माझ्यावर एवढे चांगले सुसंस्कार केल्यावर मी प्रवाशांचे उरलेले पैसे परत न करता कसे काय ठेवू शकतो ? तसेच, प्रवाशांच्या जीवावरच एस्.टी. चालत असल्यामुळेच ते गर्दी करतात किंवा थोडीफार अन्य तक्रार करतात म्हणून कसा काय रागावू शकतो ? शिकलेलं जर जीवनात उतरविले नाही तरमग त्या शिक्षणाचा काय उपयोग ?" यावर गणपतराव उद्गारले, "तुम्ही म्हणता ते अगदी सत्य आहे, तुमच्या आईवडिलांची व गुरुजींची शिकवण तुम्ही वाऱ्यावर न सोडता आचरणात आणता याबद्दल तुमचे कौतुक करावे तेवढे कमीच, कारण माणसे पुष्कळ ऐकतात, वाचतात, बोलतातसुद्धा, पण कृतीच्या नावाने शून्यच."

एवढे सर्व ऐकूनही गणपतरावांची एक शंका राहिलीच व त्याबद्दल त्यांनी कंडक्टरला विचारले, "तुमच्या या आदर्श वागणुकीचा तुम्हाला काही वैयक्तिक फायदा झाला का ?" कंडक्टर म्हणाला, "हो ! खूपच झाला. माझ्या सद्वर्तनाचे पुरेपूर माप भगवंताने माझ्या पदरात टाकले. तीसुद्धा सांगण्यासारखीच गोष्ट आहे. मी एका शहरात एका वाड्यात भाड्याच्या जागेत गेली १०-१२ वर्षे रहात आहे. त्या वाड्याचे फ्लॅटस् करण्याचे घरमालकाने ठरविले व प्रत्येक भाडेकरूकडून योग्य ते पैसे घेऊन त्यांना ते देण्याचे ठरविले. मला फ्लॅट मिळण्यासाठी तेवढे पैसे भरणे शक्य नव्हते, तेव्हा मी मालकाला म्हटले की मी तुमची जागा सोडतो व दुसरी जागा पहातो. तेव्हा घरमालक मला म्हणाले, "अहो, मी कुठे तुमच्याकडे फ्लॅटचे पैसे मागितलेत ? मला ठाऊक आहे की तुम्ही सरळमार्गाने व अत्यंत सचोटीने नोकरी करीत असल्यामुळे तुमच्याजवळ एवढे पैसे असणार नाहीत. म्हणून आम्ही तुमचा अपवाद करण्याचे ठरवले आहे. तुम्हाला आम्ही आमच्या खर्चाने फ्लॅट बांधून देणार व त्यालासुद्धा जुने भाडे आकारणार !" घरमालकाचे हे शब्द ऐकल्यावर मला खूप गहिवरून आले व मी त्यांना म्हणालो, "अहो, तुम्ही तुमच्या खर्चाने फ्लॅट बांधून देत आहात हे माझ्यावर खूपच उपकार आहेत. पण पूर्वीचेच भाडे आकारून तुम्ही तुमचे नुकसानच करून घेत नाही का ?" त्यावर मालक उद्गारले, "त्या नुकसानापेक्षा तुम्ही आमचे घर सोडून गेल्यावर मात्र आमचे जास्त नुकसान होईल. अहो ! तुमचे बिऱ्हाड आमच्या वाड्यात आल्यापासून आम्हाला आमच्या धंद्यात खूप बरकत आलीय. तुमच्या अस्तित्वात लक्ष्मी आहे म्हणून वाट्टेल ते झाले तरी आम्ही तुम्हाला आमची जागा सोडून जाऊ देणार नाही."

"मग गणपतराव ! आता सांगा की यापेक्षा माझा आणखी कोणता जीवनात फायदा व्हायचा राहिला ?" या प्रश्नाला गणपतरावांजवळ उत्तर नसल्यामुळे ते कंडक्टरच्या आनंदी चेहऱ्याकडे पहातच राहिले.

## मला जागा सोडण्याचे पैसे नकोत !

दत्तोपंत हे शहरात राहणारे एक मध्यमवर्गीय गृहस्थ होते. वृत्तीने ते सात्त्विक असल्यामुळे कधी कोणाच्या भानगडीत पडत नसत. आपले काम बरे नि आपण बरे अशी त्यांची वृत्ती होती. त्यांना नोकरीपण बऱ्यापैकी मिळाली होती. सदर नोकरी ते अगदी प्रामाणिकपणे व मनापासून करीत असल्यामुळे ते नेहमीच समाधानी व हसतमुख असत. ते ईश्वरी सत्ता मानत असल्यामुळे दररोज वेळात वेळ काढून भगवंताची निष्ठापूर्वक उपासना केल्याशिवाय रहात नसत. सुदैवाने त्यांना धर्मपत्नीपण सालस, कामसू वृत्तीची, पतीचे मनोगत जाणणारी मिळाली होती. तीसुद्धा घरकाम सांभाळून, थोडीफार काटकसर करून, फावल्या वेळात काम करून थोडेसे द्रव्यार्जन करीत असे.

त्या शहरात दत्तोपंतांची तीन खोल्यांची भाड्याची जुनी जागा होती, पण भाड्याचे घर काही आपले घर नव्हे व त्यावर आपली मालकी नसल्यामुळे तेथे भाडेकरूला आपलेपणा वाटत नाही व आपल्या मनासारख्या काहीच गोष्टी करता येत नाहीत, शिवाय अधून-मधून मालकाच्या तक्रारी व लहरीपणामुळे घरात स्वास्थ्य व शांततापण नांदत नाही, म्हणून आपले स्वत:चे घर बांधण्याबद्दल त्यांच्या पत्नीने पतीजवळ हट्ट धरला. दत्तोपंतांच्या मतेसुद्धा स्वत:चे घर असले म्हणजे जीवनातील अनिश्चितपणा बराचसा संपतो व जीवनाला स्थैर्यपण लाभते, असे वाटत होते. म्हणूनच दत्तोपंतांनी स्वत:चे घर काही वर्षात उभारावयाचेच म्हणून निश्चय केला. त्यासाठी त्यांनी आपल्या पत्नीस तिची सर्व मिळकत शिल्लक ठेवण्यास सांगितले. शिवाय स्वत:ही काटकसर करून त्यांनी घरासाठी पुंजी तयार करण्याचे ठरविले. तेवढ्यात भागणे शक्य नसल्यामुळे त्यांनी त्यासाठी कर्जपण काढले व घराची कल्पना साकारपण केली. स्वत:चे घर तयार होत असताना त्यांना खूप आनंद व्हायचा व आपले घराचे स्वप्न केवळ भगवदिच्छेने साकार होत आहे, अशी त्यांची मनोमन खात्री असल्यामुळे ते भगवंताजवळ त्याबद्दल कृतज्ञता व्यक्त करीत.

घर पूर्ण झाल्यावर दत्तोपंतांनी लवकरच आपल्या वास्तूत जाण्याचे ठरविले. वाड्यातील बाकीच्या भाडेकरूंना हे जेव्हा कळले तेव्हा त्यांच्यापैकी काहीजण दत्तोपंतांकडे गेले व त्यांनी त्यांचे अभिनंदन केले व जागा सोडण्यापूर्वी घरमालकाशी बातचीत करण्याबाबत सुचविले. दत्तोपंत अगदी सरळमार्गी असल्यामुळे भाडेकरूंच्या बोलण्याचा रोख त्यांच्या लवकर ध्यानात येईना म्हणून ते म्हणाले, ''अहो ! बातचीत कसली ? जागा सोडायचं ठरलं की मालकाला सांगायचं, अन् जागा खाली करायची. अजून थोडंसं घराचं चिल्लर काम चालू आहे. त्यामुळे मालकाला मी अजून काहीच बोललो नाही. शिवाय मालकाने जर एक महिन्याच्या नोटिसीचा विषय काढला तर त्याला एका महिन्याचं भाडं द्यायचं, अन् जागा खाली करायची !'' त्यावर भाडेकरू म्हणाले, ''दत्तोपंत ! तुम्ही अगदीच असे कसे हो ! अहो, तुम्ही जागा सोडणार म्हणून नुसतंच मालकाला सांगणार ! आणि तेसुद्धा वेळ पडली तर एक महिन्याचे भाडेसुद्धा देऊन ! या व्यवहारात तुम्ही काही मिळकत करणार नाही का ? कमाल करताय तुम्ही ! कुठल्या युगात तुम्ही वावरताय हेच कळत नाही ! अहो, शहाणे असाल तर घरमालकाबरोबर जागा सोडण्यासाठीचा सौदा करा ! जागा निमुटपणे सोडायचे दिवस महाशय, केव्हाच संपलेत.'' त्यावर दत्तोपंत म्हणाले, ''अहो, सौदा कसला ? आपलं स्वत:चं घर झाल्यावर आपण भाड्याचं घर मुकाट्याने व आनंदाने नको का सोडायला ? त्यासाठी सौदा करून पैसे मागून एवढी वर्षे जो चांगुलपणा मिळविला त्यावर काय बोळा फिरवायचा ! माझ्या मनाला ते मुळीच पटत नाही बुवा !'' त्यावर भाडेकरू पुन: म्हणाले, ''अहो दत्तोपंत ! हल्ली कोणताही शहाणा भाडेकरू पैसे घेतल्याशिवाय जागा सोडतच नाही. शिवाय हेपण लक्षात ठेवा की घरमालक तुम्हाला जागा सोडण्यासाठी पैसे देतो म्हणजे तो काही तुमच्यावर उपकार करीत नाही. अहो ! तुम्ही जागा सोडल्यावर घरमालकाचा चांगलाच फायदा होणार आहे. तुम्ही जागा सोडल्यावर तो ती जागा भरमसाठ भाड्याने देणार ! आम्ही तर असंपण ऐकलंय की घरमालक सर्व वाडा बिल्डरला काही लाखाला विकतोय म्हणून. त्या काही लाखातून तुम्ही कमीतकमी पन्नास हजार रुपये मागणे मुळीच गैर ठरणार नाही. याला तुम्ही पाप कसं काय मानता ! तेव्हा, तुम्ही आमचं ऐका व कानात तुळशीपत्र घालून तुमचे आर्थिक नुकसान करून घेऊ नका. शिवाय असंही पहा की तुम्ही हे जे घर बांधलंय ते पोटाला चिमटा घेऊन, थोडीफार काटकसर करून व कर्ज काढून. तेव्हा, तुम्ही मालकाकडून जगरहाटीप्रमाणे पैसे घेतलेत की तुमचं कर्ज फिटून तुम्ही कर्जमुक्त व्हाल की ! तसेच तुम्ही जर असे पैसे न घेण्याची प्रथा पाडलीत तर आमच्यासारख्या भाडेकरूंना पंचाईत होईल. कारण घरमालक प्रत्येक वेळी तुमचे उदाहरण देऊन आम्हाला जागा सोडण्याच्या वेळी वाटाण्याच्या अक्षता लावील की ! तेव्हा अशा वाईट प्रथा पाडून तुम्ही दुसऱ्या भाडेकरूंचे कृपा करून नुकसान करू नका.''

दत्तोपंतांच्या सात्त्विक मनोवृत्तीला खरं म्हणजे हे पटणारे नव्हते, पण संपत्तीचा जबरदस्त मोह, भाडेकरूंची बिनतोड विचारसरणी आणि पैसे घेतल्यास आपण ताबडतोब कर्जमुक्त होऊ याचे आकर्षक प्रलोभन ह्या सर्वांचा परिणाम म्हणून दत्तोपंतांच्या विचारसरणीत बदल घडला व त्यांनी घर सोडण्यापूर्वी घरमालकाकडून पन्नास हजार रुपये मागण्याचे ठरवले.

पण दत्तोपंतांच्या पूर्वपुण्याईमुळे असले अश्लाघ्य कार्य भगवंताला त्यांच्या हातून घडू द्यावयाचे नव्हते. म्हणूनच की काय ज्या दिवशी घरमालकाकडून पैसे घेण्याचे त्यांच्या मनात आले त्या पहाटे त्यांना एक स्वप्न पडले. स्वप्नात त्यांना एक तेजस्वी महापुरुष दिसला व तो दत्तोपंतांना म्हणाला, ''तुझी परमेश्वरावर श्रद्धा असल्यामुळे तू सदैव सदाचाराने वागून आपले कर्तव्य अगदी चोख बजावतोस. तू थोडीफार भगवंताची उपासना करून थोडेफार सुकृत जमा केले आहेस आणि मग लोकांच्या सांगण्यावरून घरमालकाकडून जागा सोडण्यासाठी पैसे मागण्याची अवदसा तुला कोठून आठवली ? त्यामुळे तू पापाचा धनी होणार नाहीस का ? तुझे हे पापकृत्य मला मुळीच पसंत नाही. तेव्हा, मी जे काय तुला सांगतोय ते नीट लक्ष देऊन ऐक ! घर सोडण्यासाठी तू जो पैसा घेणार आहेस तो तुझ्या घामाचा नव्हे. त्यामुळे तो कधीच टिकणार नाही व यशपण देणार नाही. अरे, कष्ट करून, घाम गाळून मिळविलेली संपत्ती कधी आपल्याला सोडून जात नाही, कारण चिकट घामामुळे ती त्या माणसाला चिकटूनच रहाते. शिवाय घरमालक तुला जे पैसे देणार आहे ते थोडेच सुखासमाधानाने देणार आहे ! तू जागा तशी सोडणार नाहीस म्हणून तुला शिव्याशाप देऊनच तो तुझ्यापुढे ते पैसे आदळणार ! मग बरोबर शिव्याशाप, तळतळाट घेऊन आलेला पैसा तुला सुख कसे काय मिळवून देईल ? असा पैसा तुझ्या घरात भगभग निर्माण करील आणि त्यामुळे तुझ्या घरातील शांतता नष्ट होईल आणि मग शांतता नसल्यावर तुझ्या घरात सुख कोठचे ! कुमार्गाने मिळविलेली संपत्ती विपत्ती आणते व असला अर्थ

(पृष्ठ क्र. ३१ वर)

# धर्माचे चलन

– श्री. म. पां. वाळिंबे
सातारा.

अशी कल्पना करा की एखादा उंच डोंगर आहे. त्याच्या दोन बाजूस दोन राज्ये आहेत. ह्या राज्यांत नाणी आणि चलनी नोटा व्यवहारात आहेत. परंतु एका राज्यातील नाणी किंवा नोटा यांना दुसऱ्या राज्यात कायदेशीर चलन म्हणून मान्यता नाही.

समजा, की या दोन राज्यांपैकी एकातील नागरिकाने वर्षानुवर्षे संपत्तीचा संचय केला आहे, पण ती सर्व रोकड आणि नोटांचे स्वरुपात आहे. आता अशी कल्पना करा की त्या धनिकाच्या राज्यातील परिस्थिती इतकी बिघडली आहे की त्यास आपला धनसंचय जवळ ठेवणे धोक्याचे व असुरक्षित वाटू लागले आहे. अशा परिस्थितीत तो सुरक्षिततेसाठी नजीकच्या राज्यात पळून जाण्याचा प्रयत्न करणार. परंतु जवळची सर्व संपत्ती काही तो बरोबर घेऊन जाऊ शकणार नाही, कारण ती खूपच अवजड असणार. बरोबर जेवढे शक्य आहे तेवढीच तो नेणार. बाकीची सर्व संपत्ती, नाणी, चलनी नोटा वगैरे त्यास त्याच्या राज्यातच मागे ठेवाव्या लागणार.

अशा चमत्कारिक अवस्थेत समजा त्याच्याकडे एखादा सज्जन माणूस आला आणि त्या धनिकाच्या जवळ असलेल्या चलनी नोटा आणि नाणी यांच्या बदल्यात नजीकच्या राज्यात कायदेशीर चलन असलेल्या मोठ्या परिमाणाच्या नोटा देण्याचा प्रस्ताव त्याने धनिकापुढे मांडला तर त्याचा हा प्रस्ताव तो आनंदाने मान्य करील, कारण त्यामुळे त्याच्याजवळच्या नोटा आणि रोकड नाण्यांचे ओझे बरेचसे कमी होईल, आणि त्या उंच डोंगराचे शिखर तो सहज ओलांडून पलीकडील राज्यात जाऊ शकेल.

याचप्रमाणे ज्या जगात आपला जन्म झाला त्या जगातून कोणत्याही क्षणी मृत्यूच्या नंतर दुसऱ्या जगात (परलोकात) जाण्याचा धोका आपणा प्रत्येकास आहे. या जगातून जाताना आपली इच्छा असूनही आपणास काहीही बरोबर नेता येणार नाही. आपल्यासाठी जमवलेली सर्व संपत्ती येथेच ठेवावी लागणार आहे, परंतु या संपत्तीचे रुपांतर आपणास आध्यात्मिक धनामध्ये करता येईल आणि हे आध्यात्मिक धन कायदेशीर चलन आहे. आध्यात्मिक चलनावर आणि नाण्यावर जणू धर्माची मुद्रा आहे, आणि हे चलन धर्मरुपी बँकेत चालणारे आहे.

मृत्यूनंतर आपण मिळवलेली संपत्ती आपणाबरोबर येणार नसून आपण बोललेले आणि मनात असलेले चांगले किंवा वाईट विचार पाप किंवा पुण्यस्वरुपात येणार आहेत. पुण्य हे मान्यताप्राप्त चलन आहे. त्यामुळे समाधान मिळेल. उलट आपण केलेली दुष्कृत्ये आणि बोललेले वाईट विचार यांचे रुपांतर पापात होईल व हे बेकायदेशीर चलन जवळ बाळगल्याबद्दल आपणास शिक्षा होईल.

तुला काय प्रिय आहे ? असा प्रश्न एखाद्यास विचारला तर तो बऱ्याच गोष्टी सांगेल. त्याची पत्नी त्यास प्रिय असू शकेल किंवा त्याची मुले किंवा त्याची मालमत्ता. अशा प्रिय गोष्टी त्यास दु:खदायक होतात. त्या सोडून जाताना त्यास अतिशय दु:ख होऊन त्याच्यावर अश्रू ढाळण्याची वेळ येते. अशा प्रिय गोष्टी त्यास त्याच्या मृत्युपूर्वी सोडून गेल्या तर दु:खाने त्याचे नेत्र भरून येतात आणि त्या व्यक्तीचा मृत्यू आधी झाला तर प्रिय गोष्टींचा वियोग होणार म्हणून त्यास दु:ख होऊन रडू येते. याचे कारण आसक्ती हे आहे. प्रिय गोष्टीपासून बळेच वियोग होणार नसेल तर दु:खाचे कारण नाही. परंतु वियोग हा मात्र अटळ आहे.

वियोगातून होणाऱ्या दु:खापासून सुटका कशी करून घेता येईल ? **केवळ त्यागामुळेच ही गोष्ट शक्य आहे.** आपल्या मनाची तयारी करुनच ती व्यक्ती शांती-समाधानाने वियोग सहन करु शकेल. यासच निरासक्ती किंवा वैराग्य म्हणतात. बळजबरीने झालेला वियोग हा डोळ्यात अश्रू आणतो. एखाद्या आंब्याच्या झाडावरील कच्चा आंबा तोडल्यास जेथून तो तोडला त्या जागी ओला चीक आढळून येईल. (हेच आम्रवृक्षाने ढाळलेले जणू अश्रू !) याउलट पूर्ण पिकलेला आंबा आपोआप झाडावरुन गळून पडतो. जेथून तो पडतो ती जागा कोरडी असते.

संसाररूपी वृक्षास चिकटून बसलेल्या अपरिपक्व मनास भौतिक गोष्टींपासून बळजबरीने वेगळे केले तर त्या व्यक्तीस अतिशय दु:ख होऊन अश्रू ढाळण्याची वेळ येते. परंतु जो खरा ज्ञानी आहे व ज्याचे मन परिपक्व आहे तो ऐहिक गोष्टींबद्दलच्या इच्छा-आकांक्षा दूर सारून समाधानाने त्यांचा त्याग करतो. कच्चे फळ हे कडू, आंबट असते, परंतु पक्व फळ हे मधुर असते. ज्ञानी व्यक्ती निरासक्त असल्यामुळे शांती-सुखाचा अनुभव घेते. याउलट मूढ आणि ज्यांनी खरे ज्ञान प्राप्त करून घेतले नाही त्या व्यक्तीचे जीवन हे दु:खमय असते.

आपले विचार, उक्ती आणि कृती यांचे सामर्थ्य हे सर्व जगात स्वीकारले जाईल अशा चलनात बदलून घेणे हे आपणावरच अवलंबून आहे. आपण आपल्या सर्व शक्तींचे रूपांतर अशा श्रेष्ठतम वैश्विक चलनात करावयास हवे की जे केवळ आपल्या शरीरासच नव्हे तर आत्म्याशी संलग्न असेल आणि जे आपणास सहजरीत्या कोठेही नेता येईल. या चलनावर कर्जाचा बोजा असू नये. अन्यथा आपणावर पकड वॉरंट येईल. आपल्या

सत्कृत्यांनी मिळवलेली ही ठेव असावी. शरीर, संपत्ती आणि मन ह्या त्रयीपैकी संपत्ती मृत्यूच्या पश्चात् आपणाबरोबर येणार नाही, ती वारसासाठी मागेच ठेवावी लागणार आहे. उंच डोंगर, शिखर ओलांडून जाताना ऐहिक गोष्टींच्या मोहापायी घडलेल्या पापाचे ओझे आपणाबरोबर नको. आपले विचार, उक्ती आणि कृती अशा उच्च प्रकारची असावी की त्या राज्यात जाण्याचा आपला मार्ग सुकर व्हावा. यासाठी काही विशेष कौशल्याची आवश्यकता नाही. फक्त खऱ्या नाण्याऐवजी बनावट नाणी न वापरण्याची खबरदारी घेणे मात्र आवश्यक आहे.

ऐहिक सुखाचा त्याग करून साध्या आणि सरळ मनाने आपण प्रभुचरणी शरण जाऊ या आणि नम्रतेने प्रार्थना करु या की, ''हे परमेश्वरा, तुझी कृपा व्हावी एवढे गुण माझ्याठायी नाहीत, तथापि माझ्या अपात्रतेचा विचार न करता मजवर कृपा कर आणि मला तुझे दैवी संरक्षण दे !''

मनुष्यजन्माचे उद्दिष्ट काय आहे ? द्रव्यार्जन करणे, खाणे-पिणे, नित्य कष्ट सोसणे आणि शेवटी मरून जाणे हेच आहे काय ? अर्जन करणे आणि कष्ट सोसणे यापेक्षा मरण येणे बरे नाही काय ? जीवनाचे खरे उद्दिष्ट पुनर्जन्म टाळणे हे होय ! मनुष्याखेरीज सर्व प्राण्यांची वाढ समांतर होते, परंतु मनुष्याची वाढ उभी व्हावी अशी परमेश्वराची इच्छा आहे, जेणेकरून तो वर पाहू शकेल आणि आपली उन्नती साधेल. आत्मसंरक्षणासाठी परमेश्वराने प्राण्यास जन्मतःच साधने दिली आहेत. फक्त मानवास त्याने बुद्धिमत्ता दिली आहे. बुद्धीचा उपयोग करून, निरासक्त होऊन आपण पापकर्मे टाळू शकतो आणि सन्मार्गाने वागून आपण पुनर्जन्म टाळू शकतो.

## मंदिरे

परमेश्वराच्या प्रति अढळ श्रद्धा जोपासणे आणि अंगी सहनशीलता बाळगणे हेच दुःखमुक्त होण्यासाठी उत्तम औषध आहे. भक्तीमुळेच दुःख सहन करण्याचे सामर्थ्य आपणास प्राप्त होते. मंदिरे ही भक्तीची जोपासना करण्याची माध्यमे आहेत आणि म्हणूनच सर्व ठिकाणी मंदिरांची आवश्यकता आहे. मंदिरातील देवतेस भक्तिभावाने अर्पण केलेल्या वस्तू आणि नैवेद्य हे परमेश्वराच्याविषयी मानवी मनात असलेल्या कृतज्ञतेचे प्रतीकच होय !

## श्री गुरुभक्तीचा महिमा

चंद्रशेखरेंद्र सरस्वती स्वामीजी यांचे गुरु व परमगुरु यांनी १९०७ साली कालावी मुक्कामी समाधी घेतली. हा दिवस 'आचार्य आराधना दिवस' म्हणून पाळतात. याचठिकाणी आचार्यांनी पीठारोहण केले. या घटनेस १९५७ साली पन्नास वर्षे झाली. त्याप्रसंगी आचार्य म्हणाले होते :

''श्रीगुरुदेवांचा पन्नासावा आराधना दिन साजरा करण्याचे भाग्य आपणा सर्वांना लाभले आहे.

गुरु म्हणजे परमेश्वर आहे. गुरु म्हणजे ब्रह्मा, गुरु म्हणजे विष्णु आणि गुरु म्हणजेच महेश्वर ! गुरु म्हणजेच सर्व देव !! गुरु म्हणजे साक्षात् परब्रह्म !!! हे पूर्ण सत्य आहे. ही गुरुंची केवळ स्तुती नव्हे, हे ध्यानात घ्यायला हवे.

आपण मनोभावे गुरुंची पूजा केली तर ती सर्व देवांची पूजा केल्याप्रमाणेच आहे. अगदी शिव आणि विष्णूचीसुद्धा !

ब्रह्मा निर्माण करतो, शिव नष्ट करतो आणि श्री विष्णु संरक्षण करतो. आपल्या मनातील इच्छा पूर्ण व्हाव्यात आणि आपण पापमुक्त व्हावे यासाठी आपण त्यांची उपासना करतो, मनोभावे नमस्कार करतो.

मानवी जीवन हे सुख आणि दुःख यांचे मिश्रण आहे. निव्वळ सुखाची अपेक्षा करणे व्यर्थ आहे. सुख आणि दुःख ह्या दोहोपैकी कोणाही एकाचा कंटाळा न करता दोहोंचा समन्वय साधण्याचा प्रयत्न करावयास हवा, आणि हेच खरे आदर्श जीवन होय ! हा समन्वय साधण्यात आपण यशस्वी झालो म्हणजेच आपणावर परमेश्वरी कृपा होईल.

भगवान श्रीकृष्णांनी गीतेमध्ये हेच सांगितले आहे.

हा मनाचा समतोल साधण्यासाठी, आदर्श जीवनासाठी आपण परमेश्वराकडे धाव घ्यावयास हवी, परमेश्वराचे सहाय्य आपण घ्यावयास हवे. परंतु तो परमेश्वर तर आपणास दिसत नाही. जो दिसत नाही त्याचे ध्यान करणे ही फार अवघड गोष्ट आहे.

शंख, चक्र आणि सुंदर पितांबर परिधान केलेल्या श्री भगवान विष्णूंच्या मूर्तीमधील शंखाकडे आपण दृष्टी केंद्रित केली तर हातातील सुदर्शन चक्र आपणास दिसत नाही. बरे, चक्राकडे लक्ष केंद्रित केले तर शंख दिसत नाही, आणि पदकमलावर लक्ष केंद्रित केले तर विष्णूंचे नेत्रकमल दिसत नाहीत. म्हणून भगवान विष्णूंचा साक्षात् अवतार असलेल्या श्री गुरुदेवांची पूजा करणे सोपे आहे, सुलभ आहे. गुरुंनी समतोल साधला आहे. त्यांचे जीवन आदर्श आणि संपूर्ण शांतीचे प्रतीक आहे. श्री गुरुंची उपासना केल्यामुळे आणि त्यांच्या कृपाशीर्वादाने आपणासही समतोलयुक्त आणि आदर्श जीवन (सुख-दुःखाचा समतोल साधून) जगता येईल. आपण भाग्यवान आहोत, कारण श्री गुरु-दर्शनाचा आणि त्यांच्या विद्वत्प्रचुर थोर शिकवणीचा आपणास लाभ होतो.

आपण खूप दान केले, खूप यज्ञयाग केले आणि पुष्कळ तीर्थयात्रा केल्या तरी आपण जर वासनेचे गुलाम झालो, वैमनस्याचे अंकित झालो आणि द्वेषमुक्त झालो नाही, तरमग सर्वकाही व्यर्थ आहे, निष्फळ आहे.

आपण सत्कृत्ये केली, पुण्यकर्मे केली तर पुढील जन्मात आपणास मुक्ती मिळेल म्हणतात. परंतु आपण जर वासना आणि द्वेष यांच्यावर विजय मिळवला आणि सुख-दुःखाचा समतोल साधण्यात यशस्वी झालो तर या जन्मातच आपणास मुक्ती मिळेल. प्रत्येकाने अशी मुक्ती मिळविण्यासाठी शक्य ते सर्व प्रयत्न करावयास हवेत. अशी मुक्ती याच जीवनात मिळविणे हे ध्येय आपणापुढे ठेवावयास हवे.

---

# वृद्धावस्था : एक समस्या

– श्री. य. न. पंडित
नाशिक.

प्रत्येक मनुष्याला सामान्यपणे वृद्धावस्थेला व मृत्यूला निश्चितपणे तोंड हे द्यावेच लागते. हे दोन्ही प्रसंग लक्षात घेऊन त्यादृष्टीने जीवनाची प्रारंभापासून काही विशिष्ट योजना आखली पाहिजे व त्यानुसार आपल्या वर्तनाला उत्कट इच्छाशक्तीच्या जोरावर वळण लावण्याचा जाणीवपूर्वक प्रयत्न झाला पाहिजे. मात्र सर्वसाधारणपणे असे दिसून येते की मनुष्याची वागणूक अशी असते की जणू त्याला वार्धक्य कधी येणारच नाही; मृत्यूला तोंडच द्यावे लागणार नाही ! प्रत्यक्ष वृद्धावस्था आली की मग आम्ही जागे होतो. पूर्व-योजना, तयारी करण्याची वेळ निघून गेलेली असते. वृद्धावस्था एक समस्या बनण्याचे मुख्य कारण हे आहे. या समस्येवर तोडगा कोणता ?

वृद्धत्व व शरीर-दौर्बल्य ह्या दोन गोष्टी जवळजवळ अभिन्न आहेत. शरीर-दुर्बलतेमुळे मानसिक दुर्बलता येते. मानसिक दुर्बलतेला अन्यही कारणे आहेतच. अशाप्रकारच्या दुर्बलावस्थेमुळे वृद्ध मनुष्य पुष्कळ वेळा अगतिक बनून दु:खी जीवनाची रखडत रखडत वाटचाल करीत असतो. शरीर, मन व बुद्धी यांच्या संतुलित विकासाकडे प्रथमपासून लक्ष दिले तर वृद्धावस्था शाप न ठरण्याऐवजी वर ठरेल, प्रसन्न वृत्तीने व समर्थपणे वृद्धावस्थेची वाटचाल तो करू शकेल.

वृद्धावस्थेत काही किमान पथ्ये पाळली तरी वृद्धावस्था सुसह्यच नव्हे, तर ती अवस्था परमोच्च आनंद व मानसिक प्रसन्नता देणारी आहे, याचा प्रत्यय आणून देईल.

ज्या घरात आई-वडिलांच्या समवेत घरातील सर्व मंडळी, विशेषत: मुले व सुना अतिशय विश्वासाने व प्रेमाने राहतात, खेळीमेळीचे वातावरण निर्माण करण्यात सर्वांचा सारखाच वाटा असतो, अशा घरात स्वर्गसुखाची लयलूट चालू असते. तेथे आवड म्हणून आजोबा नातवांचा अभ्यास घेतात, आजी त्यांना गोष्टी सांगतात, आवश्यक तेव्हा मार्गदर्शन करतात. घरातील सर्व मंडळी आपल्या सर्व गोष्टी आई-वडिलांना सांगतात, त्यांचा सल्ला मानतात. सर्व मंडळी निदान एकदा तरी एकत्र भोजन करतात, थोडा वेळ का होईना सर्वांच्या एकत्र गप्पागोष्टी-हसणे-खिदळणे होते. असे घर आदर्श मानले पाहिजे !

विभक्त - कुटुंबपद्धतीमुळे, तसेच आर्थिक व अन्य प्रतिकूल परिस्थितीमुळे घराघरातून वडिल-माणसे म्हणजे एकप्रकारची अडगळ वाटू लागली आहे. आयुष्यभर घरातील एक प्रमुख घटक म्हणून वावरणाऱ्या एका समर्थ कर्त्यामाणसावर उत्तरायुष्यात जर हीन-दीन, व्यथित, लाचारीचे जीवन जगण्याची पाळी आली, तर त्याला आपले जीवन असह्य व भारभूत वाटणे स्वाभाविक आहे. आर्थिक दुर्बलता मनुष्याला लाचार बनविते. म्हणून कोणासमोर आपणाला हात पसरावे लागणार नाहीत एवढी तरी आर्थिक तरतूद करून ठेवणे नितांत आवश्यक आहे. मग त्याकरिता मुला-बाळांची थोडीशी हेळसांड झाली तरी हरकत नाही. शैक्षणिक व अन्य मुलभूत गरजा जरूर भागविल्या पाहिजेत, पण नसत्या चैनीच्या गोष्टी कटाक्षाने टाळल्या पाहिजेत.

आज एकूणच जीवनाची चौकट इतकी बदलून गेली आहे की वृद्ध माणसाला आपले जीवन बरेचसे सुसह्य व सापेक्षत: सुखी करण्याकरिता वृद्धाश्रमाचा विचार करावा लागतो. हा विचार मुला-सुनांना आवडेल की नाही, त्यांच्या भावना दुखावणार तर नाहीत असे उगीचच वृद्धांना वाटते. वस्तुस्थिती वेगळीच असते. तीर्थयात्रेकरिता मुलगा अनपेक्षितपणे अधिकाधिक पैसा द्यायला तयार असतो. यामागे आई-वडिलांबद्दल प्रेम वा आदराची भावना क्वचितच असते. तीर्थयात्रेबद्दल भक्तिभावना जवळजवळ शून्यच ! आनंद असतो, तो आई-वडिलांची कटकट काही दिवस तरी मिटेल याचा.

वृद्धाश्रमाचा आधार केवळ संघर्षाच्या पोटीच घेतला जातो हे संपूर्णपणे खरे नाही. मूळ घरातील मंडळींशी असलेले संबंध अधिक प्रेमाचे-ममतेचे व्हावेत म्हणूनही वृद्धाश्रम मोलाचे कार्य करू शकतो. आठवड्यातून एखाद्या दिवशी वृद्धाश्रमात नियमितपणे भेटायला येणारी आणि येताना बरोबर भेटी व घरचे स्वादिष्ट पदार्थ करून आणणारी मंडळी पाहिली की वृद्धाश्रमाचे महत्त्व पटते. याचा अर्थ, सर्वच वृद्धांनी आश्रमाचा आधार घ्यावा असा नाही. घरातील मायेचे वातावरण अन्यत्र मिळणे कठीण ! पण घरातील मायेची ऊब कमी झाली तर मात्र वृद्धाश्रमाशिवाय अन्य उपाय नाही.

दोन पिढ्यांच्या विचारांतील अंतर घरात संघर्षाचे वातावरण निर्माण करते. समजावून घेण्याची, जमवून, जुळवून घेण्याची भाषा पुष्कळदा एकतर्फी असते. संघर्षमय वातावरणात पिचत, मनाचा कोंडमारा करीत दिवस काढण्यापेक्षा आश्रमाचा आधार घेणे आवश्यक ठरते.

परस्परांशी सलोख्याचे संबंध ठेवूनसुद्धा वृद्धाश्रमाचा तोडगा विचारविनिमय करून सर्वसंमतीने घेतला जाणे अशक्य नाही. आजची तीन खोल्यांची अपुरी जागा सर्वांना सुखाने नांदू देत नाही. अशा परिस्थितीत कोणालाच संकोच वाटू नये, अवघडलेल्या कुंद वातावरणातून सुटका व्हावी या सदुद्देशाने वृद्धांनी आश्रमात राहाणे काही गैर नाही. सणासुदीला घरी जाऊन